CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित




लातूर | सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ | वर्ष ४ थे अंक १७८ | पाने १२ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



इतर सगळ्या गोष्टींचा विचार करीत असताना, आर्थिक व्यवस्थेबरोबरच कार्यकर्त्यांच्या समाधानाचाही विचार करणे आवश्यक आहे. कार्यकर्त्याने स्वतःला कधीही उपेक्षित समजू नये.

**– स्व. लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

# दिल्लीत वसतिगृह कोसळले; चार विद्यार्थ्यांचा मृत्यू

### पाच गंभीर जखमी | इमारत ५० वर्षांपूर्वीची | घरमालक फरार

**नवी दिल्ली, ६ सप्टेंबर**

दिल्ली विद्यापीठाच्या दक्षिण परिसराजवळील सत्य निकेतन भागातील एका अरुंद गल्लीत, मुलांचे वसतिगृह असलेली सुमारे ५० वर्षे जुनी पाच मजली इमारत रविवारी दुपारी कोसळली. या दुर्घटनेत चार विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असून, मलब्याखाली अनेक जण अडकल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

आतापर्यंत ढिगाऱ्याखालून आठ जणांना बाहेर काढण्यात आले. त्यापैकी एकाला रुग्णालयात मृतावस्थेत आणण्यात आले, तर अन्य तिघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. पाच जणांची प्रकृती गंभीर आहे आणि जखमी झालेल्या एका बचावकर्त्याला रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे, असे पोलिसांनी सांगितले. तळघर आणि वरच्या पाच मजल्यांचा समावेश असलेल्या त्या इमारतीच्या ढिगाऱ्याखाली अजूनही सुमारे ४० ते ५० लोक अडकले आहेत, असा दावा स्थानिकांनी केला. 'पेईंग गेस्ट' (पीजी) निवासस्थान म्हणून वापरल्या जाणाऱ्या या इमारतीच्या तळघरात दुरुस्तीचे काम सुरू असताना दुपारी दीडच्या सुमारास ती कोसळली, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

दुर्घटनेची माहिती मिळताच, दिल्ली पोलिस, एनडीआरएफ, दिल्ली अग्निशमन दल आणि डीडीएमएची पथके, तसेच अग्निशमन विभागाच्या गाड्या आणि कॅट्स रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचल्या आणि त्यांनी बचावकार्य सुरू केले. हा परिसर अरुंद आणि गजबजलेल्या गल्ल्यांचा ओळखला जातो. इथे खानावळी आणि 'पीजी' वसलेले आहेत. ही वास्तू जवळपास ५० वर्षे जुनी असल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्याने दिली. दाटीवाटीने उभी असलेली इमारतींची रचना आणि विद्यार्थ्यांची मोठी गर्दी यामुळे तिथे हालचालीसाठी फारशी जागा उरत नाही.

बचाव पथके ढिगाऱ्यात काम करीत असतानाच, स्थानिक नागरिकही या बचावकार्यात सहभागी झाले. त्यांनी आपल्या हातांनी आणि हाती लागलेल्या कोणत्याही साधनांचा वापर करून ढिगाऱ्याखाली गाडल्या गेलेल्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली. एकूण सहा जणांची सुटका करून त्यांना रुग्णालयात हलवण्यात आले आहे. त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे, तर एकाला मृत अवस्थेत आणण्यात आले होते. (वृत्तसंस्था)



इमारत कोसळल्यानंतर स्थानिक नागरिकांनी धाव घेत बचावकार्य सुरू केले

### इमारतीच्या मालकाचा शोध

ही इमारत 'होस्टेल डेझ' नावाने ओळखली जायची. त्याचा मालक गुरुग्राममधील आहे. मलब्याखाली किती जण दबले याची नेमकी माहिती नाही. या प्रकरणी एफआयआर दाखल केला असून, इमारतीच्या मालकाचा शोध घेतला जात असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## महत्त्वाचे

### राजनाथसिंह श्रीलंका दौऱ्यावर

**नवी दिल्ली :** द्विपक्षीय संरक्षण आणि लष्करी संबंध अधिक दृढ करण्याच्या मार्गांचा शोध घेण्यासाठी संरक्षण मंत्री राजनाथसिंह मंगळवारपासून श्रीलंकेच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. संरक्षण आणि परराष्ट्र मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेले उच्च-स्तरीय शिष्टमंडळ राजनाथसिंह यांच्यासोबत असेल, असे अधिकृत निवेदनात म्हटले आहे. ते श्रीलंकेच्या नेतृत्वाशी अनेक मुद्द्यांवर सल्लामसलत करतील आणि कोलंबोमधील भारतीयांशी संवाद साधतील.

### अंतरवाली सराटीत ओबीसींचेही आंदोलन

**जालना, ६ सप्टेंबर**

अंतरवाली सराटीत मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांचे उपोषण सुरू असताना आता ओबीसी समाजानेही आक्रमक भूमिका घेत अंतरवाली सराटीच्या वेशीवर उपोषण सुरू केले आहे. ओबीसी आंदोलक अ‍ॅड. मंगेश ससाणे, विठ्ठल तळेकर आणि सतीश कुलाल उपोषणाला बसले आहेत. ओबीसींच्या हक्कांसाठी हे आंदोलन करण्यात येत असल्याचे सांगत मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीमुळे ओबीसींच्या आरक्षणावर परिणाम होण्याची भीती आंदोलकांनी व्यक्त केली आहे. ओबीसी समाजात होणारी घुसखोरी कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही ससाणे यांनी दिला आहे. तसेच जरांगे पाटील यांच्या मागण्या संवैधानिक नसल्याचा दावाही ससाणेंनी केला. (वृत्तसंस्था)

# न्या. महेश चंद्र त्रिपाठी मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायमूर्ती

### आठ न्यायमूर्तींच्या नियुक्तीचे आदेश जारी

**नवी दिल्ली, ६ सप्टेंबर**

महाराष्ट्रासह छत्तीसगड, अलाहाबाद, पंजाब आणि हरियाणा, ओडिशा, गुजरात आणि राजस्थान उच्च न्यायालयांमधील मुख्य न्यायमूर्तींच्या नियुक्तीचे आदेश जारी करण्यात आले. मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांची पदोन्नतीवर कोलकाता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती, तर अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी यांची मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने याबाबत केलेल्या शिफारशीला राष्ट्रपतींनी मंजुरी दिली.



सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमच्या शिफारशीनुसार, केंद्र सरकारने आठ उच्च न्यायालयांच्या नव्या मुख्य न्यायाधीशांच्या नियुक्तीला मंजुरी दिली. कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, दिल्ली उच्च न्यायालयाचे विद्यमान न्यायाधीश न्या. वल्लुरी कामेश्वर राव यांची पाटणा उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी, तर छत्तीसगड उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजय कुमार अग्रवाल यांची राजस्थान उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

# 'जेएनयू'मध्ये लैंगिक छळ

### १० विद्यार्थ्यांचा प्राध्यापकावर आरोप

**नवी दिल्ली, ६ सप्टेंबर**

राजधानी दिल्लीतील प्रतिष्ठित जवाहरलाल नेहरू विद्यापीठ (जेएनयू) पुन्हा एकदा वादात सापडले आहे. अनेक विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी एका प्राध्यापकावर लैंगिक छळाचे गंभीर आरोप केले आहेत. हे प्रकरण समोर आल्यापासून संपूर्ण कॅम्पसमध्ये खळबळ उडाली आहे. सध्या, विद्यापीठाची अंतर्गत तक्रार समिती (आयसीसी) सखोल चौकशी करत आहे.

सूत्रांनुसार, सुमारे एक महिन्यापूर्वी आयसीसीला प्राध्यापकाविरुद्ध १० विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या लेखी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींमध्ये प्राध्यापकावर अनेक धक्कादायक आरोप आहेत. सुरुवातीला १० तक्रारी दाखल झाल्यानंतर हे प्रकरण अधिकच चिघळले आहे. आता इतर अनेक वरिष्ठ विद्यार्थी पुढे आले आहेत. त्यांनी प्राध्यापकांवर असेच आरोप करत तक्रारी दाखल केल्या आहेत. विद्यापीठात प्रचंड गदारोळ आणि गंभीर आरोप होऊनही कोणत्याही विद्यार्थ्याने औपचारिक तक्रार केली नाही. (वृत्तसंस्था)

### वर्गातही बेशिस्त वर्तन

विद्यार्थ्यांचा मुख्य आरोप आहे की, प्राध्यापक त्यांना बैठका किंवा मेळाव्यांच्या बहाण्याने कॅम्पसमधील त्यांच्या अधिकृत निवासस्थानी वारंवार बोलावत असत. तिथे त्यांनी त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. इतर काही तक्रारींमध्ये प्राध्यापकाचे वर्तन वर्गातही बेशिस्त होते. त्यांनी विद्यार्थ्यांशी अश्लील व अनुचित टिप्पणी केली, असा दावा करण्यात आला आहे.

नेपाळ - तिबेट बॉर्डरवरील पूरग्रस्त भागात प्राण गमावलेल्या सर्वांना केसरी टूर्सतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!
नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांनी "पूरग्रस्त तिबेट बॉर्डर परिसर सोडून उरलेला संपूर्ण नेपाळ सुरक्षित असून" तिथे पर्यटनासाठी येण्याचे आवाहन केले आहे.
या आवाहनानुसार केसरीच्या सप्टेंबरपासूनच्या सर्व नेपाळ टूर्स सुरू राहतील. या टूर्सच्या कॉस्टमधील काही रक्कम केसरीतर्फे नेपाळ पूरग्रस्त मदत निधीसाठी देण्यात येईल. याबद्दल पर्यटकांचे शतशः आभार!




नेपाळमधील पर्यटन आणि प्रमुख पर्यटनस्थळे सुरू आहेत.
हिमालयाचे भव्य दर्शन, काठमांडूची संस्कृती, पोखराचे निसर्गसौंदर्य, चितवनचे जंगल आणि नेपाळची आपुलकी. चला, नेपाळला भेट देऊया – सुरक्षितपणे, संवेदनशीलतेने आणि विश्वासाने.

| ईझी व्हिसा टूर्स starts ₹83,000* | साऊथ ईस्ट एशिया टूर्स starts ₹95,000* | इंटरनॅशनल टूर्स starts ₹2,07,000* | छोटा ब्रेक टूर्स starts ₹38,000* | भारतीय टूर्स starts ₹41,000* | मारीगोल्ड यात्रा starts ₹42,000* |
|---|---|---|---|---|---|
| नेपाळ भूतान | बाली छोटा ब्रेक | बेस्ट ऑफ जपान | इंदूर उज्जैन मांडू | शिमला मनाली | नेपाळ मुक्तिनाथ |
| थायलँड | सिंगापूर छोटा ब्रेक | इसेन्शिअल युरोप | अमृतसर | भाऊबीज फॅमिली स्पेशल क्रूझ टूर सोनाली कुलकर्णीसोबत | गिरनार सोमनाथ |
| फु क्वॉक बँकॉक छोटा ब्रेक | लंगकावी छोटा ब्रेक | मोरोक्को जॉर्डन | पुरी भुवनेश्वर चिलिका | काश्मीर वैष्णोदेवी | कृष्णलीला |
| बेस्ट ऑफ बाकू | हाँगकाँग शेन्झेन मकाओ | ताश्कंद समरकंद बुखारा अल्माटी | अयोध्या प्रयागराज वाराणसी | राजस्थान मारवाड | मदुराई रामेश्वरम कन्याकुमारी |
| मॉरिशस | लेगोलँड सिंगापूर मलेशिया | साऊथ कोरिया | पुद्दुचेरी महाबलीपुरम | दार्जिलिंग गंगटोक | पीठापूरम कुरवपूर श्रीशैलम |
| श्रीलंका रामायण ट्रेल | बाली गिली आयलँड नुसा पेनिडा | स्कँडिनेव्हिया | मैसूर ऊटी | डलहौसी धरमशाला अमृतसर | जगन्नाथ पुरी कोलकाता गंगासागर |
| श्रीलंका याला नॅशनल पार्क | सिंगापूर मलेशिया गेंटिंग ड्रीम क्रूझ | स्प्लेंडिड चायना | मुन्नार अलेप्पी | केरळ कन्याकुमारी | साऊथ इंडिया टेंपल टूर |
| फिलिपिन्स पालावान | व्हिएतनाम फु क्वॉक | युएसए ईस्ट अँड वेस्ट कोस्ट विथ शिकागो | गुजरात रण उत्सव | ऑल ऑफ मेघालय | त्रिस्थळ दर्शन अयोध्या |
| चियांग माई लँटर्न फेस्टिव्हल फुकेत क्राबी बँकॉक | सिंगापूर थायलँड मलेशिया | साऊथ आफ्रिका केनिया विथ व्हिक्टोरिया फॉल्स | हंपी बदामी | मिस्टीकल नॉर्थ ईस्ट | सौराष्ट्र स्टॅच्यू ऑफ युनिटी |
| अझरबैजान जॉर्जिया | व्हिएतनाम कंबोडिया | ऑस्ट्रेलिया न्यूझीलँड | स्टॅच्यू ऑफ युनिटी नडाबेट अहमदाबाद | संपूर्ण मध्य प्रदेश | इंडियन रामायण ट्रेल जनकपूर |

ऑफर्स* | मॉन्सून ऑफर* सप्टेंबरपर्यंतच्या टूर्सवर 5,000 पर्यंत ॲडिशनल डिस्काऊंट | ॲडव्हान्स बुकिंग डिस्काऊंट* 50,000 पर्यंत | फुल पेमेंट डिस्काऊंट* टूरच्या 90 दिवस आधी | एक्स गेस्ट डिस्काऊंट* | 8+ग्रुप डिस्काऊंट* | लास्ट मिनीट डिल्स* | 0% EMI*

EZ 08 10 डिसेंबर 2026 युरोप ख्रिसमस मार्केट स्पेशल
FL 08 18 फेब्रुवारी 2027 तैवान लँटर्न फेस्टीव्हल रेनबो व्हिलेज
JB 09 13 नोव्हेंबर 2026 जपान फॉल कलर स्पेशल सगानो सिनीक ट्रेन
EO 09 16 जानेवारी 2027, 2 फेब्रुवारी 2027 नॉर्दन लाईट्स आईस ब्रेकर क्रूझ
UB 20 4 फेब्रुवारी 2027 रिओ कार्निव्हल साऊथ अमेरिका
UZ 13 8 मार्च 2027 अंटार्क्टिका
*T & C Apply

9167 835 071 | 1800 266 1100
सोमवार ते शनिवार सकाळी 9:30 ते संध्याकाळी 7

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुणे | 020-66465555 | ठाणे | 022-69721100 | निगडी | 9890941767 | पिंपळे सौदागर | 9049989533 | अहिल्यानगर | 7350553131 |
| पुणे | 8657991083 | वाशी | 022-69462222 | औंध | 9011948181 | सातारा रोड | 7028012434 | अहिल्यानगर | 9823140901 |
| बाणेर | 020-69101234 | नागपूर | 0712-6921717 | भोसरी | 9922151222 | सोलापूर | 9689913325 | बारामती | 9822848988 |
| मुंबई | 022-61744100 | कोल्हापूर | 0231-2533222 | हडपसर | 9569300300 | सोलापूर | 9890186186 | सातारा | 9922992382 |
| | | | | | | | | सांगली | 9421128340 |

KESARI.in
केसरीच्या स्पेशॅलिटी टूर्स
HONEYMOON An Everlasting Love Story | KESARI marigold Yatra to Spiritual Places | MY FAIR LADY | SECOND INNINGS Exclusive tours for seniors | chota break Kesari's escorted short tours
KESARI MICE CORPORATE TOURS 70300 11444, 914556 1122
KESARI SELECT CUSTOMIZED HOLIDAYS 1800 266 9080, 86577 58850
Foreign EXchange
Shop travel-curated products. www.shop.kesari.in

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### बांगलादेश सीमेवर १७ कोटींचे सोने जप्त

**कोलकाता :** भारत-बांगलादेश सीमेवर तैनात सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी तस्करीविरोधात मोठे यश मिळवले आहे. पश्चिम बंगालच्या नादिया जिल्ह्यात सीमेवर गस्त घालत असताना जवानांनी एका बांगलादेशी नागरिकाला मोठ्या प्रमाणात सोन्यासह रंगेहाथ पकडले. आरोपी मोठ्या प्रमाणात सोन्याची तस्करी करून भारतीय हद्दीत शिरण्याचा प्रयत्नात होता. मात्र, जवानांच्या सतर्कतेमुळे तस्करीचा प्रयत्न अयशस्वी ठरला. बीएसएफ अधिकाऱ्यांनुसार, ही कारवाई नादिया जिल्ह्यातील हलदरपारा सीमा चौकीजवळ शनिवारी सायंकाळी करण्यात आली. या भागाच्या सुरक्षेची जबाबदारी बीएसएफच्या ३२ व्या बटालियनवर आहे. जवानांनी बांगलादेशी नागरिकाला घेरून त्याची झडती घेतली असता त्याच्याकडून ८९ सोन्याची बिस्किटे जप्त करण्यात आली.

### कोंडागावमध्ये नक्षल्यांचे साहित्य केले जप्त

**कोंडागाव :** कोंडागाव जिल्ह्यात नक्षलविरोधी कारवाईत आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे सुरक्षा दलांनी एक ९ मिमी पिस्तूल, ३० किलो स्फोटकांसह मोठ्या प्रमाणात नक्षली साहित्य जप्त केले. ही कारवाई मर्दापाल पोलिस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली. पोलिसांनुसार, ५ सप्टेंबरला मिळालेल्या माहितीच्या आधारे नक्षल सेल, डीआरजी/बस्तर फायटर्स आणि बीडीएस यांचे एक संयुक्त पथक पुष्पल मोखमारी येथील कोरमेल गावाच्या जंगलमय आणि डोंगराळ भागाकडे रवाना झाले. या पथकाने परिसराला घेराव घालून शोध मोहीम राबवली. जप्त केलेल्या साहित्यामध्ये ३ टिफिन बॉम्ब, जिलेटीन, विविध प्रकारचे डेटोनेटर्स, ६ वॉकी-टॉकी, इलेक्ट्रिक वायर, सेफ्टी फ्यूज, ३० किलोग्रॅम जिलेटीन, एक ९ एमएम पिस्तूल, कमर्शियल डेटोनेटर्स, कार्डेक्स वायर, लोखंडी पाईप आणि इतर वस्तूंचा समावेश आहे.

### चेन्नईत टीव्हीके नेत्याची हत्या

**चेन्नई :** तामिळनाडूची राजधानी चेन्नईमध्ये शनिवारी रात्री सत्ताधारी टीव्हीके पक्षाचे पदाधिकारी कन्नन यांची बेसंत नगर परिसरात धारदार शस्त्रांनी हत्या करण्यात आली. या घटनेचे एक धक्कादायक सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहेत. हल्लेखोर त्यांचा रस्त्यावरून पाठलाग करून त्यांच्यावर हल्ला करताना दिसत आहेत. याप्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत या प्रकरणात पाच आरोपींना अटक केली आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, या हत्येचा संबंध जुन्या वैमनस्य आणि टोळीयुद्धाशी असू शकतो. मृत कन्नन हे सराईत गुन्हेगार होता. ■

# देश मादक पदार्थमुक्त करण्यासाठी कृती आराखडा

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची माहिती



**पणजी, ६ सप्टेंबर**

मादक पदार्थमुक्त युवाशक्तीच्या बळावर २०४७ मध्ये विकसित भारत घडवणे हे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे उद्दिष्ट आहे. २०२९ पर्यंत देशाला मादक पदार्थमुक्त करण्यासाठी केंद्र सरकारने एक कृती आराखडा तयार केला आहे, अशी माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी दिली.

नक्षलवाद आणि दहशतवादाचा धोका संपवण्यासाठी जसे काम केले तसेच विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी देशाला मादक पदार्थमुक्त करण्यास मोदी सरकार कटिबद्ध आहे, असे शाह म्हणाले. २०२९ पर्यंत मादक पदार्थमुक्त भारत करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने, मादक पदार्थांची तस्करी आणि त्यासाठी होणारा वित्तपुरवठ्यापासून ते पुनर्वसनापर्यंतचे संपूर्ण मादक पदार्थविरोधी जाळे उद्ध्वस्त करण्यासाठी केंद्र सरकारने एक समन्वित आणि देशव्यापी धोरण स्वीकारले आहे, असे अमित शाह यांनी सांगितले.

मादक पदार्थमुक्त युवाशक्तीच्या बळावरच २०४७ मध्ये विकसित भारत साकार होईल, हे नरेंद्र मोदींचे उद्दिष्ट आहे, असे अमित शाह यांनी सांगितले. मादक पदार्थांच्या समस्येबाबत आयोजित एका उच्चस्तरीय बैठकीचे अध्यक्षपद भूषवल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते; या बैठकीला गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यासह केंद्रीय गृह मंत्रालय आणि राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

२०१४ पूर्वी मादक पदार्थांविरुद्धचा लढा मोठ्या प्रमाणावर छोट्या तुकड्यांमार्फत आणि स्वतंत्रपणे लढला जात होता. किरकोळ आरोपींना पकडण्यातच यंत्रणा अनेकदा समाधानी असत. आमचे सरकार या लढ्याला राष्ट्रीय सुरक्षेचे प्राधान्य देत आहे, असे ते म्हणाले. मादकपदार्थांच्या मोठ्या जाळ्यांविरुद्ध तसेच त्यांचे आंतरराष्ट्रीय संबंध आणि कार्यपद्धतीतील त्रुटींच्या संदर्भात केंद्रीय संस्था व राज्य सरकारांना संयुक्त निर्णय घेता यावेत, यासाठी २०१९ मध्ये एका संयुक्त समन्वय समितीची स्थापना करण्यात आली होती, असे शाह यांनी सांगितले. ◂ (वृत्तसंस्था)

### तस्करीला आळा घालण्यासाठी राष्ट्रीय समन्वय समिती

**» मादकपदार्थांच्या तस्करीच्या समस्येविरुद्ध समन्वित कारवाई सुनिश्चित करण्यासाठी, २०१९ मध्ये कार्यकारी, राज्य आणि जिल्हा स्तरांवर मादकपदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी राष्ट्रीय समन्वय समिती ही चार-स्तरीय यंत्रणा स्थापन करण्यात आली, असे अमित शाह म्हणाले. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये अंमली पदार्थ विरोधी विशेष कृती दले स्थापन करण्यात आली आहेत आणि स्थानिक पोलिसांना राष्ट्रीय धोरणाशी जोडण्यात आले आहे, असे शाह म्हणाले.** ■

### हनुमानजी झाले मतदार, यादीत जोडला फोटो

**कोटा, ६ सप्टेंबर**

कोटामध्ये निवडणूक आयोगाचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कोटा शहरातील वॉर्ड क्रमांक २९ च्या मतदार यादीत एका नावापुढे चक्क भगवान हनुमानजींचा फोटो जोडण्यात आला आहे. मतदार यादीतील त्या मतदाराचे नाव जगदीश, असे नमूद आहे. त्याचे घरही प्रेमनगर परिसरात नोंदवलेले आहे. मात्र, १० दिवस लोटूनही स्थानिक बीएलओला जगदीश सापडलेला नाही. बीएलओचा दावा आहे की, त्यांनी जगदीशचे नाव यादीत जोडलेले नाही. ही चूक होती की हेतुपुरस्सर, याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. बीएलओच्या परवानगीशिवाय मतदार यादीत कोणतेही नाव जोडले किंवा काढले जात नाही, तर एवढी मोठी चूक कशी झाली?, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. बीएलओ राजेश गुप्ता यांनी सांगितले की, मतदार यादीनुसार रामचंद्र यांचा मुलगा जगदीश याचे नाव वॉर्ड क्रमांक २९ च्या भाग १२ मध्ये अनुक्रमांक १२९४ वर आहे. तो ३५ वर्षांचा असून प्रेम नगर सेकंड, कंसुआ परिसरात राहतो. ◂ (वृत्तसंस्था)

# जम्मू-काश्मीर, लडाख आमच्या नकाशानुसार दिसावे

## जगाच्या नवीन नकाशावर भारताची भूमिका

**नवी दिल्ली, ६ सप्टेंबर**

जगाच्या नवीन नकाशात जम्मू-काश्मीर आणि लडाखसह भारताचा संपूर्ण प्रदेश भारताच्या अधिकृत नकाशानुसारच दिसला पाहिजे. भारताचा प्रदेश चुकीच्या किंवा दिशाभूल करणाऱ्या पद्धतीने दाखवणे अमान्य असल्याचे भारताने म्हटले आहे.

संयुक्त राष्ट्रांने जगाच्या नवीन नकाशा स्वीकारण्याला मंजुरी दिल्यानंतर परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने रविवारी अधिकृत निवेदन जारी केले. त्यात म्हटले की, जगाच्या नकाशावर कोणत्याही देश किंवा खंडाचे वास्तविक क्षेत्रफळ बदलणार नाही याची काळजी घ्यावी. नकाशावर प्रदेशाचा आकार पूर्वीपेक्षा काहीसा लहान किंवा मोठा असण्यावर आमचा आक्षेप नाही, तथापि पूर्वीच्या नकाशात भारताचा जो भूभाग आहे, त्याला चुकीच्या पद्धतीने दर्शवल्यास त्यावर आक्षेप असेल. संयुक्त राष्ट्र महासभेत पारित झालेला प्रस्ताव कोणत्याही विशिष्ट नकाशाला, नकाशा तयार करण्याच्या पद्धतीला किंवा देशांच्या सीमांना मान्यता देत नाही. त्यामुळे जम्मू-काश्मीर आणि लडाखसह भारताचा संपूर्ण सार्वभौम प्रदेश भारताच्या अधिकृत नकाशानुसारच दर्शविला जावा. भारताच्या प्रदेशाचे कोणतेही चुकीचे किंवा दिशाभूल करणारे चित्रण स्वीकारले जाणार नाही.

**खंडांचा आकार प्रत्यक्षापेक्षा वेगळा**

नवीन नकाशात भारत काहीसा मोठा दिसू शकतो, तर आफ्रिका जुन्या नकाशाच्या तुलनेत मोठा दिसेल. समुद्रातील जहाजांचे मार्ग आणि दिशा समजून घेणे सोपे करणे हा नवीन नकाशा जारी करण्याचा उद्देश आहे. संपूर्ण गोल पृथ्वी सपाट नकाशावर दाखवल्यामुळे, त्यात देश आणि खंडांचा आकार प्रत्यक्षापेक्षा वेगळा दिसण्याची शक्यता आहे. आफ्रिकन देश टोगोचे परराष्ट्रमंत्री रॉबर्ट डुसे म्हणाले की, नकाशे केवळ भूगोल समजून घेण्याचे साधन नाहीत, तर ते शिक्षण आणि लोकांच्या विचारांवरही परिणाम करतात. हा प्रस्ताव टोगोने मांडला होता आणि त्याला आफ्रिकन संघाचा पाठिंबा मिळाला. ◂ (वृत्तसंस्था)

# मृतकांचा आकडा १३८९ वर




**काठमांडू, ६ सप्टेंबर**

नेपाळमधील विनाशकारी पुराला जवळपास दोन आठवडे उलटूनही, मदत आणि शोधकार्य अजूनही सुरू आहे. या आपत्तीत मोठ्या संख्येने लोकांनी आपले प्राण गमावले असून, हजारो लोक अद्याप बेपत्ता आहेत. रविवारपर्यंत मृतकांचा आकडा १३८९ वर पोहोचला असून जवळपास ५,००० लोक अजूनही बेपत्ता आहेत. आतापर्यंत १३,१०० हून अधिक लोकांना वाचविण्यात आले आहे.

दुर्गम भागातून सापडलेल्या मृतदेहांची आणि मानवी अवशेषांची ओळख पटवणे हे प्रशासनापुढील एक मोठे आव्हान बनले आहे. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी, पोलिसांनी बेपत्ता लोकांच्या नातेवाईकांकडून डीएनए नमुने गोळा करण्यास सुरुवात केली आहे. पुरात उत्तर आणि मध्य नेपाळमधील अनेक वस्त्या उद्ध्वस्त झाल्या. घरे, वाहने, रस्ते, पूल आणि जलविद्युत प्रकल्प वाहून गेले. या घटनेत चीनमध्ये ३१ लोकांचा मृत्यू झाला, तर तिबेटमध्ये ५०० हून अधिक लोक अजूनही बेपत्ता आहेत. नेपाळच्या राष्ट्रीय आपत्ती जोखीम निवारण आणि व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मते, चितवन जिल्ह्यात सर्वाधिक ३६२ मृतदेह सापडले आहेत. नवलपरासी पूर्व, नवलपरासी पश्चिम, नुवाकोट, रसुवा, गोरखा, धादिंग आणि तनहुन जिल्ह्यांमध्येही मृतदेह सापडले आहेत. आतापर्यंत केवळ ९८ मृतदेहांची ओळख पटवून ते त्यांच्या कुटुंबीयांकडे परत करण्यात आले आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

# आठ आरोपींच्या न्यायालयीन कोठडीत वाढ

## राम मंदिर देणगी अपहार प्रकरण

**अयोध्या, ६ सप्टेंबर**

राम मंदिरातील देणग्यांच्या कथित अनियमिततांप्रकरणी अटक करण्यात आलेल्या सर्व आठ आरोपींची न्यायालयीन कोठडी येथील न्यायालयाने शनिवारी १८ सप्टेंबरपर्यंत वाढवली, अशी माहिती त्यांच्या वकिलांनी दिली.

राज्य सरकारने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाच्या प्राथमिक अहवालाच्या आधारे २५ जून रोजी एफआयआर दाखल करण्यात आल्यानंतर, मंदिरातील देणगी मोजण्याच्या प्रक्रियेशी संबंधित असलेल्या आठ आरोपींना अटक करण्यात आली. ते सध्या कारागृहात आहेत. सर्व आरोपींची न्यायालयीन कोठडी १८ सप्टेंबरपर्यंत वाढवण्यात आली, असे आरोपींचे प्रतिनिधित्व करणारे वकील कुल शेखर सिंह यांनी सांगितले.

हा आदेश अयोध्येतील लाचलुचपत प्रतिबंधक न्यायालयाचे विशेष न्यायाधीश रजत वर्मा यांनी दिला. अविनाश शुक्ला, अनुकल्प मिश्रा, लव कुश मिश्रा, मनीष कुमार यादव, करुणेश पांडे, राम शंकर मिश्रा, सुभाष श्रीवास्तव आणि रमाशंकर उर्फ टिन्नू यादव अशी अटक करण्यात आलेल्या आठ आरोपींची नावे आहेत. आपल्या जामीन अर्जात श्रीवास्तव यांनी न्यायालयाला देणगी मोजण्याच्या प्रक्रियेबद्दल माहिती दिली आणि आपल्याला या प्रकरणात खोट्या आरोपाखाली गोवण्यात आल्याचा दावा केला, असे वकिलांनी सांगितले. ◂ (वृत्तसंस्था)

### मातीचे घर कोसळून चौघांचा मृत्यू

**कानपूर :** कानपूरच्या भितरगावमध्ये रविवारी सकाळी १०:३० वाजता एक भीषण अपघात झाला. एक मातीचे घर अचानक कोसळले. घरमालक मुकेश सिंग आणि त्यांच्या तीन मुली ढिगाऱ्याखाली गाडल्या गेल्या. यात वडिलांसह तीन मुलींचा मृत्यू झाला तर एक मुलगी गंभीर जखमी आहे. घर कोसळताच किंकाळ्या आणि आक्रोश सुरू झाला. ■



नेपाळ-तिबेट सीमेवरील हे ते ठिकाण आहे जेथे २६ ऑगस्टच्या महाप्रलयापूर्वी चीनने बांधलेली चार मजली इमिग्रेशन सेंटरची इमारत दिमाखात उभी होती. येथूनच कैलास मानसरोवर आणि चीनला रस्तामार्गे जात येत असे. इमारत पूर्णपणे जमीनदोस्त झाली आहे. आता फक्त खिंड आणि त्यातून वाहणारा भोटेकोशी नदीचा प्रवाह दिसत आहे.

# देशात दंगली घडवल्या जाण्याची शक्यता : राज

**मुंबई, ६ सप्टेंबर**

आता गणपतीचे दिवस आहेत. या दिवसांमध्ये दंगली घडवल्या जाण्याची शक्यता आहे. देशभरात हेच सुरू आहे, जेणेकरून तुम्ही त्यामध्येच अडकले पाहिजे. लोकांना धर्मांध करून मूळ प्रश्नांवरून लक्ष भरकटवण्याचे प्रयत्न होत आहेत. मुंबईत याची झलक दिसली आहे. त्यामुळे नागरिकांनी सावध राहावे, असे आवाहन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केले.



देवावरची श्रद्धा, धर्माबद्दलचा अभिमान इतके आपण समजू शकतो. पण माणसांनी धर्मांध असू नये. आपल्या धर्माचा आपल्याला अभिमान असला पाहिजे, पण तुमच्यामध्ये राग निर्माण केला जात असून तुमचे लक्ष दुसरीकडे जाऊ नये, यासाठीच हे प्रयत्न केले जात आहेत, असेही राज ठाकरे यांनी नमूद केले.

२०२१ मध्ये भारतात ज्या विदेशी कंपन्या आल्या होत्या. त्यामधील ५०० कंपन्यांनी आपले कामकाज बंद केले आहे. यातून किती नोकऱ्या गेल्या याचा अंदाज बांधला पाहिजे. हा केंद्र सरकारचा डेटा आहे, मी तयार केलेला नाही. देशात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढत आहे, असा दावाही त्यांनी केला. ◂ (वृत्तसंस्था)




### भारत- बेल्जियम मैत्रीचा इंडिया गेटरुपी चॉकलेट केक

**आंतरराष्ट्रीय** पातळीवर सध्या चॉकलेट डिप्लोमसी जोरात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांना सदिच्छा भेट म्हणून मेलोडी चॉकलेट दिले होते. ही चॉकलेट डिप्लोमसी तेव्हा खूप चर्चेचा विषय झाली होती. आता नुकतेच भारताच्या दौऱ्यावर येऊन गेलेले बेल्जियमचे पंतप्रधान बार्ट डी वेवर यांनी पंतप्रधान मोदींसाठी अतिविशेष असे चॉकलेट आणले होते. पण हे चॉकलेट नेहमीसारखे नव्हते, तर इंडिया गेटच्या प्रतिकृतीच्या रुपात होते. मात्र हे चॉकलेट मोदी यांना भेट म्हणून देण्याची वेवर यांची इच्छा पूर्ण झाली नाही. राजधानी दिल्लीतील गरमीमुळे आणताआणताच हा इंडिया गेटरुपी चॉकलेट केक प्रवासात विरघळून गेला. पंतप्रधान मोदींना इंडिया गेटरुपी चॉकलेट केक द्यायची माझी इच्छा होती, पण ती पूर्ण होऊ शकली नाही, असे वेवर म्हणाले. खरा इंडिया गेट एका शतकापासून राजधानी दिल्लीत भक्कमपणे उभा आहे, पण चॉकलेटची इंडिया गेटची प्रतिकृती बेल्जियमवरुन आणताआणता प्रवासातच विरघळून गेली, असे ते म्हणाले. चॉकलेट हे कुटनीतीसाठी चांगले असते, पण कुटनीतीच्या प्रवासासाठी तितके चांगले नसते, अशी मार्मिक प्रतिक्रियाही वेवर यांनी हसतहसत व्यक्त केली. बेल्जियमच्या चॉकलेटने बनवलेली इंडिया गेटची दुसरी प्रतिकृती बेल्जियममध्ये आहे, अधिक काळजी घेत ती भारतात पाठवली जाईल आणि पंतप्रधान मोदींना दिली जाईल, असा विश्वासही वेवर यांनी व्यक्त केला.

भारत बेल्जियम द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यासाठी जाणिवपूर्वक इंडिया गेटची प्रतिकृती निवडण्यात आली, याकडे वेवर यांनी लक्ष वेधवे. जवळपास शंभर वर्षांपूर्वी भारतीय सैनिक बेल्जियमच्या भूमीवर लढण्यासाठी गेले होते. या सैनिकांनी बेल्जियमच्या रक्षणासाठी केलेला पराक्रम आणि त्यांचे बलिदात बेल्जियम कधीच विसरणार नाही, चॉकलेटच्या इंडिया गेटच्या प्रतिकृतीत भारतीय सैनिकांच्या शौर्याचा आणि बलिदानाचा गौरवपूर्ण उल्लेख होता, याकडे वेवर यांनी लक्ष वेधले. हा चॉकलेटरुपी केक भारत बेल्जियमचा संयुक्त गौरवशाली वारसा आणि भविष्यातील वाटचालीची साक्ष देणारा आहे, असे ते म्हणाले.

### सतीश पुनिया यांच्या कार्यालयावरील पाटी

**भाजपाचे** राज्यसभा सदस्य सतीश पुनिया यांचा राष्ट्रीय महासचिव म्हणून भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत समावेश झाला आहे. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन एवढ्यावरच थांबले नाही तर त्यांनी पुनिया यांच्याकडे विधानसभा निवडणूक होणार असलेल्या पंजाबचे प्रभारी म्हणूनही जबाबदारी सोपवली आहे. पुनिया यांनी भाजपाचे राष्ट्रीय महासचिव म्हणून भाजपा मुख्यालयात पदभार सांभाळला आहे. भाजपा मुख्यालयातील त्यांच्या दालनात भेटायला येणार्यांची दररोज गर्दी असते. येणारे मोठेमोठे पुष्पगुच्छ आणि भेटी घेऊन येत असतात. या प्रकाराला आळा घालण्यासाठी पुनिया यांनी आपल्या कार्यालयाच्या दाराबाहेर पाटी एक लावली आहे. या पाटीवर माझ्या कार्यालयात तुमचे स्वागत आहे, पण येतांना पुष्पगुच्छ वा कोणतीही भेटवस्तु घेऊन येऊ नका, असे आवाहन केले आहे. तुम्हाला आणायचेच असेल तर फक्त एखादे फुल वा पुस्तक घेऊन या, तुमचे प्रेम आणि शुभेच्छा याच माझ्यासाठी सर्वात मोठी भेटवस्तु आहे, असे पुनिया यांनी म्हटले आहे. आपल्या अशा आचरणातून सतीश पुनिया यांनी एक चांगला संदेश कार्यकर्त्यांना दिला आहे.

सतीश पुनिया यांनी राजस्थान भाजपाचे अध्यक्षपद भूषवले आहे. याआधी भाजपाने पुनिया यांना हरयाणाचे प्रभारी बनवले होते, हरयाणात भाजपाला सलग तिसर्यांदा सत्तेवर आणण्यात पुनिया यांचे मोठे योगदान मानले जाते. त्यांच्या याच अनुभवाचा फायदा घेण्यासाठी भाजपाने त्यांच्याकडे शेजारच्या पंजाब या राज्याची जबाबदारी दिली आहे. भाजपासाठी यावेळी पंजाब विधानसभेची निवडणूक अतिशय महत्वाची आहे.

### जलशक्ती मंत्र्यासोबत पंतप्रधान मोदी यांची भेट

**राजधानी** दिल्लीत दररोजच कोणत्या न कोणत्या मंत्रालयाच्या बैठकी सुरू असतात. या बैठकींसाठी राज्यातील संबंधित खात्यांचे मंत्री आणि सचिवांनाही आमंत्रित केले जात असते. राजधानीत मागील आठवड्यात जलशक्ती मंत्रालयाने सर्व राज्याच्या पाणीपुरवठा मंत्र्याच्या एका परिषेदेचे आयोजन केले होते, या परिषदेला २३ राज्याचे पाणीपुरवठा मंत्री उपस्थित होते. परिषदेसाठी दिल्लीत आलेल्या मंत्र्यांना एक वेगळीच भेट मिळाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या सर्व मंत्र्यांना आपल्या निवासस्थानी न्याहारी बैठकीसाठी बोलावले. या बैठकीचे नियोजन भाजपाच्या सुशासन आणि धोरण संशोधन विभागाचे प्रमुख आणि माजी राज्यसभा सदस्य डॉ. विनय सहस्त्रबुध्दे यांनी केले होते. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनीही या सर्व मंत्र्यांना आपल्या निवासस्थानी स्नेहभोजनासाठी आमंत्रित केले होते.

पंतप्रधान मोदी यांनी संवाद अभियान सुरु केले आहे, मोदी केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्र्याशी नियमित संवाद साधतात, लोकसभा तसेच राज्यसभेच्या खासदारांना आपल्या निवासस्थानी गटगटाने भेटतात, महिला मंत्री आणि महिला खासदारांशीही मोदी संवाद साधत त्यांचा उत्साह वाढवत असतात. याच मालिकेत विविध राज्यांचे मुख्यमंत्री, प्रदेश अध्यक्ष, विविध राज्यातील मंत्र्यांनाही भेटण्याचेही मोदी यांचे नियोजन आहे. त्याच मालिकेत यावेळी राज्याच्या पाणीपुरवठा मंत्र्यांची मोदी यांनी भेट घेतली, आणि त्यांना कामाच्या दृष्टीने अपयुक्त टिप दिल्या. २०२९ ची लोकसभा निवडणूक तसेच विविध राज्यात होणार्या विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने भाजपाचे हे नियोजन आहे. पंतप्रधान मोदी यांच्याशी होणारी भेट ही भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्यांसाठी मग तो आमदार असो, खासदार असो की मंत्री, मुख्यमंत्री आणि प्रदेशअध्यक्ष सर्वांसाठी उत्साहवर्धक आणि प्रेरणादायी असते. ज्यांना पंतप्रधान मोदींसोबतच्या अशा भेटीचे निमंत्रण मिळते, ते स्वतःला भाग्यवान समजतात.

● दिल्लीवाला

# फ्रान्समधील मंदिर भाविकांसाठी खुले

**४० देशांतील संत-नागरिकांची उपस्थिती**

### प्राणप्रतिष्ठा सोहळा दिमाखात साजरा

**पॅरिस, ६ सप्टेंबर**

फ्रान्सची राजधानी पॅरिस फॅशनसाठी जगप्रसिद्ध असली तरी, आज ती तिच्या हिंदू मंदिरामुळे चर्चेत आली आहे. पॅरिसमधील बुसी-सेंट-जॉर्जेस येथे बीएपीएस स्वामिनारायण हिंदू मंदिराचा लोकार्पण सोहळा रविवारी उत्साहात पार पडला. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. याप्रसंगी युरोप, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, आफ्रिका आणि आशियासह ४० देशातून मोठ्या संख्येने संत आणि भक्त उपस्थित होते.मंदिराचे उद्घाटन आणि प्रतिष्ठापना महंत स्वामी महाराजांच्या हस्ते पार पडला.

प्राणप्रतिष्ठा सोहळ्यापूर्वी, पॅरिसमध्ये संगीत, कला आणि भक्तीपूर्ण कार्यक्रमांचे प्रदर्शन करणारी एक भव्य शहर मिरवणूक आयोजित करण्यात आली. पारंपरिक वेशभूषेतील कलाकारांनी भारताच्या कलात्मक आणि आध्यात्मिक परंपरांना जिवंत केले. हिंदू मंदिरामुळे फ्रान्समधील भारतीय संस्कृती आणि हिंदू धर्म यांच्यातील प्रेम आणि सलोख्याच्या भावनेत एका नवीन अध्यायाची सुरुवात झाली आहे.



पॅरिसमधील बुसी-सेंट-जॉर्जेस येथे बीएपीएस स्वामिनारायण हिंदू मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमात उपस्थित संत

मंदिराचा भूमिपूजन सोहळा २०२१ मध्ये संतांच्या उपस्थितीत पार पडला आणि २०२२ मध्ये पायाभरणी समारंभ झाला. हे मंदिर ५,००० चौरस मीटर परिसरात पसरलेले आहे. वरच्या मजल्यावर एक पारंपरिक मंदिर आहे आणि तळमजल्यावर एक सुंदर वाडा आहे. याच्या बांधकामात ग्वाल्हेरच्या वाळूच्या दगडासोबतच भारत, इटली, ग्रीस आणि व्हिएतनाममधील संगमरवराचा वापर करण्यात आला.

**भारतीय वास्तुकला, अभियांत्रिकीचा सुंदर मिलाफ**

हे भव्य मंदिर पारंपरिक भारतीय वास्तुकला आणि आधुनिक फ्रेंच अभियांत्रिकी यांचे एक अद्वितीय उदाहरण आहे. वरच्या मजल्यावर एक पारंपरिक मंदिर आहे, तर खालच्या मजल्यावर 'मरू गुर्जर' शैलीत बांधलेली एक भव्य सांस्कृतिक वास्तू आहे. या संकुलात पाच भव्य शिखरे, दहा मोठे घुमट, २० कलाकुसर केलेले स्तंभ, १२० कोरीव खिडक्या, ४९ शिल्पपट यांचा समावेश आहे. भारतातील कुशल कारागिरांनी दगड हाताने कोरले, नंतर ते फ्रान्सला पाठवले आणि मंदिरात स्थापित केले. ◂ (वृत्तसंस्था)

# अमेरिकेच्या युद्धनौकेवर इराणचा हल्ला

## तेलवाहू जहाजांवरील हल्ल्याचा घेतला सूड; होर्मुझमध्ये तणाव वाढला

**दुबई, ६ सप्टेंबर**

आखातात इराण आणि अमेरिका यांच्यातील लष्करी संघर्ष एका धोकादायक वळणावर पोहोचला आहे. अमेरिकेच्या सैन्याने शनिवारी खार्ग बेटाजवळ तीन तेलवाहू जहाजांना लक्ष्य केल्यानंतर इराणने हल्ल्याला जोरदार प्रत्युत्तर देत होर्मुझमध्ये तैनात अमेरिकेच्या युद्धनौकेवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. या हल्ल्यात अमेरिकेच्या झालेल्या नुकसानीची माहिती समोर आली नाही.

इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने (आयआरजीसी) जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, त्यांनी अमेरिकेच्या नौदलाच्या विमानवाहू जहाजाला आणि विनाशिकेला लक्ष्य करून अनेक बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. क्षेपणास्त्र हल्ल्यांमुळे अमेरिकेच्या जहाजांचे मोठे नुकसान झाले, ज्यामुळे त्यांना भीतीने त्या भागातून पळून जावे लागले.अमेरिकेच्या लष्कराने इराणचे दावे पूर्णपणे फेटाळून लावले आहेत. अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की त्यांच्या विमानवाहू जहाजाने आणि विनाशिकेने इराणी हल्ले परतवून लावले. या घटनेत अमेरिकेचा कोणताही सैनिक जखमी झाला नाही. आमच्या दोन जहाजांवर हल्ला केला, तर आम्ही मोठी आर्थिक किंमत वसूल करू आणि तुमची तीन जहाजे बुडवू," अशी ठाम भूमिका घेतली, तेव्हा हा वाद आणखी वाढला. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने इशारा देताना म्हटले की, युद्धनौकांना पोहोचवण्याचा प्रयत्न झाल्यास इराणला मोठी किंमत चुकवावी लागेल, त्यांना विनाशापासून कोणीही वाचवू शकणार नाही. (वृत्तसंस्था)



होर्मुझ जलमार्गात तैनात अमेरिकेच्या युद्धनौकांवर हल्ले करताना इराणी सैन्य

### सर्व तेलवाहू जहाजे समुद्रात बुडवू : हेगसेथ

अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांनी म्हटले की, इराणने रविवारी पहाटे होर्मुझ जलमार्गात गस्त घालणाऱ्या युद्धनौकांवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. हवाई संरक्षण प्रणालीने इराणचे हल्ले उधळून लावले. यापुढे इराणने हल्ल्याचा प्रयत्न केल्यास त्यांची सर्व तेलवाहू जहाजे समुद्रात बुडवली जातील. अडमिरल कूपर यांनी अमेरिकेच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला आणि हे स्पष्ट केले की, वॉशिंग्टन आपल्या लष्करी दलांचे संरक्षण करण्यासाठी कोणत्याही थराला जाईल आणि गरज पडल्यास इराणच्या संपूर्ण तेलवाहू जहाजांच्या ताफ्याला लक्ष्य करण्यास अजिबात मागेपुढे पाहणार नाही.

### आम्ही पूर्वीपेक्षा अधिक शक्तिशाली

अमेरिकेच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून, इराणने इशारा दिला की ते होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या अनधिकृत आणि अमेरिकेशी संबंधित जहाजांवरील हल्ले तीव्र करतील. जर अमेरिकेने आपली आक्रमक कारवाई सुरूच ठेवली, तर त्यांनी इराणी सशस्त्र दलांकडून होणाऱ्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या आणि गंभीर हल्ल्याला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी. आम्ही पूर्वीपेक्षा अधिक शक्तिशाली आहे. वाढता आर्थिक दबाव कमी करण्यासाठी इराणने निर्बंध आणि अमेरिकेची नाकाबंदी टाळण्यासाठी इतर मार्ग शोधले आहेत. त्यामुळे त्यांच्या नाकाबंदीचा आमच्यावर परिणाम होणार नाही.




# डीएनए चाचणी हीच शेवटची आशा

## आप्तांची ओळख पटविण्याचा उरला एकमेव पर्याय


डीएनए नमुना संकलन केंद्रात नातेवाईकांची गर्दी

**काठमांडू, ६ सप्टेंबर**

२६ ऑगस्ट रोजी नेपाळ-तिबेट सीमेजवळ बर्फ व खडकांच्या दरडी कोसळल्यामुळे अचानक आलेल्या पुरामुळे नेपाळच्या उत्तर व मध्य भागातील शहरे व गावांचे प्रचंड नुकसान झाले. या पुरानंतर सापडलेल्या शेकडो मृतदेहांची ओळख पटविण्यासाठी व बेपत्ता नातेवाईकांचा शोध घेण्यास कुटुंबांना मदत करण्यासाठी प्रशासन आता डीएनए चाचणीवर अवलंबून आहे. बेपत्ता आप्तांचा शोध घेणाऱ्या कुटुंबांसाठी डीएनए चाचणी हीच शेवटची आशा आहे.

आपत्तीत १,३०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे, तर सुमारे ५,००० लोक अजूनही बेपत्ता आहेत. ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी आतापर्यंत २,२७२ डीएनए नमुने गोळा केले आहेत; यात १,२६० नमुने मृतदेहांकडून आणि १,०१२ नमुने नातेवाईकांकडून घेण्यात आले आहेत. डीएनए नमुने गोळा केल्यानंतर आणि ओळख पटवण्याची इतर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १,०३० मृतदेह दफन करण्यात आले आहेत, यामध्ये २२२ महिला, ३५५ पुरुष आणि ४५३ अशा मृतदेहांचा समावेश आहे, ज्यांचे लिंग निश्चित करता आले नाही, अशी माहिती प्रशासनाने दिली. ओळख पटल्यानंतर आतापर्यंत केवळ ९६ मृतदेह कुटुंबांच्या ताब्यात देण्यात आले आहेत.

'द काठमांडू पोस्ट' या वृत्तपत्राने दिलेल्या माहितीनुसार, दियाली यांचा पुतण्या अविनाश याने त्या तुटलेल्या हाताचा फोटो त्यांना पाठवला व सांगितले की, 'मला एक हात सापडला आहे जो अगद काकांच्या हातासारखा दिसतो. दियाली यांच्यासाठी ही घटना आश व भीती अशा दोन्ही भावना घेऊ आली. आता तो मृतदेह त्यांच्य भावाचाच आहे की नाही, हे जाणू घेण्यासाठी डीएनए चाचणी हा त्यांच्या कुटुंबासमोरील एकमेव पर्या उरला आहे. मृत व्यक्तींची ओळख पटविणे हे एक मोठे आव्हान बनल आहे. प्रवाहाबरोबर वाहून गेलेल्य मृतदेहांची अवस्था अत्यंत खरा झाली. (वृत्तसंस्था

# मणिपूरमध्ये चकमक; दोन बंडखोर ठार


चुराचंदपूर जिल्ह्यात सुरक्षा दलाने राबवलेल्या शोधमोहिमेवेळी जप्त करण्यात आलेली शस्त्रे

**इम्फाळ, ६ सप्टेंबर**

मणिपूरच्या चुराचंदपूर जिल्ह्यात बीएसएफ आणि आसाम रायफल्सच्या संयुक्त पथकाने शोधमोहीम राबवली, यावेळी युनायटेड कुकी नॅशनल आर्मीच्या (यूकेएनए) बंडखोरांसोबत चकमक झाली. यात दोघांचा मृत्यू झाला, तर दोन जखमी आहे. कारवाईवेळी मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला.

गोपनीय माहितीच्या आधारे सुरक्षा दलांनी चुराचंदपूर जिल्ह्यातील हेंगलेप उपविभागातील फाबोंग गावात शोधमोहीम राबवली. यावेळी लपून असलेल्या प्रतिबंधित यूकेएनएच्या सदस्यांनी पथकावर गोळीबार केला. प्रत्युत्तरात संघटनेचे दोन सदस्य ठार झाले, तर दोन जखमी आहे. इतर पसार होण्यात यशस्वी झाल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. घटनास्थळावरून शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. शोधमोहीमेत प्रतिबंधित संघटनेचा छुपा अड्डा उद्ध्वस्त करण्यात आला. कारवाईत दोन एमए रायफल्स, एक एके-५६ रायफल, एक लाठोड बंदूक, सात लाठोड ग्रेनेड, १५ एके मॅगझिन्स, ३७१ एके-५६ काडतुसे, ६०१ एमए रायफल काडतुसे आणि १७२ एसएलआर काडतुसे जप्त करण्यात आली. याव्यतिरिक्त, १५ लढाऊ गणवेश आणि सात दारूगोळ्याच्या पिशव्याही सापडल्या. (वृत्तसंस्था)

# पाकिस्तानी पंजाबला शेजारी प्रांतांचा मोठा धोका : मरियम नवाझ

**लाहोर, ६ सप्टेंबर**

आमच्या प्रांताला शेजारी देशांपेक्षा जास्त धोका शेजारच्या प्रांतांकडून आहे, असा दावा पाकिस्तानातील पंजाबच्या मुख्यमंत्री मरियम नवाझ यांनी केला. गेल्या काही वर्षांत पाकिस्तानात, विशेषतः पंजाबला लागून असलेल्या खैबर पख्तुनख्वा आणि बलुचिस्तान या प्रांतांमध्ये दहशतवादी कारवायांमध्ये वाढ झाली आहे. पंजाबची सीमा भारतालाही लागून आहे.

पंजाबमध्ये प्रांतीय सीमांमधून दहशतवाद प्रवेश करतो. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, १३ कोटी लोकसंख्या असलेल्या



पंजाबला शेजारील देशांपेक्षा शेजारील प्रांतांकडूनच अधिक धोका निर्माण झाला आहे, असे मरियम नवाझ यांनी शनिवारी लाहोरमधील एका कार्यक्रमात सांगितले. खैबर पख्तुनख्वा प्रांतातूनच दहशतवाद पंजाबमध्ये प्रवेश करतो. सर्वांचे लक्ष पंजाबकडे असते, पण सुदैवाने पंजाब सुरक्षित आहे, असे त्या म्हणाल्या. मरियम नवाझ यांचे वक्तव्य अपमानजनक आहे, अशी टीका खैबर पख्तुनख्वा प्रांतातील सरकारचे नेतृत्व करणाऱ्या पाकिस्ता तेहरिक-ए-इन्साफ या विरोधी पक्षाच्य नेत्याने मरियम नवाझ यांच्या वक्तव्याव केली. मरियम नवाझ यांनी केलेल अपमानजनक विधाने अत्यंत लज्जास्प आहेत, असे पीटीआयचे ज्येष्ठ नेते अस कैसर यांनी म्हटले. खैबर पख्तुनख्वा लोक तिच्या काकांच्या नेतृत्वाखालील सध्याच्या संघीय सरकार तसेच नवाझ शरीफ यांच्या आधीच्या सरकारां राबवलेल्या सदोष आणि अयशस्व धोरणांचे परिणाम भोगत आहेत, असे त्यां एका निवेदनात म्हटले. (वृत्तसंस्था

# महिला वृत्तनिवेदिकेसह बारा जणांना मृत्युदंड

## इजिप्तच्या न्यायालयाचा निर्णय

**कॅरिओ, ६ सप्टेंबर**

मादकपदार्थ तस्करीशी संबंधित एका प्रकरणात इजिप्तच्या एका कनिष्ठ न्यायालयाने वृत्तनिवेदिका सारा खलिफासह १२ जणांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. दोषी ठरवलेले सर्व एका गुन्हेगारी टोळीचा भाग असून, ही टोळी परदेशातून मादकपदार्थ बनवण्यासाठी लागणारे साहित्य आयात करून मादकपदार्थांची निर्मिती करायचे आणि त्याची देशात तस्करी करत असल्याचे न्यायालयाने आदेशात म्हटले आहे. आरोपींकडून बेकायदेशीर शस्त्रे आणि दारुगोळा देखील जप्त करण्यात आला.


सारा खलिफा

इजिप्तमध्ये मृत्युदंडाच्या प्रकरणांमध्ये न्यायालयाला देशाच्या ग्रँड मुफ्तींचा धार्मिक सल्ला घेणे आवश्यक असते. ही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने निर्णय दिला आहे. पोलिसांनी एका घरावर छापा टाकून ७५० किलोग्रॅमपेक्षा जास्त मादकपदार्थ जप्त केले होते. याव्यतिरिक्त, उत्पादनासाठी परदेशातून आयात केलेला कच्चा मालही जप्त करण्यात आला. या प्रकरणातील वीस साक्षीदारांनी सरकारी वकिलासमोर आपले जबाब नोंदवले. तपासादरम्यान मिळालेल्या इलेक्ट्रॉनिक पुराव्यांमध्ये रेकॉर्ड केलेली संभाषणे आणि व्हिडीओ क्लिप्सचा समावेश होता. दरम्यान ३९ वर्षीय सारा खलिफा ही एक इजिप्शियन टीव्ही निवेदिका आहे. तिने तिच्यावरील सर्व आरोप नाकारले आहेत. ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या २०२५ च्या अहवालानुसार इजिप्तच्या न्यायालयांनी ४९२ लोकांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आणि २३ जणांना फाशी देण्यात आली. (वृत्तसंस्था)


# लग्नसमारंभात भीषण आग, २२ जणांचा होरपळून मृत्यू

### इमारतीच्या अरुंद कॉरिडॉरमध्ये अडकले पाहुणे

**किंशासा, ६ सप्टेंबर**

डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ कांगोची राजधानी असलेल्या किंशासा येथील लिंगवाला भागात एका विवाह समारंभादरम्यान भीषण आग लागली. या आगीत २२ जणांचा होरपळून मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी आहेत.

लग्न समारंभ असल्याने सर्व लोक आनंदात होते. मात्र या आनंदाच्या वातावरणातच अचानक लागलेल्या आगीमुळे इमारतीत एकच धावपळ उडाली. मात्र, इमारतीतील रस्ते आणि बाहेर पडण्याचे मार्ग अत्यंत अरुंद असल्याने पाहुण्यांना वेळेत बाहेर पडता आले नाही. शनिवारी रात्री उशिरा एका बहुमजली इमारतीला आग लागली. आगीची माहिती मिळताच स्थानिकांनी धाव घेतली आणि जीवाची पर्वा न करता अनेकांना बाहेर काढले.


आगीत राख झालेला लग्नातील हॉल

दरम्यान जखमींना रस्त्याच्या कडेला हलवण्यात आले; मात्र काहींचा जागीच तर काहींचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. लिंगवालाचे महापौर नॉर्बर्ट मुशिंगा यांनी २२ जणांच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. तसेच, हा आकडा आणखी वाढण्याची शक्यताही वर्तवली आहे. अद्याप आगीचे स्पष्ट कारण समजू शकले नाही. गृहमंत्री जॅकमिन शाबानी यांनी घटनास्थळाची पाहणी केली आहे. महत्वाचे म्हणजे, कांगोमध्ये कोरड्या हवामानामुळे अशा आगीच्या घटना वारंवार घडतात. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता



### नीम करोली बाबांची कथा जगभर पोहोचणार

**मुंबई :** निम करोली बाबांचे नाव घेताच भक्तांच्या मनात महावीर हनुमानांची आठवण जागी होते. या महान संतांची जीवनकथा भारतीय प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्यांनतर आता ती जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार आहे. नीम करोली बाबा हे भारतातील एक महान आध्यात्मिक संत म्हणून ओळखले जातात. त्यांच्या विचारांनी आणि आध्यात्मिक प्रभावाने स्टीव्ह जॉब्स, मार्क झुकरबर्ग आणि ज्युलिया रॉबर्ट्स यांसारख्या जगप्रसिद्ध व्यक्तींनाही प्रेरणा मिळाली होती. भारतीय चित्रपटगृहांमध्ये चांगली कामगिरी केल्यानंतर हिंदी भक्तिपर चित्रपट 'हनुमान अंश' आता आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांसमोर येण्यासाठी सज्ज झाला आहे. या चित्रपटाच्या आंतरराष्ट्रीय वितरणाची जबाबदारी होम्बले फिल्म्सने स्वीकारली असून, ११ सप्टेंबर २०२६ रोजी हा चित्रपट जगभरात प्रदर्शित केला जाणार आहे. दमदार कथानकाला मिळालेल्या सकारात्मक तोंडी प्रसिद्धीमुळे चित्रपटाविषयीची प्रेक्षकांची उत्सुकता सातत्याने वाढत आहे.

### 'जीडीएन'चा चौथा आठवडाही दमदार

**मुंबई :** आर. माधवन हा आपल्या वैविध्यपूर्ण भूमिकांमुळे सातत्या चर्चेत असलेला अभिनेता. भारतीय सिनेमातील सर्वाधिक टिकाऊ पॅन इंडिया कलाकारांपैकी एक असल्याचे त्याने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे दिग्गज संशोधक जी. डी. नायडू यांच्या जीवनावर आधारित त्याच महत्त्वाकांक्षी आणि हृदयस्पर्शी चित्रपट 'जीडीएन' सध्या प्रदर्शनाच्या चौथ्य आठवड्यातही बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी करत आहे. ७ ऑगस रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने प्रेक्षकांची मने जिंकली असून सातत्याने दर्जेदार काम करणारा अभिनेता म्हणून माधवनच्या कारकिर्दीलाह या चित्रपटाच्या यशाची नवी किनार लाभली आहे. चित्रपटात माधवन केवळ दूरदर्शी संशोधक जी. डी. नायडू यांची व्यक्तिरेखा साकारलेली नाही तर सह-निर्माता म्हणूनही त्याने या प्रकल्पाचे नेतृत्व केले आहे. त्यामुळे य चित्रपटाचे यश त्याच्यासाठी विशेष वैयक्तिक महत्त्वाचे ठरले आहे.

### प्रियांका चोप्राचा पॅरिसमध्ये जलवा



**पॅरिस :** पॅरिस आणखी एका भव्य फॅशन सोहळ्यासाठी सज्ज होत असताना आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकप्रिय असलेली अभिनेत्री प्रियांका चोप्रा जोनस या सोहळ्याच्या केंद्रस्थानी असणार आहे. यंदाच्या प्रतिष्ठित एलव्हीएमएच पुरस्कार सोहळ्यात प्रियांका चोप्रा मानाचा कार्ल लागरफेल्ड पुरस्कार प्रदान करणार आहे. विशेष म्हणजे, हॉलिवूड अभिनेत्री जेनिफर लॉरेन्स आणि थायलंडची अभिनेत्री उरासाया 'याया' स्परबुंड यांच्यासोबत प्रियांका पुरस्कार सोहळ्याच्या सादरकर्त्यांमध्ये सहभागी होणार आहे. फोंदासिओं लुई व्हुइटन येथे होणाऱ्या या सोहळ्यात डिओरच्या सदिच्छादूत जेनिफर लॉरेन्स आणि प्रियांका चोप्रा जोनस यांच्यासह लुई व्हुइटनची प्रतिनिधी असलेली उरासाया सहभागी होणार आहे. फॅशन क्षेत्रातील नव्या पिढीतील प्रतिभावंतांचा गौरव करणाऱ्या या सोहळ्यात यंदा नऊ उदयोन्मुख व नव्या दमाचे वस्त्ररचनाकार तीन प्रतिष्ठित पुरस्कारांसाठी स्पर्धा करणार आहेत.

# पाडलेल्या मशिदीखाली सापडली विहीर

**साहरनपूर, ६ सप्टेंबर**

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातील एका मशिदीच्या रचनेवरून वाद सुरू असतानाच, रविवारी त्या मशिदीच्या ढिगाऱ्याखाली सुमारे २० फूट खोल आणि दीड मीटर रुंद विहीर आढळून आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.




शनिवारी जवळपास १६ तास चाललेल्या मोहिमेत बुलडोझरचा वापर करून मशीद पाडल्यानंतर, दुसऱ्या दिवशी त्या जागेवरील ढिगारा हटवला जात असताना ही विहीर आढळून आली. रविवारी सकाळी ढिगारा हटवताना एक स्लॅब आढळून आला. कटरच्या साहाय्याने तो स्लॅब कापल्यानंतर, त्याच्या खाली विहीर असल्याचे दिसून आले, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली. ही बाब उघडकीस आल्यानंतर काही वेळातच सहारनपूरचे उपविभागीय दंडाधिकारी सुबोध कुमार घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी त्या विहिरीचा प्राचीनत्व व इतिहास जाणून घेण्यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाला सूचित केले.

ती विहीर साधारणपणे शंभर वर्षे जुनी असावी असे दिसते; मात्र, तिचे नेमके वय आणि ऐतिहासिक महत्त्व पुरातत्व तज्ज्ञांच्या तपासणीनंतरच निश्चित होईल. पूर्वीच्या काळी, जेव्हा नळाद्वारे पाणीपुरवठा उपलब्ध नव्हता, तेव्हा विहिरी हा लोकांसाठी पाण्याचा एक महत्त्वाचा स्रोत होता. धार्मिक विधींसाठी आणि अंघोळीसाठी लागणाऱ्या पाण्याकरिताही पारंपरिकरीत्या विहिरींचा वापर केला जात असे; आजही अनेक जुन्या मशिदींच्या परिसरात विहिरी पाहायला मिळतात. विहिरीत माती आणि कचरा पडू नये म्हणून सध्या ती लोखंडी पत्र्याने झाकून ठेवण्यात आली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात असलेली एक मशीद शनिवारी कडेकोट पोलीस बंदोबस्तात पाडण्यात आली. (वृत्तसंस्था)

### बजरंग दलाने दाखल केली होती याचिका

२०२५ मध्ये, बजरंग दलाचे प्रादेशिक संयोजक विकास त्यागी यांनी शहर दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात एक याचिका दाखल करून, जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील इमारत बेकायदेशीर असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर, सहारनपूरच्या शहर दंडाधिकाऱ्यांनी ती वास्तू बेकायदेशीर घोषित करून ती पाडण्याचा आदेश दिला. मशीद व्यवस्थापन समितीने या आदेशाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील केले, परंतु न्यायालयाने २ सप्टेंबर रोजी ते फेटाळून लावले.

# इंधन टँकरच्या स्फोटात ११ जणांचा मृत्यू

**तेहरान, ६ सप्टेंबर**

पश्चिम इराणमध्ये एका इंधन टँकरचा स्फोट होऊन ११ जणांचा मृत्यू झाला व ७ जण जखमी झाले, असे सरकारी माध्यमांनी सांगितले. इराणची राजधानी तेहरानपासून पश्चिमेला सुमारे ४०० किलोमीटर (२४८ मैल) अंतरावर असलेल्या कुर्द शहर सनंदाजजवळील वाहतूक पोलिस ठाण्याजवळ, टँकरने इतर गाड्यांना धडक दिल्यानंतर त्याला आग लागली.

सदोष ब्रेक प्रणालीमुळे हा अपघात घडला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

२०१८ मध्ये, सनंदाजजवळ इंधन टँकर व आंतरशहरी प्रवासी बस यांच्यात झालेल्या अशाच एका रस्ते अपघातात १५ जणांचा मृत्यू झाला होता व चार जण जखमी झाले होते.

इराणमध्ये दरवर्षी रस्ते आणि वाहतूक अपघातांमध्ये १७,००० हून अधिक लोकांचा मृत्यू होतो. असुरक्षित वाहने, वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष आणि अपुऱ्या आपत्कालीन सेवा ही या उच्च मृत्यूदराची कारणे असल्याचे तज्ज्ञ सांगतात. (वृत्तसंस्था)

## अग्रलेख

# आशेचा किरण

निबिड अंधारात दूर जंगलात कुठेतरी दिवा लुकलुकावा आणि प्रकाशाचा आशादायी किरण दृष्टिपथास पडावा, अशी थोडीशी सकारात्मक स्थिती सध्याच्या संघर्षांच्या धामधुमीत निर्माण झाली आहे. गेली पावणे पाच वर्षे लष्करीदृष्ट्या बलाढ्य असलेल्या रशिया आणि युक्रेन हा तुलनेने कमजोर देश यांच्यात युद्ध सुरू आहे. कोरोनासारख्या महामारीतून जग सावरत नाही तोच रशिया-युक्रेन यांच्यातील रक्तरंजित संघर्षाला प्रारंभ झाला. महामारीच्या काळात अनेक देशांच्या अर्थव्यवस्था बिकट परिस्थितीतून जात असताना जगाला आणखी एका दीर्घ संघर्षाचा सामना करावा लागत आहे. दोन्ही देशांची कधीही भरून न निघणारी मनुष्यहानी झाली असून, आता अमेरिकेच्या हस्तक्षेपाने हा संघर्ष संपुष्टात येण्याची आशा निर्माण झाली आहे. अमेरिकेचे राजदूत जारेड कुश्नेर आणि स्टीव्ह विटकाफ मॉस्कोत दाखल झाल्यानंतर पुतिन यांनी ७२ तासांची युद्धबंदी जाहीर केली आहे. दोनच दिवसांपूर्वी युक्रेनने ड्रोन हल्ल्यांची मालिका सुरू करण्याची धमकी दिल्यानंतर रशियात प्रचंड खळबळ उडाली होती. अनेक विमानांची उड्डाणे रद्द केली गेली तर काही विमाने अर्ध्यातून परत बोलावली गेली. युक्रेनच्या या धमकीचा परिणाम म्हणजे रशिया चर्चेच्या टेबलावर येण्यास तयार झाला. अमेरिकेच्या राजदूतांची पुतिन यांच्याशी काय चर्चा झाली याचा तपशील बाहेर आला नसला तरी तीन दिवसांच्या युद्धबंदीनंतर युद्ध संपुष्टात येऊन शांतता निर्माण होण्याची आशा निर्माण झाली आहे. खुद्द डोनाल्ड ट्रम्प यांनी पुढाकार घेऊन संघर्ष थांबविण्यासाठी शांतता कराराचा मसुदा घेऊन दोन्ही राजदूतांना मॉस्कोकडे रवाना केले. कराराच्या तपशिलाबाबत मात्र, ट्रम्प यांनी माहिती दिली नाही. करारात काय दडले आहे, हे पुढील आठवड्यात जगाला दिसून येईल, असे त्यांनी त्यांच्या स्वभावाप्रमाणे 'अनिश्चित' स्वरूपाचे उत्तर दिले. या युद्धाचा फटका युक्रेन आणि रशियाला तर बसलाच; शिवाय अमेरिकेचेही या आगीत हात पोळले गेले आहेत. कारण, ट्रम्प यांना युक्रेन आणि इराण, अशा दोन आघाड्यांवर लढावे लागत आहे. खरे, तर युक्रेनला नाटो संघटनेत आणण्याच्या अमेरिकेच्या हट्टामुळेच हे युद्ध सुरू झाले. युक्रेनने तटस्थ राहावे आणि आमच्या उशाशी शत्रू उभा नको, अशी भूमिका पुतिन यांनी घेतली होती. मात्र, काहीही झाले तरी नाटोत जाणारच, असा हट्ट धरून झेलेन्स्की यांनी देशाचा विनाश ओढवून घेतला. मॉस्कोनंतर अमेरिकेचे दोन्ही दूत युक्रेनमध्ये असून ते झेलेन्स्की यांच्या गळी शांततेचे महत्त्व उतरविण्याचा प्रयत्न करणार आहेत. पुतिन यांच्यानंतर झेलेन्स्की यांनीही युद्धविरामाचे पालन करणार असल्याचे जाहीर केले आहे. २०२२ पासून सुरू झालेल्या या युद्धात दोन्ही देशांचे प्रचंड मानवी आणि आर्थिक नुकसान झाले आहे. युक्रेनचे तर पार कंबरडे मोडले असून, रशियाची आर्थिक घडी पूर्णपणे विस्कटली. खनिजसंपन्न असलेल्या रशियावर भारताकडून पेट्रोल, डिझेल विकत घेण्याची वेळ आली आहे. कारण, युक्रेनच्या पायाभूत सुविधांची जेवढी हानी झाली नसेल, त्यापेक्षा कितीतरी पटीने रशियाच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पांचे नुकसान झाले. खोलवर शिरून ड्रोनद्वारे रशियाच्या प्रकल्पांचे युक्रेनने अतोनात नुकसान केल्याने तेल आयात करण्याची वेळ पुतिन यांच्यावर ओढवली आहे. या दोन्ही देशांतील संघर्षाचे परिणाम केवळ युरोपपुरते मर्यादित राहिलेले नाहीत तर जागतिक अर्थव्यवस्थेवरही झाले आहेत. युद्धानंतर युक्रेनमधील कृषी उत्पादनही कमालीचे घटले आहे. गहू, मका आणि सूर्यफुलाचा उत्पादक देश असलेल्या युक्रेनची कृषी अर्थव्यवस्था ढेपाळली आहे. त्याची झळ भारतालाही बसली आहे. युद्ध सुरू झाल्यापासून सूर्यफूल तेलाची आयात कमी झाल्याने खाद्यतेलाचे चढलेले भाव अजूनही उतरलेले नाहीत. युरोपियन देश गव्हाची आयात युक्रेनमधून करीत होते. युद्धामुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने महागाई वाढली.

विकास आणि वैभवाप्रत जाण्यासाठी शांततेची गरज असते, हे आता अमेरिका आणि रशियाला कळून चुकले आहे. शीतयुद्धाच्या काळात जग रशिया आणि अमेरिका या दोन देशांच्या पारड्यात जाऊन बसले असताना भारताने शांततेचा मार्ग स्वीकारत तटस्थतेचे धोरण स्वीकारले; ज्याचे फायदे आज आपल्याला दिसत आहेत. अमेरिका, चीनसारख्या महाशक्तींसह युरोपातील अनेक विकसित देशांच्या अर्थव्यवस्था गटांगळ्या खात असताना भारताचा विकासदर ७.८ असल्याची आकडेवारी नुकतीच बाहेर आली आहे. हे केवळ शांतता आणि संयमाच्या धोरणामुळेच शक्य झाले आहे. आताची वेळ ही संघर्ष करण्याची नव्हे तर संघर्षस्थळे (फ्लॅशपाईंट) नष्ट करण्याची आहे. आजमितीला जगात काश्मीर, गाझा, तैवान ही धगधगती ज्वालास्थळे आहेत. गाझाचा मुद्दा इस्रायलने आपल्या पद्धतीने निकाली काढला असला तरी त्याच्याशी 'मुस्लिम उम्माह' भावना जुळलेल्या असल्याने तो कायमचा धगधगत राहणार आहे. आशियातील सर्वांत धोकादायक संघर्षस्थळ म्हणजे काश्मीर होय. भारत आणि पाकिस्तान यांच्यात या मुद्यावरून तीन मोठी युद्धे आणि कारगिल, 'ऑपरेशन सिंदूर'सारख्या लढायाही झाल्या आहेत. मोदी सरकार आल्यापासून पाकिस्तानला काश्मीरच्या मुद्यावर आक्रमक नव्हे तर बचावात्मक पवित्रा घ्यावा लागत आहे. पूर्वी जम्मू-काश्मीरमध्ये बेधडक कारवाया करीत हल्ले करणाऱ्या पाकिस्तानला आता हजारदा विचार करावा लागत आहे.

चीनच्या पायथ्याशी असलेला तैवानचा मुद्दाही तसाच. चीनची गिधाड नजर या देशावर आहे. तथापि, अमेरिकेचे लष्करी सहकार्य आणि स्वतःची अत्याधुनिक संरक्षण यंत्रणा, यामुळे चीन तैवानवर हल्ला करण्याचे धाडस करणार नाही. जगात सध्या सुरू असलेल्या संघर्षात सतत युद्धाची खुमखुमी बाळगणारे दोन पहेलवान मात्र गार झाले आहेत. जी अमेरिका जगाला आर्थिक आणि लष्करी बळावर धाकात ठेवण्याचा प्रयत्न करीत होती, तिला इराणने घायकुतीला आणले. चार-पाच दिवसांमध्ये इराणला शरण आणू, अशा वल्गना करणारे ट्रम्प यांचे डोळे पांढरे होण्याची वेळ आली आहे. इराण-अमेरिका संघर्ष सातव्या महिन्यांत पोहचला आहे. सध्या दोन्ही देश एकमेकांवर हल्ले करीतच आहेत. दोघांकडील शस्त्रांची भंडारे रिकामी होत असून गेल्या काही दिवसांपासून इराणचा प्रतिकार काही प्रमाणात थंडावला आहे. दुसरीकडे युक्रेन अतोनात नुकसान सहन करूनही मैदानात शड्डू ठोकून उभा आहे. अमेरिकेच्या गर्वाचे हरण केवळ रशियाच करू शकतो, असा जो समज होता, तो युक्रेनने मोडून काढला, असेच म्हणावे लागेल. मध्यपूर्व आणि युरोप-बाल्कन क्षेत्रात सुरू असलेले दोन्ही संघर्ष जेव्हा केव्हा संपुष्टात येतील, त्यानंतरच जगात दीर्घकाळ शांतता नांदण्याची शक्यता आहे. कारण, सध्या रशिया आणि अमेरिका उरलीसुरली इभ्रत वाचविण्यासाठीच धडपडत आहेत. दोन्ही देश संघर्षातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधत असले तरी तो त्यांना अजूनतरी सापडलेला नाही. संघर्ष संपल्यानंतर 'वर्ल्ड ऑर्डर' बदललेली असेल, एवढे मात्र निश्चित. कारण, युद्धामुळे रशिया-अमेरिकेची प्रचंड हानी झाली आहे. त्यातून बाहेर पडण्यासाठी अनेक वर्षे लागतील. या युद्धाचा सर्वाधिक फायदा झाला तो दगाबाज चीनला. त्याला अमेरिका-इराण युद्धाची फारशी झळ बसली नाही. 'बळी तो कानपिळी' या म्हणीप्रमाणे त्याने होर्मुझच्या खाडीतून कच्च्या तेलाचा पुरवठा अखंडित ठेवला. चिनी तेलवाहू जहाजांवर हल्ला करण्याची हिंमत अमेरिकेची झाली नाही. भारताला या मध्यपूर्वेतील युद्धाचा फटका बसला आहे. इंधनाचा पुरवठा काही विस्कळीत झाल्याने किमती वाढवाव्या लागल्या. त्यामुळे अमेरिकेने रशिया-युक्रेनमध्ये विशेष दूत पाठवून शांतता प्रस्थापित करण्याच्या दिशेने जे पाऊल टाकले त्याचे स्वागत करायला हवे. अत्यंत भीषण स्थितीत आशेचा किरण दिसला आहे, एवढाच सध्याचा दिलासा. ■

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# चर्चा एका अप्रकाशित पुस्तकाची

ऑस्कर वाईल्ड या प्रसिद्ध साहित्यिकाने म्हटले आहे, ''आपल्या स्मृती म्हणजे आपली डायरी, जी सतत आपण आपल्याजवळ बाळगतो''. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी आपल्या स्मृतींची डायरी लिहून काढली असून, ती 'बिलाँगिंग : ए जर्नी ऑफ लव्ह' या नावाने पुस्तकाच्या रूपात प्रसिद्ध होणार आहे. मात्र पुस्तकाच्या प्रकाशनापूर्वीच त्यात आलेल्या अडचणींनी या पुस्तकाची उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे.

प्रारंभी, सोनिया गांधी यांच्या आठवणीचे संकलन असणारे हे पुस्तक पेंग्विन रँडम हाऊस इंडिया या प्रकाशन संस्थेतर्फे प्रसिद्ध होणार होते, पण संस्थेने त्यास नकार दिल्यानंतर पेंग्विन इंटरनॅशनलतर्फे ते प्रसिद्ध होऊ घातले आहे. पेंग्विन इंडियाने पुस्तक प्रकाशनास नकार दिल्यानंतर या पुस्तकात आहे तरी काय याची जोरदार चर्चा राजधानीत केली जात आहे.

**काही भागावर आक्षेप :** सोनिया गांधी यांनी आपल्या पुस्तकाचा मसुदा सर्वप्रथम पेंग्विन रँडम हाऊसकडे पाठविला. प्रथम या प्रकाशकाने सोनिया गांधींचे पुस्तक प्रकाशित करण्यास होकार दिला होता. नंतर मात्र प्रकाशकाला पुस्तकातील काही भाग अडचणीचा वाटू लागला. त्याने सोनिया गांधींसोबत सविस्तर चर्चा केली व काही भाग वगळण्याची विनंती केली. सोनिया गांधी त्यास तयार नव्हत्या असे समजते. प्रकाशक व सोनिया गांधी यांच्यात तीन-चार भेटी झाल्याचे समजते.

पुस्तकातील कोणताही भाग गाळला - वगळला जाणार नाही हे सोनिया गांधी यांनी स्पष्ट केल्यानंतर प्रकाशकाने पुस्तक प्रकाशित करण्यास आपली असमर्थतता त्यांना कळविली. यानंतर आता दुसऱ्या एका प्रकाशकाकडे म्हणजे पेंग्विन इंटरनॅशनलकडे हे काम सोपविण्यात आले असून, सध्याच्या वेळापत्रकानुसार १० नोव्हेंबर रोजी हे पुस्तक प्रकाशित केले जाणार आहे.

**कोणता भाग ? :** पेंग्विन इंडियाला नेमक्या कोणत्या भागावर आक्षेप होता हे मात्र समजू शकलेले नाही. याबाबतीत काही तर्क-वितर्क केले जात आहेत. पंतप्रधान मोदींबाबत सोनिया गांधींचे निरीक्षण, भारत-चीन सीमा प्रश्न हाताळताना सरकारची भूमिका हे काही वादाचे मुद्दे असल्याचे सांगितले जाते. पण, बहुतेक निरीक्षकांच्या मते हे मुद्दे तसे किरकोळ आहेत. मग, नेमक्या कोणत्या कारणांसाठी पेंग्विनने पुस्तक प्रकाशित करण्यास नकार दिला? कोणत्या बाबी पुस्तकातून वगळण्याचा सल्ला पेंग्विनने दिला होता व सोनिया गांधींनी तो का मानला नाही याबाबत उलटसुलट चर्चा केली जात आहे.

**२००४ ते २०१४ :** २००४ ते २०१४ या दहा वर्षांत काँग्रेस पक्ष केंद्रात सत्तेत होता. डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान असले तरी खरी सत्ता सोनिया गांधी व त्यांचे सल्लागार अहमद पटेल यांच्याच हाती होती. यातील एक योगायोग म्हणजे अहमद पटेल हे गुजरातचे होते. २००४ ते २०१४ या १० वर्षांत देशात बऱ्याच राजकीय घडामोडी घडल्या. त्या सर्वांची कल्पना सोनिया गांधी यांना होती. काही महत्त्वाचे दस्तावेज त्यांच्याजवळ होते. त्याचा वापर त्यांनी पुस्तकात केला आहे काय, असा प्रश्न विचारला जात आहे. केला असल्यास कोणत्या विषयांबाबत ते दस्तावेज आहेत याचीही चर्चा केली जात आहे. पेंग्विनने पुस्तक प्रसिद्ध करण्यास नकार दिला याचा अर्थ कोणते तरी गंभीर विषय असावेत जे प्रसिद्ध करणे पेंग्विनला शक्य नव्हते. अन्यथा एवढे महत्त्वाचे पुस्तक प्रकाशित करण्यास पेंग्विनसारख्या नामांकित प्रकाशक संस्थेने नकार दिला नसता.

**१९९८ ते २००४ :** १९९८ ते २००४ या काळात केंद्रात अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार होते. सोनिया गांधी काही व्यक्तिगत कामांसाठी वाजपेयींना भेटल्या होत्या, त्यावेळी वाजपेयींनी त्यांना त्याबाबत निश्चिंत राहण्यास सांगितले होते. सोनिया गांधींच्या उपस्थितीतच त्यांनी आपले मुख्य सचिव ब्रिजेश मिश्रा यांना बोलावून सोनिया गांधींच्या समस्यांकडे स्वतः लक्ष घालण्याचा आदेश मिश्रा यांना दिला होता. मिश्रा यांनी स्वाभाविकच अटलबिहारी वाजपेयींच्या आदेशाचे पालन केले. नंतर काही वर्षांनी जेव्हा ब्रिजेश मिश्रा यांचे निधन झाले, त्यांच्या अन्त्यसंस्कारात सोनिया गांधी स्वतः सामील झाल्या होत्या. यावरून सोनिया गांधी व ब्रिजेश मिश्रा यांच्यात किती जवळीक व विश्वास होता याचा अंदाज बांधला जातो. सोनिया गांधींनी आपल्या पुस्तकात या साऱ्याचा उल्लेख केला आहे काय, असाही प्रश्न विचारला जातो.

**तणावाचे प्रसंग :** वाजपेयींचे सरकार असताना सरकार व विरोधी पक्ष यांच्यात तणावाचे काही प्रसंग निर्माण झाले होते. याचा परिणाम म्हणजे संसदेचे कामकाज प्रभावित होत होते. हा तणाव दूर करण्यासाठी सरकारच्यावतीने काही 'दूत' १०- जनपथला पाठविण्यात आले. त्यांनी सोनिया गांधींशी चर्चा केली आणि नंतर हा तणाव निवळण्यात मदत झाली होती. म्हणजे १९९८ ते २००४ हा वाजपेयी सरकारचा कालखंड, नंतर २००४ ते २०१४ हा मनमोहनसिंह सरकारचा कालावधी व २०१४ पासून मोदी सरकार या तीन कालखंडाची चर्चा सोनिया गांधींनी आपल्या पुस्तकात केलेली असू शकते. मात्र यातील कोणता भाग पेंग्विनला खटकला हे मात्र समोर आलेले नाही. त्यासाठी पुस्तक प्रकाशित होण्याचीच प्रतीक्षा करावी लागेल.

**बोफोर्स प्रकरण :** एकेकाळी गाजलेल्या बोफोर्स दलाली प्रकरणात क्वाट्रोकी या इटालियन व्यापाऱ्याचे नाव बरेच गाजले होते. या व्यापाऱ्याचे सोनिया गांधींशी घरगुती संबंध असल्याचे मानले जात होते. बोफोर्स प्रकरणामुळे १९८९ च्या निवडणुकीत काँग्रेसला सत्ता गमवावी लागली. तेव्हाचे सरंक्षण मंत्री व्ही. पी. सिंग यांनी सरकारमधून व काँग्रेसमधून राजीनामा दिला हे तर जगजाहीर आहे. मात्र, संरक्षण राज्यमंत्री व राजीव गांधींचे जिवलग मित्र अरुण सिंग यांनी का राजीनामा दिला व नंतर ते का विजनवासात गेले याचे गूढ आजही कायम आहे. स्वतः अरुण सिंग यांनी याबाबत कोणतीही टिप्पणी केलेली नाही. त्याचप्रमाणे बोफोर्स प्रकरण उघड करण्यात स्व. अरुण नेहरू या मंत्र्यांची भूमिका होती असेही मानले जाते. या साऱ्यावर सोनिया गांधींनी काही प्रकाश टाकला आहे काय याची चर्चा केली जात आहे.

**आणखी एक पुस्तक :** राजधानीत आणखी एका पुस्तकाची चर्चा केली जात आहे. दिवंगत काँग्रेस नेते व कधीकाळी गांधी परिवाराचे विश्वासू सल्लागार कुंवर नटवरसिंग यांनी लिहिलेले हे पुस्तक आहे. या पुस्तकात त्यांनी मनमोहनसिंग यांची पंतप्रधानपदी कशी निवड झाली याचा उल्लेख केला आहे. एका बैठकीत स्वतः नटवरसिंग यांच्या व्यतिरिक्त सोनिया गांधी, मनमोहनसिंग व राहुल गांधी हे चारच लोक उपस्थित होते. सोनिया गांधी पंतप्रधान होण्यास तयार होत्या, पण राहुल गांधी त्यास तयार नव्हते अशी माहिती पुस्तकात देण्यात आली आली आहे.

**डॉ. कलाम यांचा विरोध ? :** तत्कालीन राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या विरोधामुळे सोनिया गांधी पंतप्रधान होऊ शकल्या नाहीत असाही दावा अधूनमधून केला जातो. सोनिया गांधी पंतप्रधान न होण्याचे नेमके कारण कोणते? डॉ. कलाम यांचा विरोध की राहुल गांधींचा नकार? सोनिया गांधी यांनी आपल्या पुस्तकात यावर चर्चा केली असावी असा एक तर्क दिला जात आहे.

**१० नोव्हेंबरचा मुहूर्त ? :** पुस्तक प्रकाशनासाठी १० नोव्हेंबर ही तारीख ठरविण्यात आली आहे. वास्तविक हा सोनिया गांधी, राजीव गांधी यांच्यासाठी तसा खास दिवस नाही. मग, १० नोव्हेंबरची तारीख का ठरविण्यात आली आहे? नोव्हेंबर महिन्यात संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू होते. या पुस्तकात काही वादाचे मुद्दे असल्यास त्याचे पडसाद अधिवेशनात उमटणार हे ठरले आहे. ■

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# 'जेन-झी'चा देवधर्म

सणांच्या भाऊगर्दीत नेहमीच तरुणवर्ग उत्साहाने सहभागी होत राहिला आहे. घरगुती सण असो किंवा सार्वजनिक, तरुणाचा उल्हास काही वेगळाच असतो. किंबहुना त्यांच्या भरवशावरच घरीदारी सणावारांची मदार असते. अजूनही चित्र फारसे बदललेले नाही, पण नवी पिढी मात्र जरा वेगळी आहे. विशीत असणारे तरुण-तरुणी आपल्याच विश्वात रमलेले असतात. फोन आणि टॅबमध्ये गुंतलेली ही पिढी घरात आणि बाहेरही सणांच्या जल्लोषात झोकून देत सहभागी होत नाही. असे असले तरी त्यांचा देवावर विश्वास नाही, हे म्हणताच येणार नाही. नवीन पिढीने आपले श्रद्धास्थान ठरवले आहे. फक्त त्यांची भक्तीची पद्धत वेगळी आहे. ते जास्तीत जास्त वेळ ऑनलाईन असतात. त्यामुळे त्यांच्या भक्तीची वाट ते समाज माध्यमांद्वारे ठरवतात आणि त्याद्वारेच त्यांची भक्ती चालते. एका सर्वेक्षणानुसार, ६८ टक्के तरुणांचे म्हणणे आहे की, त्यांचा विश्वास, धर्म किंवा आध्यात्मिक प्रवास त्यांना पटणाऱ्या गोष्टींशी निगडित असतो. त्यांना जे दैवत पटेल त्याचीच ते आराधना करतात. ज्यांना आपण अधार्मिक म्हणू अशा युवावर्गातील एक तृतीयांश मुले-मुली कोणत्या तरी सुपर पॉवरवर विश्वास ठेवतात. प्रत्येक चारपैकी एका जेन-अल्फाचे म्हणणे आहे की, ऑनलाईन शिकलेल्या गोष्टींमुळे किंवा ऑनलाईन भेटलेल्या लोकांमुळे त्यांची श्रद्धा बदलली आहे. समोरासमोरच्या संवादापेक्षा ऑनलाईन विश्वास किंवा आध्यात्मिक विषयांबद्दल अधिक शिकतात. आजची तरुणाई करीअर, शिक्षण, नातेसंबंध आणि भविष्याच्या चिंतांमध्ये सतत धावत असते. अशा वेळी काही क्षण स्वतःसाठी देणे, शांत बसणे, ध्यान करणे किंवा आवडते संगीत ऐकत मन एकाग्र करणे, यामधून त्यांना मानसिक समाधान मिळतं. अनेक तरुण योग, मेडिटेशन, माईंडफुलनेस आणि निसर्गाच्या सान्निध्याकडे आकर्षित होत आहेत. त्यांच्यासाठी अध्यात्म म्हणजे जगापासून दूर जाणे नव्हे, तर गोंधळलेल्या जगात स्वतःचा समतोल शोधणे आहे.

घरात होत असलेले सोहळे आणि सोवळे कदाचित त्यांना आवडत नाहीत, पण त्यांचा देवाला अजिबात विरोध नाही. जिथे त्यांची श्रद्धा असेल तिथे ते आवर्जून झुकतात आणि एकदा झुकले की ते कायम त्या दैवताची आराधना करतात. मात्र, संघर्ष तेव्हा होतो जेव्हा ते घरातील कुळाचारावर प्रश्न उपस्थित करतात किंवा त्यांच्या दृष्टीने बरेच कर्मकांड हे अवाजवी असतात. त्यांच्या 'प्रॅक्टिकल ॲप्रोच'मध्ये न बसणाऱ्या गोष्टी दिसल्या की त्यांना अविश्वास जाणवतो. तशा कोणत्याही गोष्टींना ते जुमानत नाही आणि मानतही नाहीत. घरच्यांना त्यांचे हे वागणे विक्षिप्त वाटत असल्याने संघर्षाची ठिणगी पडते. या ठिकाणी घरच्या मोठ्या मंडळींनी हे समजून घेतले पाहिजे की ही पिढी नेमकी कशी आहे. जेन-झी प्रश्न विचारणारी पिढी आहे. त्यामुळे कोणतीही गोष्ट केवळ परंपरा आहे म्हणून स्वीकारण्यापेक्षा 'यामागचा अर्थ काय?' हे जाणून घेण्याची त्यांची वृत्ती आहे. धर्म आणि अध्यात्म यांच्यातील फरकही त्यांना जाणवतो. श्रद्धा असावी, पण त्यासोबत विवेकही असावा, असा त्यांचा दृष्टिकोन आहे. त्यामुळे मंदिरात जाण्याबरोबरच ध्यानधारणा, सामाजिक कार्य, गरजू व्यक्तीला मदत करणे किंवा पर्यावरणाची काळजी घेणे यामध्येही त्यांना अध्यात्म जाणवते.

जेन-झी आणि जेन-अल्फा धार्मिक माहितीसाठी युट्युब, इन्स्टाग्राम, चॅटबॉट यांसारख्या साधनांवर सर्वाधिक अवलंबून आहेत. व्हिज्युअल ॲनिमेशन, थ्रीडी पौराणिक कथा आणि छोटे आध्यात्मिक उपदेश त्यांना आकर्षित करतात. तरुण आणि किशोर फक्त कथा ऐकत नाहीत, तर रोब्लॉक्ससारख्या आभासी प्लॅटफॉर्मवर डिजिटल पद्धतीने तयार केलेल्या मंदिरे आणि धार्मिक उत्सवांचा भाग बनत आहेत. ॲप-आधारित आरती, थेट मंदिर दर्शन आणि एआय चालीसा, मंत्र ॲप्सने देवाशी त्यांचे नाते सुलभ आणि वैयक्तिक बनवले आहे. मुळात, डिजिटल युगातील जेन-झी आणि जेन-अल्फा यांची श्रद्धा त्यांच्या आधीच्या पिढ्यांपेक्षा वेगळी आहे. ते प्रत्येक गोष्टीला स्वतःच्या कसोटीवर पारखून पाहतात आणि मगच विश्वास ठेवतात. या पिढ्यांसाठी श्रद्धा महत्त्वाची आहे, कारण त्यातून त्यांना शांती आणि आनंद मिळतो. आजच्या धावपळीच्या काळात बाहेरच्या जगाशी जोडलेले राहणे जितके आवश्यक आहे, तितकेच स्वतःशी जोडलेले राहणेही महत्त्वाचे आहे. हे जेन-झी हळूहळू ओळखत आहे. म्हणूनच त्यांच्या अध्यात्मात भीतीपेक्षा आशा, बंधनांपेक्षा स्वातंत्र्य आणि नकारात्मकतेपेक्षा सकारात्मकतेला अधिक महत्त्व आहे. तंत्रज्ञानाच्या युगात जगाशी कनेक्ट असलेली ही पिढी आता स्वतःच्या मनाशी 'कनेक्ट' होण्याचा प्रयत्न करत आहे. कदाचित हाच जेन-झीच्या अध्यात्माचा सर्वांत सुंदर पैलू आहे. ■

७७५५९३८८२२

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# कृष्णं वंदे जगद्गुरुम्

अर्जुनाचे नव्हे, तर केवळ संपूर्ण विश्वाचे मार्गदर्शक असलेल्या भगवान श्रीकृष्णांना सादर नमन, अभिवादन! ज्या ज्या वेळेला जन्माष्टमी येते, त्या त्या वेळेला संपूर्ण देश युगपुरुषाचा जन्मोत्सव साजरा करण्यासाठी अतिशय उत्साहित असतो; आणि त्याचे कारण सुद्धा स्वाभाविक आहे. भगवान श्रीकृष्ण हे सर्व समाजजीवनाचे आदर्श आहेत. आज व्यक्तीच्या जीवनामध्ये अनेक संकटे, हालअपेष्टा, अपमान असे प्रसंग आपल्याला दिसतात. काही लोक त्या प्रसंगाने खचून जातात, काही लोक आत्महत्येसारखा अतिशय निकृष्ट मार्ग सुद्धा स्वीकारतात. परंतु भगवान श्रीकृष्णाचे जीवन जर अशा लोकांनी बघितले, तर त्यांना असे लक्षात येईल की, भगवान श्रीकृष्णाच्या जीवनामध्ये सुद्धा त्यांना आपल्या आई-वडिलांसोबत सुद्धा राहता आले नाही. एका सामान्य बालकाचा आपल्या आईच्या कुशीत निजण्याचा, दूध पिण्याचा जो अधिकार आहे, तो सुद्धा त्यांना मिळाला नाही. लहानपणापासूनच त्यांनी कोणाचे काहीही वाईट केलेले नसताना सुद्धा त्यांना सातत्याने आपल्या जीवाचे रक्षण करण्यासाठी संकटांचा सामना करावा लागला. परंतु हे सर्व घडत असताना त्यांची चाणाक्ष वृत्ती कायम होती. अगदी बालपणी सुद्धा प्रेमाच्या गोष्टी करणाऱ्या आणि त्यांना ममतेने दूध पाजायला आलेल्या पूतनेला सुद्धा त्यांनी ठार मारले. यावरून आपल्या असे लक्षात येते की, भगवान श्रीकृष्ण हे कपट-कारस्थान यांना लगेच ओळखणारे होते. पूतनेच्या खोट्या प्रेमाला ते बळी पडले नाहीत; या उलट, खोटं प्रेम प्रदर्शित करणाऱ्या पूतनेचा अंत त्यांनीच केला. कर्तव्य मार्गावर चालण्यासाठी त्यांनी गोप-गोपिकांचे प्रेमाचे पाश सुद्धा अलगद तोडून टाकले.

आपल्या शक्तीच्या जोरावर जनतेला भयभीत करणारा कालिया नाग यमुनेमध्ये राहत होता. त्या कालिया नागाचे सुद्धा मर्दन हे भगवान श्रीकृष्णांनी केलेले होते. आज समाजामध्ये सुद्धा असे अनेक कालिया आहेत, की जे आपल्या शक्ती, पैसा, सत्ता याच्या जोरावर जनतेला भयभीत करण्याचे काम करीत असतात. परंतु कालियाचे मर्दन हे समाजपुरुषाने करायला पाहिजे, हीच कृष्णनीती आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुद्धा कृष्णनीती त्यांच्या जीवनामध्ये अंगीकारलेली होती. ज्या अफजल खानाने अनेक हिंदू राजांना बंदी बनवले होते, अनेकांना ठार मारले होते, तो अफजल खान पुन्हा एकदा ज्या वेळेला छत्रपती शिवाजी महाराजांना भेटीच्या बहाण्याने बोलावून ठार मारण्याचा विचार करीत होता; तो स्वतःला मोठा शिकारी समजत होता, परंतु प्रतापगडाच्या पायथ्याशी त्याची शिकार झाली. प्रतापगडाच्या पायथ्याशी याची साक्ष आजही उपस्थित आहे.

भगवान श्रीकृष्णांनी त्यांच्या जीवनामध्ये अनेकांना मार्गदर्शन केलेले आहे. आज अनेक विद्यार्थी हे समाजमाध्यमांच्या म्हणजे इन्स्टाग्राम, फेसबुक आणि रील्स याच्यामध्ये अडकलेले दिसून येतात. आज विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये अभ्यास आणि करीअर यापेक्षाही मोठे अनेक मोहपाश दिसून येतात. त्या मोहपाशांनी बद्ध झालेला विद्यार्थी अनेक वेळा आपला मार्ग विसरतो. अशा ध्येयहीन युवकांना मार्गदर्शन करण्याचे काम कृष्णनीती आणि भगवान श्रीकृष्ण करू शकतात.

मोहग्रस्त झालेल्या अर्जुनाला सुद्धा त्यांनी गीतेचे अमृत दिलेले आहे. आज वळणावळणावर अनेक अर्जुन उभे आहेत, त्यांना मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. भगवान श्रीकृष्णांचे जीवन, त्यांनी दिलेला संदेश हा विद्यार्थ्यांना आजही मार्गदर्शक आहे. भगवान श्रीकृष्ण हे उत्तम शिक्षक होते; त्यांनी धर्म-अधर्माचे शिक्षण दिले, कर्तव्याचे शिक्षण दिले आणि म्हणूनच अर्जुन महाभारतात चांगला पराक्रम गाजवू शकला. म्हणजे केवळ ज्ञान असणे हेच पुरेसे नाही, तर त्या ज्ञानाचा योग्य उपयोग योग्य वेळेस करणे हे सुद्धा फार महत्त्वाचे आहे.

आता नुकताच शिक्षक दिवस सुद्धा साजरा करण्यात आलेला आहे. शिक्षकांनी सुद्धा भगवान श्रीकृष्णांच्या जीवनापासून प्रेरणा आणि संदेश घेण्याची आवश्यकता आहे. आपल्या जीवनाचे ध्येय काय असले पाहिजे? आपल्या जीवनाची सार्थकता कशाकरिता आहे? याचाही प्रत्येक शिक्षकाने विचार करणे आवश्यक आहे. शिक्षक हा जर केवळ पोटार्थी असला, तर त्याच्या जीवनाचे सार्थक होणार नाही. कारण ईश्वराच्या कृपेमुळे त्यांना असे काम मिळालेले आहे, की त्या कामातून उत्तम विद्यार्थी घडू शकतात आणि उत्तम विद्यार्थी देशाचे भविष्य घडवू शकतात. म्हणून शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या भविष्याकडे लक्ष देऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे. शिक्षक दिवस हा ज्यांनी आमच्या जीवनामध्ये कुठल्या ना कुठल्या प्रकारे शिक्षा, दीक्षा, ज्ञान दिलेले आहे, अशा सर्व शिक्षकांचा स्मरण करण्याचा दिवस आहे. हे स्मरण या निमित्ताने सर्व विद्यार्थी करतात. ज्या वेळेला डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना विचारले गेले की, तुम्हाला 'मिसाईल मॅन' म्हणून लक्षात ठेवलेले आवडेल की शिक्षक म्हणून? तर त्या वेळेला त्यांनी सांगितले की, मला शिक्षक म्हणून लक्षात ठेवलेले आवडेल. भारतात निर्माण झालेल्या अनेक महापुरुषांनी विद्यादानाचे पवित्र कार्य केलेले होते. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन ज्यांनी सुद्धा इतर सर्वच त्यांच्या जबाबदारीपेक्षा शिक्षक या जबाबदारीला श्रेष्ठ स्थान दिलेले आहे.

आज देशाला चांगल्या हुशार विद्यार्थ्यांची आवश्यकता आहे, पण त्याहीपेक्षा देशभक्त हुशार विद्यार्थ्यांची आवश्यकता अधिक आहे. शिक्षकांनी आपल्या ज्ञानदानाच्या कामामध्ये विद्यार्थ्यांना सामाजिक आणि राष्ट्रीय दृष्टिकोन देणे आवश्यक आहे. केवळ पुस्तकी ज्ञान घेतलेले विद्यार्थी हे त्यांच्या व्यक्तिगत जीवनामध्ये सुद्धा फारसे यशस्वी होऊ शकणार नाही; परंतु कुटुंब, समाज आणि राष्ट्र यांचा विचार करणारा विद्यार्थी हा अधिक प्रगल्भ आणि समंजस बनेल. शिक्षकांनी देशासाठी कार्य करू शकणारे विद्यार्थी बनविणे हेच त्यांचे जीवितकार्य असायला हवे. भगवान श्रीकृष्णांकडून कर्ममार्गाचा, जीवनाला सार्थकता देण्याचा हा संदेश सर्वांनीच ग्रहण करणे आवश्यक आहे. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### पर्यावरणपूरक उत्सवाचा संकल्प करूया

आठवडाभरात आपल्या लाडक्या गणरायाचे आगमन होणार आहे. गणेशोत्सव म्हटला की आनंद, उत्साह आणि भक्तीचे वातावरण निर्माण होते. घराघरांत बाप्पाच्या स्वागताची तयारी सुरू झाली आहे. बाजारपेठाही गणेशमूर्ती आणि सजावटीच्या साहित्याने सजल्या आहेत. पण या आनंदासोबत पर्यावरणाची जबाबदारीही आपलीच आहे. गणरायाची पूजा करताना निसर्गाची पूजा विसरता कामा नये. यंदा शक्य असेल तर शाडू मातीची मूर्ती घ्यावी. मूर्तीचा आकारही गरजेपुरताच ठेवावा. प्लॅस्टिक आणि थर्माकोलचा वापर शक्य तितका टाळावा. सजावटीसाठी कागद, कापड, बांबू आणि नैसर्गिक वस्तू वापराव्या. फुलांची सजावट केली तर नंतर ती फुले वेगळी जमा करावी. नदी, नाला किंवा तलावात टाकू नये. गणेश विसर्जनामुळे पाणी प्रदूषित होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. शक्य असल्यास घरच्या घरी किंवा कृत्रिम विसर्जनस्थळी विसर्जन करावे. गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणाचाही विचार करणे गरजेचे आहे. सार्वजनिक मंडळांनीही स्वच्छतेला प्राधान्य द्यावे. मंडप उभारताना रस्ते आणि वाहतुकीची अडचण होणार नाही याची काळजी घ्यावी. उत्सव संपल्यानंतर परिसरात कचरा राहता कामा नये. गणराया आपल्याला चांगले विचार करण्याची शिकवण देतो. म्हणून उत्सवातून समाजालाही चांगला संदेश मिळाला पाहिजे. प्रत्येक मंडळाने एक झाड लावण्याचा संकल्प केला पाहिजे. प्रत्येक घराने प्लॅस्टिक कमी करण्याचा निर्णय घेतला तर? प्रत्येक नागरिकाने आपला परिसर स्वच्छ ठेवला तर? तर गणेशोत्सवाचा आनंद आणखी मोठा होईल. भव्य सजावट करण्यापेक्षा सुंदर विचारांची सजावट महत्त्वाची आहे. मोठा आवाज करण्यापेक्षा चांगला संदेश मोठा झाला पाहिजे. नदीत कचरा टाकण्यापेक्षा एखादे झाड जगवणे मोठे काम आहे. बाप्पाच्या स्वागताबरोबर निसर्गाचे रक्षण करण्याची शपथ घेऊया. कारण हीच धरती आपल्या पुढच्या पिढीलाही मिळणार आहे. म्हणून भक्तीही हवी आणि पर्यावरणाची काळजीही हवी. उत्सवही हवा आणि स्वच्छताही हवी. जलस्रोतही हवेत आणि निसर्गही हवा. यंदा गणरायाला एकच सुंदर भेट देऊया स्वच्छ आणि निरोगी पर्यावरण!

**सचिन नागरे**/९६०४३२१४३२

### 'तडजोड' एक सुवर्णमध्य...


'तडजोड' म्हणजे स्वतःला कमी लेखणे किंवा हार मानणे नव्हे, तर तो एक उच्च दर्जाचा समजूतदारपणा आहे. आजच्या धावपळीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात हाच मध्यम मार्ग उपयुक्त ठरतो. तडजोड अशी असावी जिथे दुःखाचा तडा दोघांनाही जाता कामा नये आणि सुखाची जोड दोघांनाही मिळाली पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत सुवर्णमध्य काढता येणे हाच तडजोडीचा आत्मा आहे, कारण यामुळे दोघांनाही समसमान फायदा होतो.

संसारात आणि समाजात सलोखा राखण्यासाठी परिस्थितीनुसार स्वतःमध्ये बदल करून जुळवून घेणे गरजेचे असते, तर व्यावहारिक दृष्टिकोनातून स्वतःचे नुकसान न करता परिस्थितीला अनुकूल बनवणे हे प्रगतीचे एक प्रभावी साधन ठरते. तडजोड करताना आपण नक्की काय गमावत आहोत आणि काय मिळवत आहोत याचा विचार केला पाहिजे. नात्यात किंवा करारात तात्पुरती माघार घेतल्याने भविष्यात मोठा फायदा होणार असेल, तर ती तडजोड नक्कीच व्यवहार्य ठरते. उत्कृष्ट तडजोड तीच, जिथे दोन्ही पक्षांना आपला विजय झाल्यासारखे वाटते आणि सामंजस्याने सुवर्णमध्य गाठला जातो.

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

■■■

### जन्माष्टमी-एक धार्मिक आणि सामाजिक सण



श्रीकृष्ण जन्माष्टमी म्हणजे केवळ धार्मिक उत्सव नाही, तर तो मानवी नात्यांचा, एकतेचा आणि आनंदाचा सोहळा आहे. श्रावण महिन्यात मध्यरात्री अंधारलेल्या कारागृहात झालेला कृष्णजन्म आपल्याला हेच शिकवतो, की परिस्थिती कितीही कठीण असली तरी सत्याचा विजय निश्चित असतो. आजच्या धावपळीच्या आणि तणावाच्या युगात श्रीकृष्णाचे विचार प्रत्येक पिढीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांनी सुदाम्यासोबत निभावलेली मैत्री आपल्याला गरीब-श्रीमंतीच्या पलीकडचे निखळ प्रेम शिकवते, तर कुरुक्षेत्रावर अर्जुनाला दिलेला गीतेचा उपदेश आपल्याला आपले कर्तव्य बजावण्याची जाणीव करू देतो. 'फळाची अपेक्षा न ठेवता कर्म करत राहा.' हा त्यांचा सिद्धांत आजही व्यवस्थापन क्षेत्रापासून ते वैयक्तिक जीवनापर्यंत सर्वांना प्रेरणा देतो.

जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी साजरा होणारा 'गोपाळकाला' म्हणजेच दहीहंडी, आपल्याला जात-पाच विसरून एकत्र येण्याचा आणि संघभावनेचा संदेश देतो. उंचावर टांगलेली दहीहंडी फोडण्यासाठी रचले जाणारे मानवी मनोरे हे दाखवून देतात, की सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न केले, तर कोणतेही कठीण ध्येय गाठता येते. थोडक्यात सांगायचे तर, संकटातही हसतमुख राहून आणि बासरीच्या सुरांप्रमाणे जीवनात गोडवा टिकवून मार्ग कसा काढावा, हेच कृष्णचरित्र आपल्याला शिकवते. हाच या उत्सवाचा खरा संदेश आहे. ■

**अपर्णा अग्निहोत्री**/नागपूर

# ‘विमानसेवेचा खेळखंडोबा’ सोलापूरच्या विकासासाठी धोक्याची घंटा!

## सोलापूर विकास मंचने व्यक्त केली भीती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -**

सोलापूरच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली विमानसेवा दिवसेंदिवस अनिश्चिततेच्या गर्तेत जात असल्याचे चित्र आहे. स्टार एअरलाईन्सची सोलापूर-मुंबई विमानसेवा बंद होणे, ९१ ची सोलापूर-गोवा आणि सोलापूर-हैदराबाद विमानसेवा अद्याप नियमितपणे पूर्ववत न होणे, तसेच सोलापूर-तिरुपती थेट विमानसेवा अद्याप सुरूही न होणे, ही सोलापूरकरांसाठी अत्यंत गंभीर बाब आहे. हा विमानसेवेचा होत असलेला खेळखंडोबा सोलापूरच्या विकासासाठी धोक्याची घंटा असल्याचे मत सोलापूर विकास मंचचे सदस्य केतन शहा यांनी एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे व्यक्त केले आहे.

या पत्रकात नमूद केले आहे की, सोलापूरकरांना गेल्या अनेक वर्षांपासून विमानसेवेच्या नावाखाली केवळ आश्वासने मिळत असून प्रत्यक्षात विश्वासार्ह आणि नियमित हवाई कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून देण्यात प्रशासन व लोकप्रतिनिधी अपयशी ठरत असल्याची टीका सोलापूर विकास मंचाने केली आहे. विमानसेवा ही केवळ प्रवाशांच्या ये-जा करण्याची सुविधा नसून, शहराच्या औद्योगिक, व्यावसायिक, आय.टी., पर्यटन आणि आर्थिक विकासाची महत्त्वाची जीवनवाहिनी आहे. एखाद्या गुंतवणूकदाराला, उद्योजकाला किंवा मोठ्या कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला सोलापूरला येण्यासाठी विमानसेवेवर विश्वास ठेवता येत नसेल, तर अशा परिस्थितीत सोलापूरमध्ये



नवीन गुंतवणूक आणणे अत्यंत कठीण होणार आहे. सोलापूरमध्ये आय.टी. पार्क उभारण्याच्या आणि नवीन उद्योग आणण्याच्या चर्चा सुरू असताना शहराची विमानसेवा मात्र अनिश्चित राहणे हा मोठा विरोधाभास आहे.

सोलापूरमध्ये आय.टी. पार्क, नवीन उद्योग, स्टार्टअप्स आणि रोजगाराच्या संधी निर्माण करायच्या असतील तर मुंबई, हैदराबाद, गोवा, तिरुपती आणि देशातील इतर महत्त्वाच्या शहरांशी नियमित व विश्वासार्ह हवाई संपर्क असणे अत्यावश्यक आहे. विमानसेवा कधी सुरू, कधी बंद आणि कधी रद्द अशा पद्धतीने चालणार असेल तर मोठा गुंतवणूकदार सोलापूरकडे का पाहील? असा सवाल सोलापूर विकास मंचाने उपस्थित केला आहे. विशेष म्हणजे ९१कडून सोलापूर-गोवा आणि सोलापूर-हैदराबाद या मार्गांवर सेवा सुरू करण्याच्या घोषणा झाल्या; मात्र या सेवा नियमितपणे सुरू राहण्याबाबत सातत्याने अनिश्चितता निर्माण झाली आहे. दुसरीकडे सोलापूर-तिरुपती विमानसेवा सुरू करण्याबाबतही सोलापूरकरांना अनेकदा आश्वासने देण्यात आली; मात्र प्रत्यक्ष विमानसेवा सुरू झालेली नाही. त्यामुळे आता घोषणा आणि आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष विमानसेवा कधी सुरू होणार, याचे निश्चित वेळापत्रक जाहीर करण्याची मागणी मंचाने केली आहे. आज विमानफेऱ्या रद्द होत आहेत; उद्या गुंतवणूकदारांच्या भेटी आणि उद्योगांचे निर्णय रद्द झाले तर त्याची जबाबदारी कोण घेणार? सोलापूरच्या तरुणांना रोजगार हवा असेल तर सोलापूरला विश्वासार्ह हवाई कनेक्टिव्हिटी हवीच. विमानसेवा अस्थिर ठेवून आय.टी. पार्क आणि मोठ्या गुंतवणुकीची स्वप्ने दाखवणे म्हणजे सोलापूरकरांची दिशाभूल करण्यासारखे आहे, अशी टिकाही सोलापूर विकास मंचाने दिला आहे.

> सोलापूर विकास मंचाने स्पष्ट केले आहे की, सोलापूरला नवीन गुंतवणूक, आय.टी. पार्क, उद्योग, रोजगार आणि पर्यटन विकास हवा असेल तर सर्वप्रथम मूलभूत पायाभूत सुविधा मजबूत करणे आवश्यक आहे. त्यामध्ये विश्वासार्ह विमानसेवा ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. स्टार एरलाईन्सची मुंबईची नियमित विमानसेवा, ९१ च्या गोवा व हैदराबाद सेवांचे सातत्य, तिरुपतीसाठी थेट विमानसेवा आणि होटगी रोड विमानतळावर नाईट लँडिंग या सर्व बाबींवर शासनाने कालबद्ध कृती आराखडा जाहीर करावा. त्यानंतरच नवीन विमानतळाची आवश्यकता असल्यास त्याचा पारदर्शकपणे विचार करावा, अशी मागणी मंचाने केली आहे.

## संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि. ६ सप्टेंबर -**

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्माला ७५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या ऐतिहासिक निमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने राज्यभर विविध सांस्कृतिक व आध्यात्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या पुढाकाराने संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जन्मवर्षानिमित्त राज्यभर विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून ज्ञानोबारायांचे विचार,साहित्य आणि महान जीवनकार्य जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.याच उपक्रमाचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून आज महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ‘ज्ञानमाऊली’ या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

अकलूज येथे चंदनकर क्लासचे संचालक ॲड.अमोल चंदनकर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून हनुमंत चंदनकर,ह.भ.प. सुरेश वेदपाठक महाराज,माजी पोलीस अधिकारी बबनराव साळुंखे,हर्षवर्धन नाचणे सर उपस्थित होते.त्यांच्या शुभहस्ते विठ्ठलांच्या प्रतिमेचे पूजन करून दिप प्रज्वलन करण्यात आले.या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली.ज्ञानेश्वर माऊली भजनी मंडळ संग्रामनगर (ता.माळशिरस) यांच्या वतीने ह.भ.प.सुरेश वेदपाठक महाराज,चित्रपट अभिनेते व संगीत शिक्षक यांनी या कार्यक्रमात किर्तनाची सेवा केली.लहान मुलांनी विविध संतांच्या वेशभूषा परिधान करून आगमन झाल्यामुळे या कार्यक्रमात रंगत आली.यामध्ये निरंजन रविंद्र बोके (निवृत्तीनाथ), विजेंदर राजाराम यादव (ज्ञानेश्वर महाराज),रोहन रविंद्र सपलगे (सोपान देव),कु.प्रियंका विनोद तेलंगण (मुक्ताबाई) यांनी संतांची भूमिका केली होती.त्यानंतर भजनाचा व किर्तनाचा कार्यक्रम पार पाडला.त्यांना हार्मोनियमची साथ प्रशांत महामुनी,पकवाज वादन मुरलीधर पंडित केले.

> संत ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून मांडलेले विचार हे केवळ अध्यात्मापुरते मर्यादित नसून मानवता,समता, निसर्ग, ज्ञान आणि विवेकाचा व्यापक संदेश देणारे आहेत. त्यांच्या विचारांची ओळख नव्या पिढीला व्हावी आणि ज्ञानोबारायांचे साहित्य, तत्त्वज्ञान व विचार अधिकाधिक जनसामान्यांपर्यंत पोहोचावेत.या उदात्त उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या वतीने उपक्रम राबविण्यात येत आहेत. ज्ञानोबारायांच्या विचारांचा प्रकाश प्रत्येकाच्या जीवनात पोहोचावा आणि त्यांच्या ज्ञान,समता व मानवतेच्या संदेशातून एक सुसंस्कृत समाज घडावा, हीच या ‘ज्ञानमाऊली’ कार्यक्रमामागील प्रेरणा आहे.
>
> **ॲड.अमोल चंदनकर**

## कॉलेजचे वर्ष वाया गेल्याच्या विवाहित तरुणीने पिले फरशी पुसण्याचे फिनाइल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ६ सप्टेंबर -**

कॉलेजचे एक वर्ष वाया गेल्याच्या रागात एका १९ वर्षीय विवाहीत तरुणीने फरशी पुसण्याचे फिनाईल पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना न्यू बुधवार पेठ परिसरातील विश्वदीप चौकाजवळ आज रविवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास घडली .

समृद्धी देवराज गायकवाड (वय १९ वर्ष, रा रा. विश्वदीप चौक सोलापूर) असे फिनाइल पिलेल्या विवाहित तरुणीचे नाव आहे. आज रविवारी दुपारच्या सुमारास घरात असताना तिने हा प्रकार केला. याचा त्रास होऊ लागल्याने तिला उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात पती देवराज यांनी दुपारी दीड वाजता दाखल केले.

## अक्कलकोट तालुक्यात मोहिते-पाटलांनी वाढविल्या भेटीगाठी




**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ सप्टेंबर -**

माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी अक्कलकोट तालुक्यातील नेते, कार्यकर्ते आणि विविध राजकीय घटकांशी संपर्क वाढविल्याचे चित्र आहे. त्यांच्या या भेटीगाठी केवळ सदिच्छा भेटी आहेत की त्यामागे आगामी राजकीय घडामोडींची पूर्वतयारी आहे, आगामी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूकीच्या निमित्ताने रणजितसिंह मोहिते-पाटील सक्रिय झाल्याची चर्चा जिल्ह्यात रंगली आहे.

स्थानिक नेत्यांमधील नाराजी, गटांतर्गत मतभेद आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निर्माण होणाऱ्या राजकीय संधींचा अंदाज घेत मोहिते-पाटील आपली संघटनात्मक ताकद पुन्हा सक्रिय करत आहेत.पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्ह्यातील विविध भागांत संपर्क वाढवत स्थानिक नेत्यांना सोबत घेण्याच्या हालचाली सुरू केल्यानंतर मोहिते-पाटील गटाकडूनही राजकीय सक्रियता वाढताना दिसत आहे. मोहिते-पाटील घराण्याचा सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणावर दीर्घकाळ प्रभाव राहिला आहे. मात्र, अलीकडच्या काळात पालकमंत्री गोरे यांनी विविध तालुक्यांमध्ये आपला संपर्क मजबूत करण्यास सुरुवात केली आहे. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तालुका अध्यक्ष-दिलीपभाऊ सिद्धे, जिल्हा परिषद सदस्य- प्रवीण तानवडे, आनंद तानवडे, नगरसेवक मुस्तफा बळोरगी, शेरीकर बंधू यांच्या निवासस्थानी भेट दिली.

> ### स्वर्गीय प्रदीप जगताप यांच्या कुटुंबियांचे सांत्वन
>
> रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी तालुक्यातील गोगाव येथे जाऊन स्वर्गीय प्रदीप जगताप यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. एक सच्चा, निष्ठावंत कार्यकर्ता आपल्यातून निघून गेल्याची भावना रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.

## कुत्रा आडवा आल्याने दुचाकीवरील तरुण जखमी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -**

सोलापूर - अचानक कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरून अजित अंकुश पाटील (वय २८ रा.मंद्रूप ता.दक्षिण सोलापूर) हा तरुण जखमी झाला. तो आज रविवारी पहाटे साडेपाच वाजेच्या सुमारास अकोले मंद्रूप ते सोलापूर येथे दुचाकी वाहनावरून जात होता. डोणगाव रोड येथील नागोबा मंदिराजवळ अचानक कुत्रा आडवा आल्याने हा अपघात घडला. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सलगरवस्ती पोलिसात याची नोंद झाली आहे.

## झोक्यावरून पडल्याने मुलगी जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -**

एमआयडीसी परिसरातील अविनाश नगर येथे झोक्यावरून खाली पडल्याने आद्या लक्ष्मीकांत हिप्परगी (वय ७ वर्षे) ही मुलगी जखमी झाली. आज रविवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास ती राहत्या घरात झोका खेळत होती .त्यावेळी अचानक झोक्यावरून पडल्याने तिच्या डोकीस जखम झाली. तिला उपचारासाठी जयश्री (आई) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. एमआयडीसी पोलिसात याची नोंद झाली आहे.

## सौ.भू.म.पुल्ली कन्या प्रशालेत १६०० विद्यार्थिनींचे मोफत नेत्र तपासणी शिबिर संपन्न



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभाग, सोलापूर व शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सौ. भू. म. पुल्ली कन्या प्रशालेतील सुमारे १६०० विद्यार्थिनींची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली.

गुरुवार, दि. ३ सप्टेंबर २०२६ ते शनिवार दि. ५ सप्टेंबर २०२६ या तीन दिवसीय नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केंद्रीय विशेष शिक्षक रुपाली केंची मॅडम यांच्या विशेष प्रयत्नातून यशस्वीपणे संपन्न झाले.या शिबिरासाठी शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालयाच्या प्रोजेक्ट को-ऑर्डिनेटर प्रियांका कांबळे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली अनिकेत चव्हाण, तेजस्वी गुरगुले व मोहित पठाण या ऑप्टोमेट्रिस्ट तज्ज्ञांनी विद्यार्थिनींची नेत्र तपासणी केली. विद्यार्थिनींच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरलेल्या या उपक्रमामुळे त्यांच्या डोळ्यांशी संबंधित समस्या वेळीच निदर्शनास आणून त्याबाबत योग्य मार्गदर्शन मिळाले. या उपक्रमासाठी उपमुख्याध्यापक श्री.तुकाराम श्रीराम व पर्यवेक्षक श्री.परमेश्वर बाबळसुरे यांनी विशेष परिश्रम घेतले.या उपक्रमासाठी वेळ, सेवा आणि सहकार्य दिल्याबद्दल मुख्याध्यापिका सौ. उमा कोटा यांनी शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालयाच्या संपूर्ण टीमचे आभार मानले.

या उपक्रमाबद्दल पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम ,उपाध्यक्ष प्रा.श्रीनिवास कोंडी ,सचिव दशरथ गोप ,सहसचिव मलिकार्जुन सरगम ,खजिनदार गोवर्धन कमटम ,शालेय समिती अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली व सर्व विश्वस्तांनी कौतुक केले.

## सामाजिक सद्भावनेतूनच समाजातील प्रश्नांची उकल : स्वानंद कुलकर्णी




**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. ६ सप्टेंबर २०२६**

समाजातील विविध प्रश्न व समस्या वादातून नव्हे, तर विचारमंथन, संवाद आणि परस्पर समन्वयातून सोडविल्या जाऊ शकतात. सामाजिक सद्भाव हा केवळ विचार नसून तो व्यक्ती, कुटुंब आणि समाजाच्या आचरणातून निर्माण होणारा संस्कार आहे, असे प्रतिपादन स्वानंद कुलकर्णी यांनी केले.

लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, मंगळवेढा येथे रविवार, ६ सप्टेंबर रोजी सामाजिक सद्भाव बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सकल हिंदू समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक सद्भाव, पंचपरिवर्तन, सांस्कृतिक जाणीव, कुटुंब प्रबोधन आणि नागरिक कर्तव्य या विषयांवर बैठकीत विचारमंथन करण्यात आले.स्वानंद कुलकर्णी म्हणाले, भारतीय संस्कृतीची ओळख विविधतेतील एकतेत आहे. रामायण, महाभारत आणि भारतीय ज्ञानपरंपरेतून समाजाला एकत्र ठेवणारे अनेक विचार मिळतात. आजच्या पिढीला आपल्या मूळ संस्कृतीपासून दूर नेण्याचे प्रयत्न होत असताना तरुणांनी वास्तव समजून घेऊन राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. समाजातील दोष दूर करण्यासाठी वादापेक्षा संवाद आणि एकत्रीकरणाची भूमिका महत्त्वाची आहे, असे त्यांनी सांगितले. जिल्हा संयोजक विजय वाघमोडे म्हणाले, मजबूत राष्ट्रनिर्मितीसाठी समाजातील विविध जाती, संस्था आणि घटकांचे एकत्रीकरण आवश्यक आहे. तालुका संयोजक दिगंबर यादव यांनी प्रास्ताविकात हिंदू धर्माचे विचार व श्रेष्ठत्व, संत-राजांची परंपरा तसेच भक्ती आणि शक्ती परंपरेचे महत्त्व विशद केले. छत्रपती संभाजी महाराज, संत जगनाडे महाराज, संत रविदास महाराज व संत गोरा कुंभार यांचे कार्य तसेच धनगर, गिसाडी, वैदू, नाथ डवरी, रामोशी, मेहतर यांसह विविध समाजघटकांचे योगदान त्यांनी अधोरेखित केले. समाजातील प्रत्येक घटकाचा सन्मान, स्त्रीचा सन्मान आणि हिंदू समाजातील विविध घटकांचे संघटन यासाठी सामाजिक सद्भावाच्या माध्यमातून कार्य करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. दरम्यान सर्व उपस्थितांना पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी पेरूचे रोप भेट देण्यात आले.याप्रसंगी एकात्मता मंत्र व सांघिक पद्य ओंकार चिटणीस यांनी सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर पवार तर आभार दामाजी पडवळे यांनी मानले.

## ओम शांती येथे केला गेला ६० शिक्षकांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ६ सप्टेंबर -**

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय माउंट आबू राजस्थान यांच्या कुर्डूवाडी येथील ओम शांतीच्या सेंटरवर शिक्षक दिना निमित्त कुर्डूवाडी शहर परिसरातील साठ शिक्षकांचा सत्कार व रक्षाबंधन आनंदाच्या वातावरणात संपन्न झाले.

ओम शांती सेंटरच्या वतीने नेहमीच सामाजिक उपक्रम राबवले जातात नुकतेच देशभर दहा कोटी नशा मुक्त अभियान भारतभर राबवण्यात आले होते यावेळी कुर्डूवाडी सेंटरच्या वतीने ही अनेकांना नशा मुक्त बाबत शपथ दिली होती यावेळी शिक्षक दिन व रक्षाबंधनाचे औचत्य साधून हा आगळा वेगळा उपक्रम राबवण्यात आला यावेळी सर्वांचा सत्कार करून ईश्वरीय ज्ञानाची पुस्तके भेट म्हणून देण्यात आली

यावेळी ओम शांती बार्शी सेंटरच्या ब्रह्माकुमारी अनिता दीदी अकलूज सेंटरच्या ब्रह्मकुमारी शिवरात्री दीदी कुर्डूवाडी सेंटरच्या ब्रह्मकुमारी गोदावरी दीदी यांनी उपस्थित शिक्षकांना अध्यात्म व शालेय जीवनातील विद्यार्थ्यां सोबत वागण्या बाबतचे गुढ ज्ञान दिले यावेळी शिक्षकांना राजयोग व त्याबद्दलची माहिती देण्यात आली यावेळी माजी आ विनायकराव पाटील व शाळेतील शिक्षक व शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## विकासकामांबरोबरच मतदानाचाही हक्क बजावण्याची आवश्यकता

### आमदार देवेंद्र कोठे : एसआयआर यादीत नाव नसल्यास अद्यापही नाव नोंदणीची मुदत असल्याने नोंदणी करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -**

नागरिकांनी विकासकामांबरोबरच मतदानाचाही पवित्र हक्क बजावण्याकरिता जागरूक असले पाहिजे. त्यामुळे ज्या नागरिकांचे नाव एसआयआर यादीत आलेले नाही त्यांना नाव नोंदणीसाठी अद्यापही मुदत असून अशा नागरिकांनी यंत्रणेतील संबंधितांशी संपर्क साधून आपले नाव नोंदवावे, असे आवाहन आमदार देवेंद्र कोठे यांनी केले. अंत्रोळीकर नगर परिसरातील राजेश कुमार नगर येथे असलेल्या श्री गणेश मंदिर आणि श्री हनुमान मंदिरासमोरील सभामंडपाचे भूमिपूजन शुक्रवारी आमदार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते झाले.



याप्रसंगी व्यासपीठावर आमदार देवेंद्र कोठे, नगरसेवक शिवाजी वाघमोडे, नगरसेवक सात्विक बडवे, नगरसेविका संगीता जाधव, नगरसेवक अक्षय अंजीखाने, माजी नगरसेवक आणि एसआयआरचे शहर मध्यचे बीएलए गुरुशांत धुत्तरगावकर, भारतीय जनता पार्टी एससी मोर्चाचे राजाभाऊ माने, रविकांत कोळेकर, भाजपचे मंडल अध्यक्ष नागेश सरगम, महेश बनसोडे, धनराज आनंदाणी उपस्थित होते.

यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते श्री गणरायाची आणि श्री हनुमंताची आरती करण्यात आली तसेच आमदार देवेंद्र कोठे, नगरसेवक आणि परिसरातील नागरिकांच्या हस्ते कुदळ मारून सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानातून करण्यात येणाऱ्या सभामंडपाच्या कामाचे भूमिपूजन झाले. या सभा मंडपासाठी ३६ लाख ५८ हजार रुपयांचा विकासनिधी मंजूर करण्यात आला आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांची वसाहत असलेल्या राजेश कुमार नगर येथे भव्य सभा मंडप बांधण्याबरोबरच बाग, मैदान, पार्किंग आदी सोयी देण्यात येणार आहेत. तसेच येथील घरांच्या खरेदी खताच्या रखडलेल्या कामाबाबत पुढील दोन दिवसात जिल्हाधिकाऱ्यांना भेटून याबाबत तोडगा काढण्यात येईल.

यावेळी माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, नगरसेवक शिवाजी वाघमोडे, नगरसेविका संगीता जाधव, अक्षय अंजिखाने, रविकांत कोळेकर, मंडल अध्यक्ष नागेश सरगम यांनी सूत्रसंचालन तर नगरसेवक सात्विक बडवे यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमास निशिकांत खेडकर, सुवर्णा दास, शक्ती केंद्रप्रमुख राघवेंद्र सावळगी, बूथ प्रमुख संतोष हलकुडे, राहुल म्हेत्रे, नितीन भिसे आदी उपस्थित होते. सभा मंडप भूमिपूजनाच्या कार्यक्रमानंतर आमदार देवेंद्र कोठे यांनी राजाभाऊ माने, सुवर्णा तोटुंगल(दास), धनराज आनंदानी, मिलिंद माईणकर यांच्या निवासस्थानी भेट देऊन संवाद साधला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### नशामुक्त भारत घडविण्याचा संकल्प

**सुरत :** केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया आणि गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांच्या नेतृत्वाखाली 'विकसित भारतासाठी नशामुक्त युवा' या संकल्पनेवर आधारित 'फिट इंडिया संडेज ऑन सायकल'च्या ८९ व्या आवृत्तीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाद्वारे अधिक आरोग्यदायी, सुरक्षित आणि नशामुक्त भारत घडवण्याचा सामूहिक संकल्प पुन्हा एकदा दृढ करण्यात आला. या कार्यक्रमात खेळाडू, विद्यार्थी, फिटनेस प्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांनी सायकलिंग आणि फिटनेस उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवला तसेच नशामुक्त भारत घडवण्याच्या दिशेने योगदान देण्याची शपथ घेतली. या शपथविधीमुळे 'नशामुक्ती संकल्प अभियानाअंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या सामूहिक संकल्पाचा संदेश अधिक बळकट झाला. या उपक्रमाने नागरिकांना, विशेषतः तरुणांना, अंमली पदार्थांच्या व्यसनापासून दूर राहण्यास आणि 'नशामुक्त भारत'च्या स्वप्नपूर्तीसाठी योगदान देण्यास प्रेरित केले. सुरतमधील या कार्यक्रमाची सुरुवात मंगध चौकातील सरदार पटेल यांच्या पुतळ्याजवळ झाली. येथे सहभागींनी सायकलिंगला सुरुवात करण्यापूर्वी योग, झुंबा, फिटनेस उपक्रम आणि विविध आव्हानांमध्ये सहभाग घेतला. त्यानंतर त्यांनी सारथाना प्राणीसंग्रहालयापर्यंत ६ किमीची सायकल रॅली पूर्ण केली.

### श्रीराम-इव्हान दुसऱ्या फेरीत

**न्यू यॉर्क :** अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरीत एन. श्रीराम बालाजी व त्याचा अमेरिकन जोडीदार इव्हान किंगने पहिल्या फेरीत नेदरलँड्सच्या जोडीवर विजय नोंदवून पुढील फेरीत प्रवेश केला. श्रीराम-इव्हानने नाट्यमय लढतीत नेदरलँड्सच्या जोडीविरुद्ध सहा मॅच पॉइंट्स वाचविले व दुसऱ्या फेरीत स्थान मिळविले. सामन्यात जेव्हा निर्णायक क्षण आला, तेव्हा बालाजीने गेल्या वर्षीच्या निराशाजनक अनुभवातून धडा घेत संयम राखला. गत वर्षी याच स्पर्धेत मॅच पॉइंट्स हाती असूनही बालाजीला पहिल्या फेरीतच वेदनादायी पराभवाचा सामना करावा लागला होता. बारा महिन्यांनंतर, परिस्थिती अगदी उलट होती; यावेळी प्रतिस्पर्धी विजयाच्या अगदी जवळ पोहोचले असतानाही, या भारतीय-अमेरिकन जोडीने हार मानली नाही आणि आपली पकड कायम ठेवली. बालाजीसाठी या विजयामुळे नक्कीच समाधानाची भावना निर्माण झाली. आम्ही हे साध्य करू शकलो याचा मला खूप आनंद आहे. मी गत वर्षीही इथे होतो आणि माझ्याकडे मॅच पॉइंट्स होते, पण मी पहिल्या फेरीतच हरलो होतो; त्यामुळे आता त्या पराभवाचा वचपा काढल्यासारखे वाटत आहे, मला याचा खूप आनंद आहे, असे श्रीराम बालाजी म्हणाला.

### मायकल शूमाकर यांना वेटेलकडून श्रद्धांजली

**मोंझा :** रविवारी मोंझा ग्रँड प्रिक्सपूर्वी, सात वेळा जगज्जेता राहिलेल्या मायकल शूमाकर यांच्या प्रतिष्ठित २००२ फेरारी गाडीचे सारथ्य करत सेबॅस्टियन वेटेलने या एफ वन दिग्गजाला श्रद्धांजली वाहिली. वेटेलने एफ २०२२ गाडीतून काही फेऱ्या पूर्ण केल्या आणि फेरारीचे होम-ग्राउंड असलेल्या 'ऑटोड्रोमो नॅझिओनाले मोंझा' ट्रॅकवरून धावताना प्रेक्षकांना हात उंचावून अभिवादन केले. 'टिफोसी' (फेरारीचे चाहते) यांनी चार वेळा चॅम्पियन राहिलेल्या आणि रेड बुलच्या माजी चालकाचे जोरदार स्वागत केले. ट्रॅकवरील त्या अविस्मरणीय क्षणांमध्ये शूमाकर यांची आठवण ताजी झाली; प्रतिष्ठित एफ २०२२चे दृश्य आणि त्या गाडीचा जबरदस्त आवाज यांनी उपस्थितांना जुन्या आठवणींच्या विश्वात नेले. वेटेलने परिधान केलेल्या रेस-सूटवर शूमाकर यांच्यासाठी एक संदेश होताः 'माझ्या मित्र मायकलसाठी, अजून एक शर्यत जिंकायची शिल्लक आहे.' त्याने गाडी गोल फिरवण्याचे काही कसब केले आणि मुख्य शर्यत व चालकांच्या परेडपूर्वी मोंझा ट्रॅकवरील या कामगिरीने चाहत्यांना मंत्रमुग्ध केले.

# ईशान किशनचे नाबाद शतक

## दुलिप करंडक क्रिकेट ● अभिमन्यू, शिखर, कुमार कुशाग्राची अर्धशतके ● पूर्व विभाग ४ बाद ३८५ धावा



समन्वय साधत धाव घेताना कर्णधार ईशान किशन व कुमार कुशाग्रा (उजवीकडे

**चेन्नई, ६ सप्टेंबर**

रविवारपासून येथे प्रतिष्ठेच्या दुलिप करंडकासाठी सुरू झालेल्या अंतिम क्रिकेट सामन्यात कर्णधार ईशान किशनचे (नाबाद १११) शतक आणि अभिमन्यू ईश्वरन (७२), शिखर मोहन (८५) व कुमार कुशाग्राच्या ( नाबाद ६३) दमदार अर्धशतकांच्या बळावर पूर्व विभागाने तिलक वर्माच्या नेतृत्वाखालील दक्षिण विभागाविरुद्ध दिवस अखेर पहिल्या डावात ७९ षटकांत ४ बाद ३८५ धावा उभारल्या. पूर्व विभाग संघाचा कर्णधार ईशान किशनने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अभिमन्यू ईश्वरन व वैभव सूर्यवंशीने कर्णधाराच्या अपेक्षानुरूप ८८ चेंडूंत १०० धावांची सलामी भागीदारी करून पूर्व विभागाच्या डावाची झकास सुरुवात केली. सूर्यवंशी अर्धशतकाच्या उंबरठ्यावर असतानाच डावखुरा मध्यम गती गोलंदाज चामा मिलिंदने त्याला बदली खेळाडू टी. त्यागराजनकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. सूर्यवंशीने ३७ चेंडूंत ५ चौकार व एका षट्काराच्या मदतीने ४४ धावांचे योगदान दिले. त्यानंतर शिखर मोहनच्या साथीने खेळताना १३ धावांची भर पडली असताना अभिमन्यू ईश्वरन धावबाद झाला. अभिमन्यूने ८६ चेंडूंत ७२ धावांची आकर्षक खेळी केली, यात त्याने १० चौकार व एक षट्कार खेचला. आंध्र प्रदेशच्या त्रिपुरान विजयने सुदीप कुमार घरामीला (६) खेळपट्टीवर रमण्याआधीच तंबूत परत पाठविले, मात्र तिकडे शिखर मोहनची फटकेबाजी सुरूच होती, मात्र चामा मिलिंदने एका आखुड टप्प्याच्या चेंडूवर शिखरची घोडदौड रोखली. राँचीच्या शिखर मोहनने १२० चेंडूंचा सामना करत ९ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने ८५ धावांची खेळी केली.

नंतर कर्णधार ईशान किशन व कुमार कुशाग्रा या जोडीने दक्षिण विभागाच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेतला. दिवस अखेरपर्यंत चौफेर फलंदाजी करीत ईशानने नाबाद शतक, तर कुमार कुशाग्राने नाबाद अर्धशतक साजरे केले. या दोघांनी पाचव्या गड्यासाठी नाबाद १४४ धावांची भागीदारी करीत पूर्व विभागाला पहिल्या डावांत दिवस अखेर ७९ षटकांत ४ बाद ३८५ धावांचा टप्पा गाठून दिला.

दक्षिण विभागाकडून चामा मिलिंदने ५६ धावांत २ बळी टिपले, तर त्रिपुरन विजयने ११४ धावा देत एक बळी मिळविला. ◂ (वृत्तसंस्था)

# सात्त्विक-चिराग 'चॅम्पियन'




विजयाचा आनंद साजरा करताना चिराग शेट्टी व सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी

**शेन्झेन, ६ सप्टेंबर**

भारताच्या सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी या जोडीने रविवारी येथे झालेल्या बीडब्ल्यूएफ सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेतील 'चायना मास्टर्स'मध्ये पुरुष दुहेरीचे विजेतेपद जिंकले. हे त्यांचे दहावे बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर विजेतेपद ठरले.

जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानावर असलेल्या या भारतीय जोडीने चीनच्या जी टिंग वुन- रेन शियांग यू या जोडीवर ११-२१, २१-१३, २१-१७ असा विजय नोंदविला. सात्त्विक-चिराग ही जोडी २०२३ व २०२५ मध्ये उपविजेती ठरली होती आणि २०२४ मध्ये उपांत्य फेरीपर्यंत पोहोचली होती.

गत महिन्यात नवी दिल्लीत झालेल्या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत बाहेर पडल्यामुळे बीडब्ल्यूएफ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील तिसरे पदक हुकलेल्या सात्त्विक-चिरागने बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूरमधील आपल्या कारकिर्दीतील १० वे विजेतेपद मिळविले. हे त्यांचे या वर्षातील दुसरे व एकूण चौथे 'सुपर ७५०' विजेतेपद आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुष दुहेरीचे विद्यमान विजेते असलेल्या या भारतीय जोडीने, २००५ मध्ये ही स्पर्धा सुरू झाल्यापासून ती जिंकणारे पहिले भारतीय ठरण्याचा मान मिळविला. सात्त्विक व चिराग यांची २०२६ मधील ही तिसरी बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर अंतिम फेरी होती. मे महिन्यात 'थायलंड ओपन'मध्ये उपविजेतेपद मिळविल्यानंतर त्यांनी त्याच महिन्यात 'सिंगापूर ओपन'चे विजेतेपद पटकावले होते.

चिनी जोडीने खेळावर नियंत्रण ठेवत १८ मिनिटांत पहिला गेम २१-११ असा जिंकला, परंतु भारतीय जोडीने झुंजार खेळ करीत सामन्यावर नियंत्रण मिळविले व दुसरा गेम २१-१३ असा जिंकून सामना निर्णायक गेमपर्यंत नेला. निर्णायक गेममध्ये भारतीय जोडीने जोरदार मुसंडी मारीत अंतिम विश्रांतीपर्यंत ११-९ अशी आघाडी कायम राखली व नंतर त्यांनी संयम राखत सलग चार गुण जिंकले व ७० मिनिटे चाललेल्या या अटीतटीच्या लढतीत २१-१७ असा विजय मिळवून विजेतेपद पटकावले. ◂ (वृत्तसंस्था)

# निवृत्ती नंतर मेस्सीचा पहिला सामना

**फ्लोरिडा, ६ सप्टेंबर**

आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतरच्या पहिल्याच सामन्यात लिओनेल मेस्सीने फ्लोरिडा येथे अटलांटा युनायटेडविरुद्ध इंटर मियामीच्या २-२ अशा बरोबरीत सुटलेल्या सामन्यात एका गोलसाठी मदत करणारा पास दिला.

२०२२ मध्ये अर्जेंटिनाला विश्वविजेतेपद आणि २०२६ मध्ये उपविजेतेपद मिळवून देण्यात कर्णधारपद भूषविणाऱ्या मेस्सीने मियामीसाठी या सामन्यात सुरुवात केली. मुसळधार पाऊस आणि विजांच्या कडकडाटामुळे हा सामना नियोजित वेळेपेक्षा ९० मिनिटे उशिरा सुरू झाला.

३९ वर्षीय मेस्सीने घेतलेल्या कॉर्नर किकवर मिडफील्डर कॅसेमिरोने हेडरद्वारे चेंडू अटलांटाचा गोलरक्षक लुकास होयोसच्या पलीकडे धाडला आणि ३२ व्या मिनिटाला मियामीला आघाडी मिळवून दिली.

मात्र, मियामीची ही आघाडी केवळ तीन मिनिटेच टिकली. कॅसेमिरोने एक 'क्रॉस' रोखण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू त्याच्या गोलरक्षक डेन सेंट क्लेअरला लागून अटलांटाच्या मिगुएल अल्मिरॉनच्या पायाशी आला; अल्मिरॉनने चेंडू जाळीत धाडून सामना बरोबरीत आणला. मध्यंतराच्या अगदी आधी लुईस सुआरेझने मियामीला पुन्हा आघाडी मिळवून दिली, परंतु ८७ व्या मिनिटाला ब्रिल एम्बोलोने पेनॉल्टीवर गोल करीत अटलांटाला एक गुण मिळवून दिला.

गत आठवड्यात सीएफ मॉण्ट्रियलविरुद्धच्या ७-१ अशा दणदणीत विजयात चार गोल आणि एक 'सहाय' करणाऱ्या मेस्सीच्या नावावर या हंगामात १८ गोल जमा आहेत आणि तो मेजर लीग फुटबॉल (एमएलएस) मधील सर्वाधिक गोल करणाऱ्यांच्या यादीत संयुक्तपणे अव्वल स्थानावर आहे.

८ ऑगस्ट रोजी वडील जॉर्ज यांच्या निधनानंतर त्याने आपली खेळाडू म्हणून कारकीर्द पुढे चालू ठेवण्याबाबत शंका व्यक्त केली होती. ◂ (वृत्तसंस्था)

### मेस्सी, रोनाल्डो पहिल्यांदाच एकत्र खेळणार ?

**ब्युनस आयर्स :** लिओनेल मेस्सी व ख्रिस्तियानो रोनाल्डो या डिसेंबरमध्ये एका अभूतपूर्व पुनर्मिलनासाठी एकत्र येऊ शकतात; फुटबॉलमधील या दोन आधुनिक काळातील दिग्गजांना कार्लोस तेव्हेझ त्याच्या बहुप्रतिक्षित निरोप समारंभाच्या सामन्यासाठी एकत्र आणण्याचा प्रयत्न करत आहे. तेव्हेझ 'बोका ज्युनियर्स' या अर्जेंटिनी क्लबमध्ये व्यावसायिक फुटबॉलला अंतिम निरोप देण्याची तयारी करीत आहे; याच क्लबमधून त्याने आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली होती आणि अखेरच्या टप्प्यासाठी तो तिथे परतला होता. ४२ वर्षीय तेव्हेझने गेल्या तीन वर्षांपासून व्यावसायिक फुटबॉल खेळलेले नाही, परंतु आता तो बोकाचे प्रतिष्ठित मैदान 'ला बॉम्बोनेरा' येथे अनेक दिग्गज खेळाडूंच्या सहभागासह एक विशेष सामना आयोजित करण्याचे नियोजन करीत आहे.

सुमारे ६० दिग्गज फुटबॉलपटूंचा सहभाग अपेक्षित असलेला हा सामना डिसेंबरच्या मध्यावर खेळविला जाईल. तेव्हेझने तारखांबाबत बोका क्लबशी चर्चाही केली आहे. आम्ही त्यांना एकत्र आणू, असे तेव्हेझने सांगितले. यामुळे अशा पुनर्मिलनाची शक्यता निर्माण झाली आहे. हे साध्य करण्याची आपल्याला वास्तववादी संधी आहे, असा विश्वास तेव्हेझला वाटतो.

# आन से यंगला तिसऱ्यांदा जेतेपद

**शेन्झेन :** जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या दक्षिण कोरियाच्या आन से यंगने टोमोका मियाझाकीचा २१-१७, २१-६ असा पराभव करून सलग तिसऱ्या वर्षी 'चायना मास्टर्स' स्पर्धा जिंकली आणि या हंगामातील आपले सातवे वैयक्तिक विजेतेपद नावावर केले. 'चायना मास्टर्स'चे विजेतेपद जिंकण्याची हॅट ट्रिक साधणारी आन ही पहिली खेळाडू ठरली आहे, तसेच मियाझाकीविरुद्धचा तिचा अपराजित विक्रम तिने ८-० असा कायम राखला. ऑलिम्पिक आणि जागतिक विजेती असलेल्या आनने ही संपूर्ण स्पर्धा एकही गेम न गमावता जिंकली; या स्पर्धेत कोणत्याही प्रतिस्पर्ध्याला तिच्याविरुद्ध एका सामन्यात २८ पेक्षा जास्त गुण मिळवता आले नाहीत. मला माझ्या कामगिरीचा खूप अभिमान वाटतो. या निकालामुळे मी खरोखरच आनंदी आहे, असे आन म्हणाली. आनने गेल्या हंगामात ११ विजेतेपदे जिंकून एका हंगामातील सर्वाधिक विजेतेपदांच्या विक्रमाशी बरोबरी केली होती आणि आता ती तो विक्रम मोडण्याच्या मार्गावर आहे. गत महिन्यात नवी दिल्ली येथे झालेल्या स्पर्धेत यामागुचीचा अंतिम सामन्यात २१-१७, २१-१४ असा पराभव करून आपले जागतिक विजेतेपद यशस्वीपणे राखल्यानंतर आनने जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान पुन्हा मिळविले होते.

# मानसी सिंगची रौप्यपदकावर मोहर

**इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन**

**पोंटियानक, ६ सप्टेंबर**

रविवारी येथील 'जीओआर तेरपाडू अहमद यानी स्टेडियमवर झालेल्या 'इंडोनेशिया मास्टर्स सुपर १००' बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात, चीनच्या शू वेन जिंग हिच्याकडून पराभव पत्करावा लागल्याने भारताच्या युवा बॅडमिंटनपटू मानसी सिंगला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. उत्तर प्रदेशच्या २१ वर्षीय मानसीचा, जागतिक क्रमवारीत ८१ व्या स्थानावर असलेल्या चिनी खेळाडूविरुद्ध १६-२१, ८-२१ असा पराभव झाला. जागतिक क्रमवारीत ७६ व्या



स्थानावर असलेल्या मानसीने कॅनडाच्या रॅचेल चॅनचा पराभव केला होता, तर शूने उपांत्य फेरीत तिसऱ्या मानांकित अनमोल खरबवर मात केली होती. या आठवड्यात चॅनवर विजय मिळवण्यापूर्वी, मानसीने हाँगकाँगची लो सिन यान हॅपी, सहकारी भारतीय व दुसरी मानांकित रक्षित रामराज आणि हाँगकाँगची सलोनी समीरभाई मेहता यांचा पराभव केला होता. उल्लेखनीय म्हणजे, मानसी या वर्षी फेब्रुवारीमध्ये झालेल्या 'युगांडा इंटरनॅशनल चॅलेंज' स्पर्धेतही उपविजेती ठरली होती. ◂ (वृत्तसंस्था)

# भारताचा मलेशियावर ११-१ ने विजय

## एएचएफ आशिया चषक कनिष्ठ महिला हॉकी स्पर्धा



सामन्यातील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार स्वीकारताना भारतीय खेळाडू

**मोकी, ६ सप्टेंबर**

एएचएफ कनिष्ठ महिला आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारताच्या कनिष्ठ महिला संघाने सलग दुसरा विजय नोंदविला. रविवारी झालेल्या 'एलिट पूल'मधील दुसऱ्या सामन्यात भारताने मलेशियाचा ११-१ असा धुव्वा उडवित आपण गतविजेते असल्याचे सिद्ध केले.

दक्षिण कोरियाविरुद्धच्या पहिल्या सामन्यातील ४-१ अशा विजयानंतर, मलेशियाविरुद्ध भारताने अधिक प्रभावी आणि लयबद्ध खेळ केला. सुरुवातीपासूनच त्यांचा आक्रमक खेळ बहरला; सात खेळाडूंनी गोल नोंदविले आणि संघाने 'फील्ड गोल्स' तसेच पेनॉल्टी कॉर्नर व स्ट्रोकचा उत्कृष्ट वापर केला. सामना सुरू झाल्याच्या पहिल्याच मिनिटाला पूजा साहूने पेनॉल्टी स्ट्रोकवर गोल करत भारताला आघाडी मिळवून दिली. चौथ्या मिनिटाला पौर्णिमा यादवने आघाडी दुप्पट केली, तर आठव्या मिनिटाला बिनिमा धानने पेनॉल्टी कॉर्नरवर आणखी एक गोल केला. १४ व्या मिनिटाला कृष्णा शर्माने आघाडी वाढविली.

दुसऱ्या सत्रात १७ व्या मिनिटाला पौर्णिमा यादवने पेनॉल्टी कॉर्नरवर आपला दुसरा गोल केला; त्यानंतर सुखवीर कौर व गीता यादवने अनुक्रमे २१ व्या आणि २८ व्या मिनिटाला गोल नोंदविले.

मलेशियाला भारताचा आक्रमक दबाव रोखता आला नाही व भारताने मध्यंतरापर्यंत ७-० अशी आघाडी घेतली. ३८ व्या मिनिटाला नूर मोहम्मदने मलेशियासाठी एक गोल केला. ४२ व्या मिनिटाला पूजाने आणखी एक पेनॉल्टी स्ट्रोक गोलमध्ये रूपांतरित करून आपला दुसरा गोल पूर्ण केला. त्यानंतर सानिका चंद्रकांत मानेने गोल करत भारताची धावसंख्या ९-१ वर नेली. ५३ व्या मिनिटाला गीताने पेनॉल्टी कॉर्नरवर आपला दुसरा गोल केला. सामना संपण्यापूर्वी दोन मिनिटे शिल्लक असताना सानिकानेही आपला दुसरा गोल पूर्ण करत संघाचा ११-१ असा विजय निश्चित केला.

या विजयामुळे दोन सामन्यांत सहा गुणांसह भारत 'एलिट पूल'मध्ये गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचला आहे. चीन आणि जपान प्रत्येकी तीन गुणांसह त्यानंतरच्या स्थानांवर आहेत, तर दक्षिण कोरिया आणि मलेशिया अजूनही विजयाच्या प्रतीक्षेत आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

# रायबाकिनाची प्रथम विश्वमानांकडे वाटचाल

**न्यू यॉर्क, ६ सप्टेंबर**

जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या एलेना रायबाकिनाने युलिया स्टारोडुबत्सेवाविरुद्धच्या फ्रेंच ओपनमधील पराभवाचा बदला घेतला. तिने मानांकन नसलेल्या या युक्रेनियन खेळाडूचा ७-६ (८/६), ६-३ असा पराभव करून अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेच्या अंतिम सोळाच्या फेरीत धडक मारली.

तिचा पुढचा सामना चार वेळा ग्रँड स्लॅम विजेती ठरलेल्या नाओमी ओसाका हिच्याशी होणार आहे, ओसाकाने बेल्जियमच्या एलिस मर्टेन्सचा ६-३, ३-६, ७-५ असा पराभव केला.

जानेवारीमध्ये ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये दुसरे ग्रँड स्लॅम विजेतेपद पटकावणाऱ्या या कझाकिस्तानच्या या टेनिसपटूचा फ्रेंच ओपनमध्ये स्टारोडुबत्सेवाकडून दुसऱ्या फेरीत पराभव झाला होता. पहिल्या सेटमध्ये आपली लय शोधताना तिला कदाचित त्या पराभवाची आठवण होत असावी, त्यामुळे तिला सुरुवातीला संघर्ष करावा लागला. रायबाकिनाच्या 'फोरहँड' फटक्यांमधील त्रुटींचा स्टारोडुबत्सेवा हिने पुरेपूर फायदा घेतला आणि तिची सर्व्हिस तोडून ५-४ अशी आघाडी घेतली. मात्र, रायबाकिनाने स्वतःला सावरले आणि बरोबरी साधली. तिने पहिला सेट जिंकल्यानंतर दुसऱ्या सेटमध्ये आत्मविश्वासाने आक्रमक खेळ केला. तिने आपली आघाडी कायम राखत दोन तासांपेक्षा कमी वेळेत सामना जिंकला.

हा एक कठीण सामना होता, मला वाटते की हा माझा सर्वोत्तम खेळ नव्हता, पण युलिया एक उत्कृष्ट खेळाडू आहे. गेल्या वेळीही आमची चुरशीची लढत झाली होती आणि मला आनंद आहे की मी सरळ सेटमध्ये विजय मिळवू शकले, असे रायबाकिना म्हणाली.

जागतिक क्रमवारीत आर्यना सबालेन्काची जागा घेऊन अव्वल स्थान मिळवण्यासाठी रायबाकिनाला आता केवळ दोन विजयांची (उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी) गरज आहे - मग सबालेन्काने सलग तिसरे अमेरिकन ओपन विजेतेपद जिंकले तरीही रायबाकिना अव्वल स्थानी पोहोचू शकेल. ◂ (वृत्तसंस्था)

# भारतीय पॅरा-तिरंदाजांची पदके निश्चित

## जागतिक पॅरा तिरंदाजी सीरिज

**अहमदाबाद, ६ सप्टेंबर**

येथे सुरू असलेल्या जागतिक पॅरा तिरंदाजी सीरिजमध्ये भारतीय पॅरा-तिरंदाजांनी उत्कृष्ट कौशल्य दाखवित विविध प्रकारांमध्ये अनेक पदके निश्चित केली आहे. यात 'व्हिज्युअली इम्पेअर्ड १' (दृष्टीहीन खेळाडूंचा गट १) या प्रकाराचाही समावेश आहे.




शीतल देवी

'व्हिज्युअली इम्पेअर्ड १' गटात युगल गर्ग, पवन कुमार व तन्वी इंगळेने उपांत्य फेरीत धडक मारल्यामुळे भारताची किमान दोन पदके निश्चित झाली. या प्रकारातील या दमदार कामगिरीसोबतच, भारताच्या कम्पाऊंड तिरंदाजांनी पात्रता फेरीत वर्चस्व गाजवले; यात जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेली आणि विद्यमान विश्वविजेती शीतल देवी महिलांच्या गटात अव्वल स्थानावर राहिली, तर भारतीय पुरुष आणि महिला संघांनी अव्वल मानांकन मिळविले.

जम्मूची रहिवासी असलेली आणि हातांशिवाय तिरंदाजी करणारी भारतीय पॅरा-तिरंदाज शीतल देवी हिने महिलांच्या कम्पाऊंड पात्रता फेरीत ७२० पैकी ६९८ गुण मिळवून अव्वल मानांकन पटकावले. चार भारतीय खेळाडू पुढील फेरीत पोहोचले; यात लालपती ११ व्या, सरिता १२ व्या आणि पायल नाग १४ व्या स्थानावर होत्या. ◂ (वृत्तसंस्था)

# झेंगची आगेकूच; ओसाका, झ्वेरेव्ह चौथ्या फेरीत



विजयाचा आनंद साजरा करताना झेंग किनवेन



ॲलेक्झांडर झ्वेरेव्ह

**न्यू यॉर्क, ६ सप्टेंबर**

येथे सुरू असलेल्या प्रतिष्ठेच्या अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेत महिला विभागात ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेत्या झेंग किनवेनने पिछाडीवरून जोरदार मुसंडी मारीत सलग सात गेम्स जिंकले व २२ व्या मानांकित मॅडिसन कीजचा १-६, ७-६ (३), ७-५ असा पराभव केला आणि आपली मोहीम शानदाररीत्या पुढे चालू ठेवली.

एकीकडे मॅडिसनला अश्रू आवरणे कठीण जात होते, मात्र तिकडे पराभवाच्या छायेत व स्पर्धेतून बाहेर पडण्याच्या मार्गावर असतानाही झेंगने हा आश्चर्यजनक विजय मिळविल्याने भावूक झाली होती. तिने कोर्टवर झोपून आपल्या विजयाचा आनंद साजरा केला.

काही तासांनंतर, १३ व्या मानांकित नाओमी ओसाकाने एलिस मर्टन्सचा ६-३, ३-६, ७-५ असा पराभव करून चौथ्या फेरीत प्रवेश केला. जपानच्या या दोन वेळच्या विजेत्या खेळाडूने अंतिम गुण जिंकल्यानंतर आपले डोके रॅकेटवर टेकवले; या विजयाने तिलाही आश्चर्यचकित केले होते.

पुरुष विभागात अव्वल मानांकित ॲलेक्झांडर झ्वेरेव्हने दुसऱ्या सेटमध्ये काहीसा तोल गमावला असला तरी, नंतर खेळावर पुन्हा नियंत्रण मिळवित ॲलेजांद्रो ताबिलोचा ६-२, ७-६(२), ६-२ असा पराभव केला आणि स्पर्धेच्या चौथ्या फेरीत धडक मारली.

फ्रेंच ओपनमध्ये पहिले ग्रँड स्लॅम विजेतेपद पटकावणाऱ्या व विम्बल्डनमध्ये उपविजेतेपद मिळवणाऱ्या या २९ वर्षीय झ्वेरेव्हने सामन्याची दमदार सुरुवात केली. त्याने २५ व्या मानांकित ताबिलोची सर्व्हिस दोनदा 'ब्रेक' केली आणि प्रतिस्पर्ध्याला एकही गुण न देता पहिला सेट जिंकला.

तिसऱ्या सेटमध्ये झ्वेरेव्हने ५-२ अशी आघाडी घेतल्यावर ताबिलोचा पराभव निश्चित झाला होता. या विजयासह झ्वेरेव्हने चौथ्या फेरीत आपले स्थान पक्के केले, आता त्याचा सामना २१ व्या मानांकित इटालियन खेळाडू लुसियानो डार्डेरीशी होणार आहे. ◂ (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# दुष्काळ जाहीर करा; शेतकरी उतरले रस्त्यावर

## बार्शी तालुक्यात शेतकरी संघटनेकडून रास्ता रोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ६ सप्टेंबर -**

राज्यासह जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी जामगाव (आ) ता. बार्शी येथे,शेतकरी संघटनेतर्फे सुमारे एक तास बार्शी-लातूर रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांचे नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

दुष्काळ जाहीर करुन मागील वर्षी वगळलेले महत्त्वाचे ट्रिगर पुन्हा लागू करा, स्मार्ट मीटर बसवणे बंद करा अन्यथा शेतातील विद्युत खांब व डीपीचे आजपर्यंतचे भाडे द्या, उजनी कॅनॉलच्या पाण्याने अर्धा किलोमीटर अंतरातील तीन धरणे भरा, बायपासपासून पुढे फक्त सात मीटर संपादन असल्यामुळे मोबदला वाढवून द्या, पीक विमा कंपन्यांची त्यांच्या स्थापनेपासून तर राज्य प्रमुख विनयकुमार आवटे आणि आजपर्यंतच्या सर्व कृषी आयुक्तांची यांच्या संपत्तीची न्यायालयीन चौकशी करा, चालू खरिपाची नुकसान भरपाई व मागील आणि चालूचा पीक विमा द्या इत्यादी मागण्यासाठी हे आंदोलन केले. मागण्याची पूर्तता लवकरच न झाल्यास संबंधित मंत्र्याच्या घरावर आंदोलन करणार असल्याचा इशारा गायकवाड यांनी यावेळी दिला.




त्यावेळी यशवंत गडदे, भाऊसाहेब आवटे, बिभीषण जोडवे, श्रीहरी यादव, विजय आवटे, अशोक ठोंबरे, संजय गात, पंकज आवटे, विलास लुंगसे, उमेश काळे, बालाजी कागदे, सर्वदमन आवटे आदींसह बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते. आंदोलकांचे निवेदन तहसीलचे प्रतिनिधी औदुंबर शिंदे यांनी स्वीकारले. आंदोलनासाठी बार्शी तालुका पोलीस स्टेशनचे पीएसआय सदाशिव गवळी व त्यांच्या सहकाऱ्यांनी बंदोबस्त ठेवला होता.

---

## महत्वाचे...

### शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या

**माढा, दि. ६ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्ह्यात यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने शेतकरी संकटात सापडले आहेत. पिके करपण्याच्या स्थितीत आहेत. त्यामुळे संकटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने शासकीय मदत व पीक नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या सोलापूर (ग्रामीण) जिल्हाध्यक्षा विनंती कुलकर्णी यांनी केली आहे. याबाबत त्यांनी सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. पेरणीसाठी बियाणे, खते, औषधे आदींसाठी शेतकऱ्यांनी मोठा खर्च केला आहे. मात्र, पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. आगामी काळात पिण्याच्या पाण्यासह पशुधनाच्या चाऱ्याचाही प्रश्न गंभीर होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदन देताना जिल्हाध्यक्ष वसंत देशमुख, शहर अध्यक्ष महेश गादेकर, महिला जिल्हाध्यक्ष पल्लवी पाटील, जिल्हा उपाध्यक्ष रामचंद्र मस्के,महिला शहर अध्यक्ष सुनीता रोटे, युवती प्रदेश उपाध्यक्ष चारुशीला कुलकर्णी, पंढरपूर शहर अध्यक्ष सुनंदा उमाटे, पंढरपूर तालुकाध्यक्ष रुपाली पवार, प्रदेश उपाध्यक्ष लता ढेरे, गौरा कोरे, व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



### शेकडो महिलांनी सुरज देशमुख यांना बांधली राखी

**टेंभुर्णी, दि. ६ सप्टेंबर -**

महामानव प्रतिष्ठान, टेंभुर्णी - यशपाल लोंढे व मित्र परिवाराच्या वतीने यंदाही रक्षाबंधनाचा कार्यक्रम झाला. यावेळी सिद्धार्थनगर, टेंभुर्णी येथील २०० हून अधिक महिलांनी एकत्र येत सुरज देशमुख यांना राखी बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला. महिलांनी सुरज देशमुख यांना राखी बांधून औक्षण केले. सुरज देशमुख यांनी बहिणींचे मनापासून आभार मानले. महामानव प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबवले जात आहे. रक्षाबंधनाचा हा उपक्रमही महिला-भगिनींशी असलेले जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ करणारा ठरला. कार्यक्रमासाठी यशपाल लोंढे व मित्रपरिवाराने विशेष परिश्रम घेतले.




### अशपाक मोमीन यांचे उपोषण स्थगित

**माढा, दि. ६ सप्टेंबर -**

माढा वैराग रस्त्यालगतची अतिक्रमणे हटवण्याबाबत अशपाक मोमीन यांनी माढा तहसील कार्यालयासमोर सुरू केलेले उपोषण सार्वजनिक बांधकाम विभागाने लेखी आश्वासन दिल्यानंतर दुसऱ्या दिवशी स्थगित करण्यात आले. माढा-वैराग रस्त्यावरील अतिक्रमणे, रस्त्यालगतच्या साइडपट्ट्यांचा वापर तसेच पादचारी मार्गास अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणांबाबत यापूर्वी प्रशासनाकडे निवेदने दिली होती. मात्र, ठोस कारवाई न झाल्यास १ सप्टेंबरपासून तहसील कार्यालयासमोर शांततामय आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला होता. त्यानुसार मोमीन यांनी उपोषण सुरू केले. उपोषण सोडताना तहसीलदार संजय भोसले, नायब तहसीलदार विजय कवडे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता एम एच सय्यद उपस्थित होते.



### विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांच्या सुरक्षिततेबाबत अभाविपचे कुलगुरूंना निवेदन

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांच्या महत्त्वाच्या कागदपत्रांच्या स्वीकार व सुरक्षिततेबाबत अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सोलापूर महानगरच्या वतीने कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांना निवेदन देण्यात आले. विद्यापीठातील विद्यार्थ्यांकडून विविध शैक्षणिक व प्रशासकीय कामांसाठी आवश्यक असलेली महत्त्वाची कागदपत्रे अधिकृत कार्यालयात जमा न करता शिक्षकांकडे ठेवली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. विद्यार्थ्यांची कागदपत्रे ही अत्यंत संवेदनशील स्वरूपाची असल्याने त्यांच्या सुरक्षिततेबाबत तडजोड होऊ नये, अशी मागणी अभाविपने केली आहे. यावेळी अभाविप सोलापूर महानगर मंत्री रविकांत चांभार, पश्चिम भाग नगर मंत्री राहुल बोरगाव, विद्यापीठ अध्यक्ष ओम गुरव तसेच अभाविपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### सुखदेव रणदिवे



**पंढरपूर,दि.६ सप्टेंबर -**

तुंगत (ता.पंढरपूर) येथील सुखदेव दिगांबर रणदिवे (वय८६) यांचे रविवार दि.६ सप्टेंबर रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले,एक मुलगी सुना ,नातवंडे,परतंवडे असा परिवार आहे.पत्रकार संजय रणदिवे यांचे वडील, माजी सरपंच महादेव रणदिवे यांचे बंधू तर मजी सरपंच आगतराव रणदिवे यांचे चुलते होत.

---

# चाटे शिक्षण समूहाचे संचालक पांडुरंग घाडगे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

## लायन्स क्लब बार्शी रॉयलच्यावतीने सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ६ सप्टेंबर -**

येथील शैक्षणिक क्षेत्रात आपल्या उल्लेखनीय कार्याने वेगळा ठसा उमटवणाऱ्या गुणवंत शिक्षकांचा गौरव करण्यासाठी लायन्स क्लब बार्शी रॉयलच्यावतीने एका विशेष सोहळ्याचे आयोजन केले होते. सोहळ्यात चाटे शिक्षण समूह बार्शीचे संचालक श्री. पांडुरंग घाडगे यांना यंदाचा आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रीय शिक्षक दिनाचे औचित्य साधून बार्शी येथील रामकृष्ण हॉटेलमध्ये हा दिमाखदार सोहळा पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. सोहळ्याला प्रमुख उपस्थिती लायन्स क्लबच्या झोन चेअरमन ॲड. अमिता कारंडे यांची होती. त्यांनी आपल्या भाषणात लायन्स क्लबच्यावतीने सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केल्या जाणाऱ्या सेवाकार्याचा गौरव केला.



कार्यक्रमासाठी लायन्स क्लब बार्शी रॉयलचे अध्यक्ष ला. मंगेश बागुल, सेक्रेटरी ला. दयानंद रेवडकर आणि खजिनदार ला. उमेश जाधव यांच्यासह क्लबच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व हितचिंतकांनी परिश्रम घेतले. पांडुरंग घाडगे यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल बार्शीतील शैक्षणिक व सामाजिक स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

---

# सोलापूर जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा : रासप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. ६ सप्टेंबर -**

सोलापूर जिल्हा कोरडा दुष्काळ जाहीर करावा तसेच अक्कलकोट तालुक्यातील २०२५ सालाचे पिक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना त्वरित मिळावी याबाबतचे निवेदन सोलापूरचे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य भिवाजी वावरे, अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर, सोलापूर जिल्हा युवक आघाडी अध्यक्ष साहिल बंडगर, दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष तात्यासाहेब व्हनमाने, तमण्णा घोडके, नरेंद्र लोभे आदी उपस्थित होते. दुष्काळग्रस्त भागात जनावरासाठी पुरेसा चारा व पिण्याचे पाणी यासह चारा छावण्या सुरू कराव्यात. आर्थिक व प्रशासकीय उपायोजना करून द्याव्यात . शेतकऱ्यांना पिक विमा त्वरित मंजूर करून घ्यावा आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे.

---

# १७ रिव्हॉल्व्हर, ४७ जिवंत काडतूस प्रकरणातील आरोपींना जामीन

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ६ सप्टेंबर -**

अकलूज पोलीस ठाणे हद्दीत उघडकीस आलेल्या अवैध अग्निशस्त्र प्रकरणात मुख्य आरोपी म्हणून नमूद असलेले विकास कैलास वजाळे (वय ३१, रा. परिते, ता. माढा, जि. सोलापूर) यांना माळशिरस येथील न्यायालयाने आज २५ हजारांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला.

या प्रकरणात पोलिसांनी विकास वजाळे याच्याकडून तपासादरम्यान तब्बल १७ रिव्हॉल्व्हर आणि ४७ जिवंत काडतुसे विक्री केल्याबाबत माहिती मिळाल्याचे पोलिसांनी कागदपत्रांमध्ये नमूद केले आहे. त्यानुसार पोलिसांनी विविध ठिकाणी कारवाई करून अग्निशस्त्रे व जिवंत काडतुसे जप्त केल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, आज माळशिरस येथील न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान आरोपीच्या जामीन अर्जावर युक्तिवाद करण्यात आला. न्यायालयाने आरोपी विकास कैलास वजाळेला २५ हजारांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. आरोपीच्या वतीने ॲड. अजिंक्य संगीतराव यांनी काम पाहिले.

## ग्रामीणमधील रेशन दुकाने आज बंद

**अकलूज, दि. ६ सप्टेंबर -**

रेशन दुकानांमधून ई-पॉस मशीनद्वारे धान्य वितरण करताना गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने निर्माण होणाऱ्या गंभीर तांत्रिक अडचणींच्या निषेधार्थ सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील सर्व रास्त भाव धान्य दुकाने आज, सोमवार दि. ७ रोजी एक दिवस बंद ठेवण्यात येणार आहेत. अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ, सोलापूर ग्रामीण जिल्ह्याच्या वतीने हा आंदोलनात्मक निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष विजय मंडलिक यांनी दिली. ई-पॉस मशीनमध्ये अनेक तांत्रिक अडचणी आहेत.



# सव्वा ६ लाखांचे गहाळ मोबाईल मूळ मालकांना सुपूर्द

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.६ सप्टेंबर -**

करमाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून सन २०२४, २०२५ आणि २०२६ मध्ये गहाळ झालेले तब्बल २८ मोबाईल शोधण्यात करमाळा पोलिसांना यश आले आहे.

तांत्रिक विश्लेषण आणि पोर्टलच्या मदतीने सुमारे ६ लाख ३० हजार रुपये किमतीचे हे मोबाईल शोधून ते मूळ तक्रारदारांना परत करण्यात आले आहेत.

सायबर पोलीस ठाण्याच्या मदतीने करमाळा पोलिसांनी गहाळ मोबाईलचा शोध घेण्याची ही धडक कारवाई केली.

यापुढे कोणत्याही नागरिकाचा मोबाईल गहाळ झाल्यास त्यांनी आपल्या हद्दीतील पोलीस स्टेशनमध्ये मोबाईलच्या संपूर्ण कागदपत्रांसह रीतसर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करमाळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजीत माने यांनी केले आहे.

---

# पंढरपूर सिंहगडमध्ये 'मेंटॉरबाइट' उपक्रमातून गुरुजनांप्रती कृतज्ञता

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.६ सप्टेंबर-**

एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोर्टी, पंढरपूर येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभाग व आय.ई.टी.ई. क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'मेंटॉरबाइट अ बाइट ऑफ ग्रॅटिट्यूड फॉर अवर मेंटॉर्स' या विशेष उपक्रमाचे आयोजन शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी करण्यात आले.

'मार्गदर्शकांचा सन्मान, गुरुजनांचा गौरव आणि उज्ज्वल भविष्याची प्रेरणा' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी शिक्षकांसाठी स्मरणशक्ती चाचणी, तर्कशक्ती व आठवण आव्हाने, बुद्धिकौशल्य चाचणी आणि मनोरंजक उपक्रमांवर आधारित तांत्रिक स्पर्धेचे आयोजन केले. गुरुजनांना विशेष भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.



इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. अल्ताफ मुलाणी यांनी अशा उपक्रमांचे आयोजन विद्यार्थ्यांमध्ये कृतज्ञता, आदर आणि आत्मीयतेची भावना निर्माण करण्यास उपयुक्त ठरते, असे सांगितले. कॉलेजचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी उपक्रमाचे कौतुक केले. उपक्रमासाठी डॉ. अल्ताफ. मुलाणी, प्रा. वैभव गोडसे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, श्रावणी हुंडेकरी, श्रुती बजाज आदींचे सहकार्य लाभले.

# ध्वनिमुद्रिकांपासून रुग्णसेवेच्या वारशाच्या पाऊलखुणांतून इतिहासाशी संवाद

## 'इंटॅक'च्या हेरिटेज वॉकमधून सोलापूरच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ सप्टेंबर-**

स्वातंत्र्याच्या ८०व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधत सोलापूरच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक वारशाची ओळख नव्या पिढीला करून देण्याच्या उद्देशाने इंटॅकच्या वतीने विशेष 'हेरिटेज वॉक'चे आयोजन करण्यात आले.

भुईकोट किल्ल्यावर पुरातत्त्व विभागाच्या वतीने आयोजित ध्वजारोहण सोहळ्याने प्रारंभ झाला. इंटॅक सोलापूरचे पदाधिकारी विशेष निमंत्रित होते. या वारसा फेरीची संकल्पना डॉ. सीमंतिनी चाफळकर यांनी सांगितली. या प्रसंगी इंटॅक सोलापूरचे समन्वयक प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर, सहसमन्वयिका श्वेता कोठावळे आणि डॉ. सीमंतिनी चाफळकर यांच्या हस्ते संग्रहक जयंत राळेरासकर आणि मोहन सोहनी यांचा सत्कार केला. संस्थेचे अध्यक्ष सत्यनारायण गुंडला, सेक्रेटरी विनायक पालमुरे, सल्लागार शंभूसिंह चौहान, विश्वस्त सुनील माढेकर व श्री करपे आदींनी उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. उपक्रमासाठी श्वेता कोठावळे, पुष्पांजली काटीकर, नितीन अनवेकर, अच्युत काटीकर आदी उपस्थित होते.



---

# जामगावातील खून-घरफोडी प्रकरणाचा तीन दिवसांत उलगडा

## वाडी रेल्वे पोलिसांच्या मदतीने कर्नाटकातून आरोपी ताब्यात

## सीसीटीव्हीच्या आधारे गुन्ह्याचा छडा, आरोपी जेरबंद

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ६ सप्टेंबर -**

माढा तालुक्यातील जामगाव येथे घरफोडी करून चोरी करण्याच्या उद्देशाने घरात शिरलेल्या चोरट्याने ६१ वर्षीय वृद्धाचा हातोड्याने डोक्यात प्रहार करून खून केला होता. प्रकरणाचा माढा पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या तीन दिवसांत छडा लावत आरोपीला कर्नाटकातील कलबुर्गी भागातून ताब्यात घेतले आहे.

मयत अशोक मुळे (वय ६१) यांच्या डोक्यात घातक हत्याराने जबर मारहाण करून खून केला होता. त्यानंतर घरातील लोखंडी कपाटातून सुमारे २ लाख ४० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची फिर्याद त्यांचे पुत्र विजयकुमार मुळे यांनी माढा पोलिस ठाण्यात दिली होती. घटनेनंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी व अंमलदारांची स्वतंत्र चार पथके तयार केली. सहायक पोलिस निरीक्षक विजय शिंदे यांच्या पथकाने जामगाव येथे ३ दिवस तळ ठोकून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली.

पोलिसांनी तब्बल २०० सीसीटीव्ही फुटेजचा माग काढला. त्यामध्ये संशयित आरोपी गावात ये-जा करताना दिसून आला. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे त्याचा माग काढत तो कर्नाटकातील कलबुर्गी भागात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानंतर वाडी रेल्वे पोलिसांच्या मदतीने आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

आरोपीला माढा न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला ५ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास माढा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक रोहित शिंदे करत आहेत.

### शेअर मार्केटमध्ये मोठा आर्थिक फटका

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार आरोपी अजयकुमार गौतम चव्हाण (वय ३१, रा. जामगाव, सध्या लऊळ) हा बेरोजगार असून त्याने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी सुमारे १५ ते २० लाख रुपये उसने घेतले होते. शेअर मार्केटमध्ये मोठा आर्थिक फटका बसल्याने तो कर्जबाजारी झाला होता. त्यातूनच चोरी करण्याचा मार्ग त्याने स्वीकारल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

### सोशल मीडियावरील व्हिडिओची पद्धत वापरली

चोरी करण्यासाठी आरोपीने सोशल मीडियावर पाहिलेल्या व्हिडिओमधील पद्धतीचा वापर केल्याचे तपासात समोर आले आहे. घरात प्रवेश केल्यानंतर त्याने लोखंडी कपाटाचे कुलूप उघडून चोरीचा प्रयत्न केला. यावेळी अशोक मुळे यांनी आरडाओरड सुरू केल्याने आरोपीने हातातील हातोड्याने त्यांच्या डोक्यात प्रहार करून त्यांचा खून केला आणि त्यानंतर घरातील सोन्याचे दागिने घेऊन पसार झाला.

## महत्वाचे...

### शेजाऱ्यासोबत तक्रार झाल्याच्या रागात वृध्द महिलेने पिले फवारणीचे औषध

**सोलापूर, दि.६ सप्टेंबर-**

शेजाऱ्यासोबत तक्रार झाल्याच्या रागात एका वृध्द महिलेने पिकावर फवारणी करण्याचे औषध पिल्याची घटना बार्शी तालुक्यातील वैराग येथे रविवार, दि.६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडली. महानंदा बाबू माने (वय-६६) असे त्या महिलेचे नाव आहे. शेजाऱ्याबरोबर तक्रार झाल्याच्या रागात त्यांनी घरामध्ये असताना पिकावर फवारणी करण्याचे औषधे पिले. याचा त्रास होऊ लागल्याने त्यांना वैरागच्या आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन मुलगी शुभांगी हिने सोलापुरातील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केले.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील वृध्द दाम्पत्य जखमी

**सोलापूर, दि.६ सप्टेंबर-**

अज्ञात वाहनाने धडक दिल्याने दुचाकीवरील वृध्द दाम्पत्य जखमी झाल्याची घटना धाराशिव-नळदुर्ग रस्त्यावरील देवसिंगा पाटी टोलनाक्याजवळ घडली. खतिजा जब्बार शेख (वय-६०), जब्बार अब्दुल शेख (वय-६६, दोघेही रा.धाराशिव) अशी जखमी दाम्पत्यांचे नाव आहे. ते दोघे दुचाकीवरुन धाराशिवहून नळदुर्गकडे निघाले असता देवसिंगा पाटी टोलनक्याजवळ मागून येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली. नळदुर्ग येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन मुलगा सत्तार शेख याने सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या

**मंगळवेढा, दि.६ सप्टेंबर-**

कर्जबाजारीपणाला कंटाळून एकाने लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मंगळवेढा शहरातील खोमनाळ रोडजवळील प्रविण वाकडे यांच्या शेतात घडली. दत्तात्रय नामदेव पाटोळे (वय-४२, रा.मेडशिंगी, ता.सांगोला, जि.सोलापूर, हल्ली रा मुंबई) असे त्यांचे नाव आहे. प्रकाश आवताडे (रा.दातपूर, ता.मोहोळ, जि.सोलापूर) याने दत्तात्रय पाटोळे यांना पैसे देण्यासाठी लावलेल्या तगाद्यास व वारंवार दिलेल्या मानसिक त्रासाला कंटाळून ही आत्महत्या केली, असे दयानंद नामदेव पाटोळे (वय-३८, रा.मेडशिंगी) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

# शिक्षणातून समाज घडविण्याऐवजी पैसा कमावणाऱ्या लाचारांच्या फौजा तयार

## प्रा.डॉ.राजन गवस यांचे परखड मत

## लोकमंगल शिक्षकरत्न, आदर्श शाळा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ सप्टेंबर-**

शिक्षणातून समाज घडविण्याऐवजी आपण जणू पैसा कमावणाऱ्या लाचारांच्या फौजा तयार केल्या आहेत, असे परखड मत नामवंत लेखक तथा परिवर्तनवादी विचारवंत प्रा.डॉ. राजन गवस यांनी व्यक्त केले.

लोकमंगल फाउंडेशन आणि लोकमंगल सहकारी पतसंस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिक्षकरत्न व आदर्श शाळा पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आमदार सुभाष देशमुख होते.

शिक्षणाचा प्रसार व्हावा, समाज घडावा, चांगली पिढी निर्माण व्हावी, यासाठी ज्यांनी आपले आयुष्य वेचले, त्या महापुरुषांचे शिक्षणविषयक स्वप्न भंगले, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

आपला मुलगा किंवा मुलगी शिक्षणातून चांगला माणूस म्हणून घडावा, अशी अपेक्षा पालकांना नसते असे नाही; मात्र अनेक पालकांचे लक्ष मुलाने किंवा मुलीने शिक्षणातून किती पैसा कमवावा, याकडे अधिक लागलेले असते, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी दोन जिल्हा परिषद शाळा, नऊ शिक्षकांचा पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. पाच हजार रुपये रोख, पुस्तके आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप होते. 'लोकमंगल फाउंडेशनच्या लोटस' योजनेतून हुशार विद्यार्थ्यांना मदतीचे धनादेशही प्रदान करण्यात आले. डॉ.ह.ना. जगताप यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. अरविंद जोशी आणि नागनाथ येवले यांनी पुरस्कार विजेत्यांची माहिती दिली. ॲड. गजानन भाकरे यांनी प्रास्ताविक केले. राजकिरण चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. तानाजी माने यांनी आभार मानले. यावेळी प्रा.देवानंद चिलवंत, डॉ. आशालता जगताप, पतसंस्थेचे चेअरमन गुरण्णा तेली यांच्यासह पुरस्कार निवड समितीचे सदस्य, अन्य मान्यवर उपस्थित होते.



### यांचा झाला सन्मान

प्राथमिक विभागातून हनुमंत सिध्दराम बनसोडे (उपरी, ता.पंढरपूर), गौरीशंकर खोबरे (सिंदखेड, ता.दक्षिण सोलापूर). माध्यमिक विभागातून श्रुती बागेवाडी (सोलापूर), संजय भस्मे (सोलापूर). कनिष्ठ महाविद्यालय विभागातून प्रसन्न नाझरे (सोलापूर), गणेश मुडेगावकर (सोलापूर). वरिष्ठ महाविद्यालय विभागातून प्रा.डॉ.श्रीनिवास मेतन, डॉ.बाळकृष्ण लोखंडे यांना पुरस्कार देण्यात आला.

### यांचा झाला गौरव

सोलापूरचे नाव मोठे करणारे आणि लंडनमध्ये स्वतःचा उद्योग सुरू करणारे युवा उद्योजक तेजस संजीव कुसूरकर यांचे शिक्षक कौस्तुभ गोडबोले यांना डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम पुरस्कार, सांगोला तालुक्यातील शिवणे गावच्या शेळकेवाडी येथील जि.प.प्राथमिक शाळा आणि दक्षिण तालुक्यातील कारकल येथील जिल्हा परिषद शाळेला आदर्श शाळा म्हणून गौरविण्यात आले.

### पुढील आठवड्यात 'त्या' मुलीचा विवाह

लोकमंगल फाउंडेशनच्या सामूहिक विवाह सोहळ्याला १८ वर्षे पूर्ण झाली आहेत. या उपक्रमातील पहिल्या विवाह सोहळ्यात विवाह झालेल्या जोडप्यांना पहिली मुलगी झाल्यास तिच्या नावावर काही रक्कम ठेवण्यात आली होती. आता या उपक्रमाला १८ वर्षे पूर्ण झाल्याने व्याजासह जमा झालेली रक्कम संबंधित मुलीला देण्यात आली. संबंधित मुलीचा विवाह पुढील आठवड्यात होणार असल्याने तिच्या विवाहासाठी ही रक्कम देण्यात आली.

## रोटरी क्लब ऑफ सोलापूर मेट्रोच्या अध्यक्षपदी काटकर, सचिवपदी गुरव




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ सप्टेंबर-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर मेट्रोच्या अध्यक्षपदी दिनेश काटकर तर सचिवपदी कल्लप्पा गुरव यांची निवड करण्यात आली.

प्रांतपाल जयेश पटेल, सहाय्यक प्रांतपाल चार्वाक बुर्गुल यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या एका कार्यक्रमात त्यांनी पदग्रहण केले. ही निवड २०२६-२७ या वर्षासाठी असल्याचे यावेळी सांगण्यात आले. याप्रसंगी डॉ.अभिजीत जगताप, डॉ.श्रीकांत अंजुटगी, विश्वनाथ कोळी, गौरी गुरव, महेश नक्का यांच्यासह रोटेरियन्स उपस्थित होते.

## 'गोकुळ'च्या थकीत ऊस बिलांसाठी आज ठिय्या आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.६ सप्टेंबर-**

ऊसाचे दोन हंगाम उलटूनही ऊस बिलाची थकीत रक्कम हातात न पडल्याने गोकुळ साखर कारखान्याविरोधात सोमवार, दि.७ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयवर धडकणार, त्याठिकाणी ठिय्या आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

ऊस गाळप करुनही 'एफआरपी'ची रक्कम वेळेत न मिळाल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक अडचणींचा भार वाढला आहे. शेतीसाठी घेतलेली कर्जे, पुढील हंगामाचा खर्च, मजुरी, खते-बियाणे यासाठी पैशांची गरज असताना कारखान्याकडून थकीत बिलांचा प्रश्न प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.

दरम्यान, या प्रश्नाबाबत 'दक्षिण'चे तहसीलदार किरण जमदाडे यांनी गोकुळ साखर कारखान्याला पत्र



पाठविले आहे. शेतकऱ्यांची देणी देण्याबाबत प्रशासनाने कारखान्याकडे पाठपुरावा केला आहे. तसेच आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दोन हंगामांची बिले थकीत असून शेतकऱ्यांनी कारखान्याला ऊस दिल्यानंतरही त्यांच्या हक्काची रक्कम मिळालेली नाही. प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न सुटला नाही. त्यामुळे आता बिले मिळेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, असे आंदोलनकर्ते शेतकरी ॲड.अमोल पाटील यांनी सांगितले.

## ५१ शिक्षक-कर्मचाऱ्यांसह १२ शाळांचा होणार गौरव

### दि.13 सप्टेंबरला पंढरपुरात होणार पुरस्कार वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ सप्टेंबर-**

शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासोबतच नावीन्यपूर्ण उपक्रम, विद्यार्थिकेंद्रित प्रयोग आणि शैक्षणिक विकासासाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कार्याची दखल घेत जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाने जिल्हास्तरीय आदर्श पुरस्कार जाहीर केले आहेत. यंदा १२ आदर्श शाळांसह एकूण ५१ शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

रविवार, दि.१३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पंढरपूरस्थित इसबावी येथील संतराज पॅलेस येथे आमदार जयंत आसगावकर, पुणे विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ.गणपत मोरे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येतील. सेवानिवृत्त मुख्याध्यापक आर.डी. पवार यांना 'मुख्याध्यापक जीवनगौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

यावेळी नागेश बंडे, लक्ष्मीबाई पारधे, नागेश लोंगोटे, दत्तात्रय बिराजदार, हेमंत गुंड, भारत गायकवाड, अंकुश कांबळे, दशरथ गुरव, सावता घाडगे या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय (सोलापूर) न्यू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय (वडाळा), देवमाता प्रशाला (सादेपूर), एच.जी. प्रचंडे प्रशाला (नागणसूर), कै.शंकरराव मोहिते-पाटील विद्यालय (बैरागवाडी), शरदचंद्र पवार माध्यमिक विद्यालय (कुंभारगाव), शरणबसवेश्वर विद्यामंदिर (नंदूर), श्री हनुमान विद्यामंदिर प्रशाला (तोंडले), सहकारमहर्षी गणपतराव साठे प्रशाला (माढा), यशवंत हायस्कूल (शिरभावी), आदर्श प्रशाला व न्यू कॉलेज (करकंब), हनुमान विद्यामंदिर (कव्हे) या शाळांचा गौरव करण्यात येणार आहे.

## गणेशोत्सव मंडळात दररोज किमान दोन कार्यकर्ते उपस्थित ठेवावेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ सप्टेंबर-**

डीजे-डॉल्बीमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याबरोबरच उत्सव काळात मुर्तीच्या सुरक्षेसाठी मंडळात दररोज दोन कार्यकर्ते उपलब्ध ठेवावेत.विसर्जनाच्या दिवशी पोलिसांनी दिलेल्या वेळेचे व सूचनांचे पालन करावे, असे आवाहन सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात झालेल्या शांतता समितीच्या बैठकीत करण्यात आले.

सोलापूर तालुका पोलिस ठाण्याचे पोनि कुंदन गावडे हे अध्यक्षस्थानी होते. प्रत्येक गणेश मंडळाने पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा वापर करावा, समाजोपयोगी उपक्रम राबवावेत. उत्कृष्ट गणेश मंडळांना बक्षिसे देण्यात येणार आहे, असेही सांगण्यात आले

पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुरज जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक घेण्यात आली. सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ कदम यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रवीण जर्दे, स्नेहलता सुपे, सीमा डोंगरीतोट आदी उपस्थित होते.




## 'भाजपा'च्या नगरसेवकांनी घेतले महापालिका कारभाराचे धडे




### सभागृहापासून विकासकामांपर्यंत नेत्यांचा कारभाराचा कानमंत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ सप्टेंबर-**

महापालिकेचा कारभार प्रभावीपणे हाताळण्यापासून नागरिकांचे प्रश्न सोडविण्यापर्यंतचे धडे भाजपच्या नगरसेवकांना देण्यात येत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूरसह चार महापालिकांतील नगरसेवकांचे मुंबईस्थित भाईंदर येथे प्रशिक्षण सुरू आहे. भाजपच्या नगरसेवकांना महापालिका कारभाराचे धडे देण्यात आले. सभागृहापासून विकासकामांपर्यंत अनुभवी नेत्यांनी कारभाराचा कानमंत्र दिला.

महापालिका सभागृहातील प्रभावी कामकाज, प्रशासनाशी समन्वय, नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक आणि विकासकामांचे नियोजन कसे करावे, याचे धडे भाजपच्या नगरसेवकांना देण्यात येत आहेत. भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने आयोजित 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६' अंतर्गत सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली महानगरपालिकांतील भाजपच्या नगरसेवकांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.


या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, राजेश पांडे, चंद्रकांत पाटील, डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, सोलापूरचे महापौर विनायक कोंड्याल यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रशिक्षणाच्या माध्यमातून नगरसेवकांना पक्षाची रणनीती, संघटनात्मक कार्यपद्धती आणि महापालिकेचे प्रभावी कामकाज याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापालिकेतील आपल्या अनुभवांचा दाखला देत नगरसेवकांनी सभागृहात प्रभावीपणे काम कसे करावे, नागरिकांचे प्रश्न प्रशासनाकडून कसे सोडवून घ्यावेत आणि विकासकामांचे नियोजन कोणत्या पद्धतीने करावे, याबाबत मार्गदर्शन केले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी, पक्षाची भूमिका आणि संघटनात्मक शिस्त यावर मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणामध्ये महासभा, स्थायी समिती आणि प्रभाग समितीचे कामकाज, सभागृहाचे नियम, प्रश्न उपस्थित करण्याची पद्धत, तारांकित व अतारांकित प्रश्न, प्रभावी भाषण, प्रशासनाशी समन्वय आणि नागरिकांच्या प्रश्नांवर काम करण्याची कार्यपद्धती या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा महापालिका क्षेत्रात प्रभावी वापर, प्रभाग विकास आराखडा, पायाभूत सुविधा, स्वच्छ भारत अभियान, अमृत २.०, प्रधानमंत्री आवास योजना, पीएम स्वनिधी, डिजिटल सुशासन आणि नागरिकाभिमुख प्रशासन आदी विषयांचाही प्रशिक्षणात समावेश आहे.

### नव्या नगरसेवकांना प्रश्न मांडण्याची संधी

नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांना महापालिका कामकाजासंदर्भातील प्रश्न थेट मांडण्याची संधी या प्रशिक्षणात मिळणार आहे. प्रशासनाशी समन्वय, नागरिकांच्या अपेक्षा, प्रभाग विकासाचे नियोजन आणि उपलब्ध निधीचा प्रभावी वापर यावरही चर्चा करण्यात येणार आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## रानभाजी महोत्सवातून पारंपरिक आहार संस्कृतीचे जतन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ सप्टेंबर : येथील राजर्षी शाहू महाविद्यालय येथील वनस्पतीशास्त्र विभागामध्ये रानभाजी महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आजूबाजूच्या परिसरातून विविध प्रकारच्या रानभाज्यांचे संकलन करून त्यांचे प्रदर्शन आयोजित केले होते. यातून पारंपारिक आहारसंस्कृतीचे जतन करण्याचा प्रयत्न केला गेला.

रानभाजी महोत्सवात विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या विविध रानभाज्यांची ओळख करून देत त्यांच्या पौष्टिक मूल्यांबाबत तसेच औषधी महत्त्वाबाबत जागरूकता निर्माण केली.

उद्घाटन डॉ. पुष्पलता त्रिमुखे यांनी केले. प्रसंगी जगन्नाथ क्षीरसागर, शिवाजी कांबळे उपस्थित होते.

या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. कल्याण सावंत, प्रा. ज्ञानोबा आव्हाड, प्रा. प्रांजली कुंभार, प्रा. प्रतिमा गोरे, प्रा. नेहा कांबळे, निवृत्ती काथवटे, गोविंद धुमाळ, सिंबायोसिस असोसिएशनचे अध्यक्षा निशात पटेल, विद्यार्थी तसेच सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.



## विविध वृत्त.....

### तुळजाभवानी विद्यालयात दहीहंडी व शिक्षक दिन उत्साहात



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ सप्टेंबर : येथील तुळजाभवानी शैक्षणिक संकुलामध्ये दहीहंडी आणि शिक्षक दिन हा दुहेरी सण उत्साहात साजरा करण्यात आला. एका बाजूला बालगोपाळांचा 'गोविंदा रे गोपाळा'चा गजर तर दुसरीकडे गुरूंविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. प्रमुख पाहुण्या म्हणून संस्थाध्यक्षा के. ए. जायेभाये उपस्थित होत्या. यावेळी प्राचार्य जी. आर. मुंडे व मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे यांची विशेष उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व भगवान श्रीकृष्ण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सर्व शिक्षकांना पुष्पगुच्छ देऊन शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच संस्थेच्यावतीने प्राचार्य जी. आर. मुंडे व मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी स्वप्नाली भुरके, पूर्वी सुतार व ज्ञानेश्वरी दुर्गाडे या विद्यार्थिनी व शिक्षक व्ही. व्ही. लोहारे यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी सुंदर गीत सादरीकरण केले. त्यानंतर मानवी थर रचून दहीहंडी फोडून गोपाळकाला साजरा केला. यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थ्यांनी साजरा केलेला हा आनंदोत्सव संस्मरणीय ठरला. सूत्रसंचालन एस. बी. शिंदे यांनी केले, तर आभार आर. ए. एडके यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### माऊली विद्यालयाचा श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव उत्साहात संपन्न



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ सप्टेंबर : शहरातील आंबेजोगाई रोड वरील माऊली शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित माऊली बालक मंदिर ,माऊली विद्यार्थी विकास केंद्र व माऊली इंटरनॅशनल मॉडेल स्कूल येथे श्रीकृष्ण गोकुळाष्टमी व दहीहंडी चा सुंदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यालयातील विद्यार्थ्यांनी

राधे राधे या गीतावर एक सुंदर आकर्षक नृत्य सादर केले, या नृत्यामध्ये श्रीकृष्णाच्या जीवनातील जन्म उत्सव,नटखट बालकृष्ण लीला , दहीहंडी व राधाकृष्ण रासलीला असे विविध दृश्य नृत्या मधून सादर केले . कार्यक्रमात श्रीकृष्ण पाळणा सजावट करून माऊलीच्या प्राचार्या सौ.कविता आरडले मॅडम उपप्राचार्या काळेमॅडम व सर्व शिक्षिकेंच्या हस्ते श्रीकृष्णांचा पाळणा झुलविण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात श्रीकृष्ण प्रतिमा पूजनाने तर समारोप श्रीकृष्णाच्या आरतीने करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्था सचिव श्री गंगाधर आरडले सर यांनी केले सूत्रसंचालन भाग्यश्री उबाळे मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे कोषाध्यक्ष तानाजी बेवनाळे पाटील संपूर्ण शिक्षक वृंद पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमात विद्यालयातील क्रिएटिव्ह टीमने दहीहंडी व सुंदर डिस्प्ले बोर्ड डिझाईन, तयार करून उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी व्यवस्थापक गोपाळ करडिले सर व कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.

### अंकुर बालविकास केंद्रात शिक्षक दिन साजरा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ सप्टेंबर : विद्यार्थ्यांच्या जीवनाला ज्ञान, संस्कार आणि दिशा देणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे शिक्षक न दिन. भारताचे माजी राष्ट्रपती, महान शिक्षणतज्ज्ञ व तत्त्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या न जयंतीनिमित्त अंकुर बालविकास केंद्र, लातूर येथे शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

यावेळी संस्थेचे संस्थापक सचिव व्यंकट दापेगावकर कौषाध्यक्षा विजया दापेगावकर यांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान देणारा नसतो, तर तो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देणारा, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला घडवणारा आणि जीवनाच्या वाटेवर योग्य दिशा दाखवणारा शिल्पकार असतो. त्यामुळे शिक्षकांचा सन्मान म्हणजे समाजाच्या उज्ज्वल भविष्याचा सन्मान होय, हा संदेश या कार्यक्रमातून अधोरेखित झाला.

## दहीहंडीच्या जल्लोषाने डॉक्टरांच्या दिनचर्येला आनंदाची किनार

# लातूर आयएमएचा पहिलाच उपक्रम ठरला संस्मरणीय







तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ सप्टेंबर : ढोल-ताशांचा कडकडाट... लेझीमच्या तालावर थिरकणारे डॉक्टर... 'गोविंदा आला रे!'च्या जयघोषात थरावर थर चढविणारे गोविंदा... फुलांची उधळण, पाण्याचे फवारे उधळण आणि दहीहंडी फोडताच उसळलेला जल्लोष! अशा उत्साहपूर्ण आणि भारावलेल्या वातावरणात इंडियन मेडिकल असोसिएशनच्या लातूर शाखेच्या वतीने श्रीकृष्ण जन्माष्ठनिमित्त आयोजित पहिल्याच दहीहंडी उत्सवाने डॉक्टरांच्या व्यस्त दिनचर्येला आनंदाची किनार दिली. रुग्णसेवेच्या धावपळीत सदैव व्यस्त असणाऱ्या डॉक्टरांनी काही क्षण कामाचा ताण बाजूला ठेवत एकत्र येऊन मनमोकळा संवाद साधला आणि उत्सवाचा मनमुराद आनंद लुटला.

या अनोख्या उपक्रमात व्यवसायाने डॉक्टर असलेले आणि सध्या लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यांच्या उपस्थितीने डॉक्टरांचा उत्साह आणखी वाढला.

यावेळी डॉ. काळगे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या हस्ते विजेत्या गोविंदा पथकांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.दहीहंडी स्पर्धेत लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील युवा गोविंदा संघाने प्रथम क्रमांक पटकावत अकरा हजार रुपयांचे पारितोषिक मिळविले. पाच हजार रुपयांचे द्वितीय पारितोषिक जिल्हा क्षयरोग कार्यालयाच्या संघाने पटकावले, तर अडीच हजाराचे तृतीय पारितोषिक 'आपलं घर' संस्थेच्या चमूने मिळविले. उत्सवात एकूण पाच दहीहंडी फोडण्यात आल्या. मानवी मनोरे रचताना सहभागींच्या धैर्यासोबतच परस्परांवरील विश्र्वास, अचूक समन्वय आणि सांघिक भावनेचे दर्शन घडले. दहीहंडीची उत्साहवर्धक गीते, ढोल-ताशांचा निनाद, लेझीमचा ताल आणि फुलांची उधळण यामुळे वातावरणात चैतन्य संचारले.

डॉक्टरांसह त्यांच्या कुटुंबीयांनीही या सोहळ्याचा मनमुराद आनंद घेतला.रुग्णसेवेची जबाबदारी, कामाचा ताण आणि सततची धावपळ ही डॉक्टरांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. रुग्णसेवेत दिवसरात्र झटणाऱ्या डॉक्टरांसाठी हा केवळ दहीहंडीचा उत्सव न ठरता कामाच्या ताणातून काही क्षण विरंगुळा मिळवत 'आपण सगळे एकत्र आहोत' ही भावना अधिक दृढ करणारा स्नेहसोहळा ठरला. त्यामुळे आयएमएच्या या पहिल्याच दहीहंडी उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक व स्वागत केले.

# कव्हा येथे अवैध गांजा लागवडीवर स्थानिक गुन्हे शाखेचा छापा



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ६ सप्टेंबर :लातूर जिल्ह्यातील अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायाविरोधात सुरू असलेल्या कारवाईदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेने लातूरपासून जवळच असलेल्या कव्हा येथील कोळी गल्ली परिसरात छापा टाकून घराच्या बाजूच्या खुल्या जागेत करण्यात आलेली अवैध गांजाची लागवड उघडकीस आणली. या कारवाईत १३ किलो ६५२ ग्रॅम हिरवी गांजाची झाडे जप्त करण्यात आली असून, जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ६ लाख ८२ हजार ६00 रुपये इतकी आहे.

कव्हा येथील एका व्यक्तीने आपल्या राहत्या घराच्या पाठीमागील बाजूस असलेल्या खुल्या जागेत अवैधरित्या गांजाची झाडे लावल्याची खात्रीशीर माहिती स्थागुशाला दिली. या माहितीची सत्यता पडताळून पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे सूचनेनुसार व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, यांच्या नेतृत्वातील पोलीस उपनिरीक्षक अमर केंद्रे, नायब तहसीलदार सतीश कांबळे, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे शासकीय कर्मचारी यांना पंच म्हणून तसेच प्रादेशिक न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या भ्रमण वैज्ञानिक पथकाला, व स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिस अंमलदार यांना सोबत घेऊन सायंकाळी कव्हा येथील कोळी गल्ली परिसरात जाऊन संशयित व्यक्तीचा शोध घेतला. यावेळी मुक्तार गफुरसाब शेख (वय ४५ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. कोळी गल्ली, कव्हा, ता. जि. लातूर) हा त्याच्या राहत्या घराच्या परिसरात आढळून आला. नायब तहसीलदार, शासकीय पंच व इतर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संबंधित जागेची तपासणी केली असता घराच्या शेजारील खुल्या जागेत गांजाची झाडे लावून त्यांची निगा राखण्यात येत असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी सदर झाडे उपटून वैज्ञानिक पथकाच्या मदतीने त्यांचे वजन केले असता, गांजाचे एकूण वजन १३ किलो ६५२ ग्रॅम आढळून आले. प्रति किलो ५0 हजार रुपये दराने जप्त गांजाची एकूण किंमत ६ लाख ८२ हजार ६00 रुपये इतकी असून ते जप्त करण्यात आले व दोन पोत्यांमध्ये भरून सीलबंद करण्यात आला. संपूर्ण कारवाईचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात आले आहे. या प्रकरणी मुक्तार गफुरसाब शेख याच्याविरुद्ध पोलीस ठाणे लातूर ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, पोलीस उपनिरीक्षक अमर केंद्रे, सफौ. सर्जेराव जगताप, पोलीस अंमलदार युवराज गिरी, रियाज सौदागर, प्रदीप स्वामी, सिद्धेश्र्वर मदने,जमीर शेख, राहुल कांबळे, काकासाहेब बोचरे, फोटोग्राफर सुहास जाधव, संतोष खांडेकर व व्यंकटेश निटुरे यांनी केली आहे.

## शिक्षक दिन उत्साहात; प्रा. मुळे यांचा सेवापूर्ती गौरव



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. ६ सप्टेंबर : प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा रूपचंद नगर, रेणापूर येथे शनिवार दि५ सप्टेंबर रोजी भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याच कार्यक्रमात रूपचंद कनिष्ठ विद्यालयाचे प्राध्यापक मुळे संतोषकुमार सर यांच्या सेवापूर्ती बद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव श्रीमती उषाताई राठोड होत्या. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांचे पुष्प देऊन स्वागत केले. विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगत शिक्षकांविषयी आपले मनोगत व्यक्त केले.

माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रदीप राठोड यांनी शिक्षक व विद्यार्थी कसा असावा, तसेच शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील नाते कसे असावे, याबाबत विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यानंतर प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक लव्हेकर सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच प्रा.उगिले सर,प्रा.खाडप सर व प्रा.गुडे सर , वडवले सर यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगितले.

प्रा.मुळे संतोषकुमार सर यांनी आपल्या सेवाकाळातीआठवणींना उजाळा दिला विद्यार्थ्यांना ज्ञानदाना संबंधी मार्गदर्शन करून शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले असल्याचे सांगताना भारावून गेले. त्यांच्या सेवापूर्तीबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माने सर यांनी केले,तर आभार प्रदर्शन प्रा. किनीकर सर यांनी केले. यावेळी शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

## गुरूंचा सन्मान आणि विद्यार्थ्यांचा गौरव यातून सक्षम समाज आणि उज्वल राष्ट्राची निर्मिती होते : आ. बनसोडे





तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ६ सप्टेंबर : गुरुंचा सन्मान आणि विद्यार्थ्यांचा गौरव यातूनच सक्षम समाज आणि उज्ज्वल राष्ट्राची निर्मिती होते. शिक्षक हे केवळ विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देऊन त्यांना जीवनाची दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. ग्रामीण भागातील शिक्षक अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील असतात. त्यांच्या योगदानाचा सन्मान होणे ही समाजाची जबाबदारी असल्याचे माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी सांगितले.

ते उदगीर तालुक्यातील डोंगरशेळकी येथे आयोजित शिक्षक दिनाचे औचित्य साधून ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने शिक्षकांचा सन्मान तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभाप्रसंगी बोलत होते .

उदगीर पंचायत समितीच्या सभापती वनमाला मरलापल्ले, जि.प. चे बांधकाम व आरोग्य सभापती ज्ञानेश्र्वर बिरादार, रा.काँ.चे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, व्यंकटराव मरलापल्ले, नितिन लोहकरे,उपसभापती विक्की भोसले, माजी उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले, यमुनाजी भुजबळे, सरपंच नागरबाई कांबळे, गणपत पवार, संदिप बिरादार, ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष राजीव किनीकर, कार्यक्रमाचे संयोजक शिवाजी शिंदे, सचिव नागेश नवाडे, उपाध्यक्ष रोहिदास कलवले, सदस्य डि.ए. कांबळे, लक्ष्मीकांत मोरे, यादुल डांगे, नागनाथ ससाणे, जयराम देमगुंडे, भिमसेन कांबळे, आदी उपस्थित होते.

यावेळी माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी गुरुंच्या कार्याचा गौरव करत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

ग्रामीण पत्रकार संघाच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याचा उपक्रम स्तुत्य असल्याचे सांगत आमदार संजय बनसोडे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश हे त्यांच्या मेहनतीसोबतच पालक, शिक्षक आणि मार्गदर्शकांच्या योगदानाचे फलित आहे. अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा सार्वजनिकरित्या गौरव केल्याने त्यांच्या आत्मविश्र्वासात वाढ होते. तसेच इतर विद्यार्थ्यांनाही अधिक चांगली कामगिरी करण्याची प्रेरणा मिळते.

आजचा विद्यार्थी हा उद्याच्या समाजाचा आणि राष्ट्राचा आधारस्तंभ आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच संस्कार, सामाजिक बांधिलकी, प्रामाणिकपणा आणि मेहनतीची कास धरावी. परिस्थिती कोणतीही असो, ध्येय निश्र्चित करून सातत्याने प्रयत्न केल्यास यश नक्की मिळते, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला.

शिक्षक दिन हा केवळ शिक्षकांचा सत्कार करण्याचा दिवस नसून, आपल्या जीवनाला दिशा देणाऱ्या प्रत्येक गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळेच अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत मोठी झेप घेत आहेत. त्यामुळे शिक्षकांच्या कार्याचा सन्मान आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव ही समाजाच्या प्रगतीची सकारात्मक पावले आहेत, असेही त्यांनी सांगितले.

ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना गौरवचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.बिभीषण मद्देवाड यांनी केले तर आभार एस.पी. शिंदे यांनी मानले.

कार्यक्रमास शिक्षक, पालक, विद्यार्थी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामीण पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/
सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६



# संक्षिप्त...

## संत ज्ञानेश्वर विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. ६ सप्टेंबर : संत ज्ञानेश्र्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, अहमदपूर येथे भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांचा स्कूल डे (स्वयंशासन दिन) उत्साहात संपन्न करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आशा रोडगे होत्या, तर प्रमुख पाहुण्या संस्थेच्या उपाध्यक्षा ड. मानसीताई हाके, मुख्याध्यापक मीना तोवर यांच्या हस्ते डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत मनोगते, कविता व भाषणे सादर केली. तसेच इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका स्वीकारून पहिली ते सहावीच्या वर्गामध्ये अध्यापनाचा अनुभव घेतला. यावेळी इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांमधून मुख्याध्यापक हर्षदा गंगाधर हांडे, उपमुख्याध्यापक श्रद्धा राम गिरी व पर्यवेक्षक रितिका अच्युतराव सुरवसे, लिपिक समरवीर श्रीनिवास जाधव यांनी जबाबदारी स्वीकारून यशस्वीपणे कार्यभार सांभाळला.

विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा शिक्षक दिनानिमित्त पुष्पगुच्छ व लेखणी देऊन सन्मान केला.

प्रथम घटक चाचणी परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यामुळे पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल संस्थेच्या उपाध्यक्षा ड. मानसीताई हाके यांचा विद्यालयाच्या वतीने शाल, पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

दरम्यान, श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला निमित्त दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. लहान वर्गातील विद्यार्थ्यांनी राधा-कृष्णाच्या वेशभूषेत सहभागी होत उत्सवाची रंगत वाढवली. बालगोपाळांनी दहीहंडी फोडून आनंदोत्सव साजरा केला.

सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आधुनिकतेचे शिक्षण द्यावे : माने




तभा वृत्तसेवा

अहमदपूर : सध्या स्पर्धेचे युग आहे. या युगात आपणास आपलं ध्येय गाठायचे असेल तर आधुनिकतेची कास धरावी. जेणे करून विद्यार्थी स्पर्धेत टिकेल, असे प्रतिपादन प्रा द.मा.माने यांनी ग्लोबल इंग्लिश स्कुल मध्ये आयोजित शिक्षक दिन आणि दहीहंडीच्या कार्यक्रमात केले.

प्रथमतः सर्वपल्ली राधाकृष्णन् आणि राधा कृष्णाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमात ग्लोबल इंग्लिश स्कुलमधील सर्व शिक्षकांचे प्रमुख पाहुणे द.मा. माने यांच्या हस्ते पुस्तक देऊन सत्कार करण्यात आले. यावेळी संस्थाचालक शंकरराव अबरबंडे यांनी प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविकात शाळेची प्रगती आणि राबवत असलेल्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती सांगितली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य भरत चंदाले यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन हेंगणे मॅडम यांनी केले आणि आभार प्रदर्शन संजय हुडगे सर यांनी केले.

कार्यक्रमानंतर दहीहंडीचा कार्यक्रम पार पडला शाळेतील सर्व शिक्षकांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले .

# मानवतातीर्थ रामेश्वर नगरीत उत्साहात श्रीकृष्ण जन्माष्टमी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ सप्टेंबर : संपूर्ण जगात मानवतेचा आणि विश्र्वशांतीचा संदेश देणाऱ्या लातूर तालुक्यातील मौजे विश्र्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्र्वर (रुई) येथे भगवान श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त कीर्तन, दहीहंडी आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भक्तिमय वातावरणात झालेल्या या सोहळ्यास रामेश्र्वर नगरीतील तसेच परिसरातील हजारो भाविकांनी उपस्थित राहून श्रीकृष्ण जन्मोत्सवाचा आनंद घेतला.

लातूर तालुक्यातील मौजे रामेश्र्वर नगरीचे सुपुत्र विश्र्वधर्मीय प्रा. डॉ. विश्र्वनाथजी कराड साहेबांच्या संकल्पनेतून जगासमोर सर्वधर्म समभाव आणि मानवताधर्माची जपणूक करणाऱ्या रामेश्र्वर या गावाची नवी ओळख निर्माण झाली आहे. रामेश्र्वर गावात दरवर्षी विविध उत्सव कार्यक्रम सर्व जाती-धर्मातील गावकरी एकत्रितपणे मोठ्या उत्साहात साजरे करतात.

विश्र्वशांती केंद्र आळंदी, माईस् एमआयटी पुणे आणि समस्त रामेश्र्वर ग्रामस्थ यांच्या वतीने यावर्षी पहिल्यांदाच विश्र्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्र्वर येथे भगवान श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळा साजरा करण्यात आला. यानिमित्ताने २ दिवस अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यानुसार ४ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री हभप अर्जुन महाराज लटपटे यांचे तर ५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वा. विश्र्वधर्मी मानवता तीर्थभवन येथे हभप कृष्णा महाराज राऊत यांचे काल्याचे किर्तन झाले. यावेळी कीर्तनातून श्रीकृष्णाच्या जीवनचरित्रावर तसेच त्यांच्या विचार व शिकवणीवर प्रबोधन करण्यात आले. कीर्तनाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

श्रीकृष्ण जन्मोत्सव कीर्तनानंतर पारंपरिक पद्धतीने दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. 'गोविंदा आला रे आला' च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. रामेश्र्वर येथील सरस्वती विद्यालयातील युवक व युवतीच्या गोविंदा पथकांनी उत्साहाने सहभाग घेतला. थरावर थर चढवत दहीहंडी फोडण्यात आली. भाविकांनी दहीहंडी सोहळ्याचा आनंद घेतला.

काल्याचे किर्तन आणि दहीहंडी कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रमात भक्ती, उत्साह आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. याप्रसंगी ज्येष्ठ मार्गदर्शक माजी सरपंच तुळशीरामअण्णा कराड, संत श्री गोपाळ बुवा महाराज शुगर अँड ऍग्रो फूड इंडस्ट्रीजचे चेअरमन राजेश कराड, युवा नेते ऋषिकेशदादा कराड, प्रा. तेजस कराड, देवेंद्र कराड, रणवीर कराड, जिप सदस्य महादेव साळुंके, पद्माकर चिंचोलकर, सुरज शिंदे, भागवत सोट, बन्सीभाऊ भिसे, चंद्रसेननाना लोंढे, प्रताप पाटील, शरद दरेकर, अनिल भिसे, अनंत चव्हाण, साहेबराव मुळे, विजय गंभीरे, दशरथ सरवदे, ॲड. मनोज कराड, शरद पाटील, सचिन कराड, डॉ. बाबासाहेब घुले, गोपाळ पाटील, विजय काळे, रुपेश थोरमोटे, सुरेश पाटील, राजकिरण साठे, भैरवनाथ पिसाळ, रुपेश काळे, सोमनाथ वाघमारे, अशोक सावंत, आदिनाथ मुळे, अन्वर पटेल, बाबासाहेब भिसे, गोविंद देशमुख, किशोर घुट्टे, कमाल राजेखॉं पटेल, किरण मुंडे, शुभम खोसे, बालासाहेब कदम, दशरथ कराड, दत्ता सप्ताळ, संजय डोंगरे, राम भताने, अंकुश गणगे, बालाजी गवळी, राज जाधव, किशन शिरसागर, शशिकांत पाटील, देवराव मोहिते, बालासाहेब कदम, प्रकाश जाधव, सुरेश सूर्यवंशी, बापू देवकर यांच्यासह रामेश्र्वर गावातील आणि परिसरातील भाविक भक्त महिला पुरुष तरुण शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## औशातील औद्योगिक वसाहतीत ७.६३ कोटीच्या सिमेट रस्त्याचे भुमीपुजन

# आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते उद्घाटन

# १.४ कि.मी. लांबीच्या मुख्य रस्त्याच्या कामाला सुरुवात




तभा वृत्तसेवा

औसा दि. ७ सप्टेंबर : औसा एमआयडीसीतील १.४ कि.मी. लांबीच्या मुख्य सिमेंट रस्त्याचे ७.६३ कोटी रुपयांच्या कामाचे भूमिपूजन आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या विकास कामामुळे औद्योगिक वसाहतीतील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार असून औद्योगिक विकासाला चालना मिळणार आहे.

एमआयडीसीमध्ये मोठ्या प्रमाणावर अवजड वाहनांची वाहतूक होत असल्याने मजबूत आणि टिकाऊ रस्त्यांची आवश्यकता आहे. याचा विचार करून सिमेंट काँक्रीटचे रस्ते करण्यावर भर देण्यात येत असल्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी यावेळी सांगितले. यापुढील काळात संपूर्ण औसा एमआयडीसी परिसरातील सिमेंट रस्ते तसेच नाल्यांची कामे टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच औसा एमआयडीसी, औसा बाजार समिती आणि औसा शहरांतर्गत विविध सिमेंट रस्त्यांची विकासकामे हाती घेण्यात येणार आहेत. याचबरोबर बेलकुंड एमआयडीसीतील विकासकामांनाही लवकरच सुरुवात करण्यात येणार असल्याचे आमदार पवार यांनी सांगितले.

प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी लातूर धनंजय इंगळे, एमआयडीसी संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत सूर्यवंशी, विश्र्वराज औटी, औद्योगिक विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता बाळू राऊतराव, उपअभियंता पी. के. सरक, सभापती सौ. गंगाबाई कोदळीकर, उपसभापती अमोल पाटील, सुभाष जाधव, शिवलिंग औटी, कटाप्पा मुळे, कृष्णा साळुंखे, जगदीश कुलकर्णी, सुरजमल बिदादा, अमित राचट्टे, जयराज कारंजे, समीर डेंग, भीमाशंकर मिटकरी, सुनील उटगे, सदाशिव जोगदंड, अक्रम पठाण, शिव मुरगे, अविनाश मंत्री, उदय पाटील, जगदीश परदेशी, संजय कुलकर्णी यांच्यासह एमआयडीसीचे पदाधिकारी, उद्योजक आणि नागरिक उपस्थित होते.

### सक्षम,आधुनिक,प्रगत वसाहतीचा संकल्प

आगामी १० ते १५ वर्षात लातूर जिल्ह्यातील औसा एमआयडीसीला सक्षम, आधुनिक आणि प्रगत औद्योगिक वसाहत बनविण्याचा संकल्प केला असून पुर्ण करणार असल्याचा विश्वास आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी व्यक्त केला.

### मुंबई, पुणे येथील उद्योजक औशात इच्छुक

ओसाड औद्योगिक वसाहतीत पायाभूत सुविधांना प्राधान्य देण्यात येत असून मुंबई, पुणे येथील उद्योजकांचे लक्ष ओसा येथील एमआयडीसी कडे लागले आहे.लवकर सुविधा उपलब्ध करून दिल्या तर मोठे उद्योग येवू शकतात.त्यामुळे स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.याचबरोबर ओसाड मतदार संघातील जास्ती जास्त क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.यातून झालेला बदल औद्योगिक आणि कृषी क्रांती घडविणारा ठरणार असल्याचे मत आ. अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केले.

## महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी येथे शिक्षक दिन उत्साहात

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ६ सप्टेंबर : महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी, निलंगा येथे शिक्षक दिन उत्साहपूर्ण आणि आदरयुक्त वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी परिषद यांच्या वतीने करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व वैयक्तिक जीवनाला आकार देण्यासाठी शिक्षकांनी दिलेले मार्गदर्शन, समर्पण आणि सातत्यपूर्ण योगदान याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस . एस. पाटिल होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र पॉली डी फार्मसी इन्स्टिट्यूट निलंगा चे प्राचार्य डॉ. बी . एन. पौळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन दोन सत्रांमध्ये करण्यात आले होते. सकाळच्या सत्रात नाविन्यपूर्ण डीीवशपीं-री-र-ढशरलहशी उपक्रम आयोजित करण्यात आला, तर दुपारच्या सत्रात शिक्षकांचा विशेष सत्कार समारंभ पार पडला. सकाळच्या सत्रास सकाळी १०.00 वाजता सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी सर्व अध्यापकांचे फुलांनी स्वागत करून प्रेम, आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली.

शिक्षक दिनाच्या विशेष उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना शिक्षकाची भूमिका पार पाडण्याची संधी देण्यात आली. विद्यार्थ्यांनी वर्गामध्ये व्याख्याने घेऊन प्रत्यक्ष अध्यापनाचा अनुभव घेतला. या उपक्रमामुळे त्यांना शिक्षक व्यवसायातील जबाबदाऱ्या, आव्हाने आणि समर्पण यांची जाणीव झाली.

STUDENT-AS-A-TEACHER स्पर्धेत अंतिम वर्षातून तानाजी राठोड व स्नेहा शिंदे , तृतीय वर्षातून संभाजी चव्हाण व प्रतीक्षा भोयभार, तर द्वितीय वर्षातून नंदिनी लोभे व वेदांत जोशी यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावून उत्कृष्ट कामगिरी केली. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे हा उपक्रम शिक्षक दिनाच्या कार्यक्रमातील एक विशेष आकर्षण ठरला.

शिक्षक दिन सत्कार समारंभास दुपारी २.00 वाजता डी . बी. व एम फार्मसी चे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलनाने, भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात आली. तसेच स्वर्गीय डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे शिक्षकांचा पारंपरिक भेटवस्तूंऐवजी छोटी रोपे व वनस्पती देऊन सत्कार करण्यात आला. या अभिनव उपक्रमातून पर्यावरण संरक्षण आणि हरित भविष्यासाठी योगदान देण्याचा संदेश देण्यात आला. या प्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण भूमिकेवर भाषणे केली.

## डीजे'ला नकार, पारंपरिक वाद्यांचा स्वीकार; आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ६ सप्टेंबर : आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्याबरोबरच पारंपरिक वाद्यांचे जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने शिरूर अनंतपाळ पोलिस ठाण्याच्या वतीने इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ध्वनिप्रदूषणाला (ड्रा) नकार, पारंपरिक वाद्यांचा स्वीकार : संस्कृती संवर्धनाची नवी दिशा हा स्पर्धेचा विषय असून, विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त २५० शब्दांत निबंध लिहायचा आहे. तालुक्यातील व पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व माध्यमिक विद्यालयांमधील इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन. पोलिस उपाधीक्षक अक्षय जाधव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

स्पर्धेत तालुकास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, ट्रॉफी तसेच आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात येणार आहे. गणेशोत्सवात वाढत्या ध्वनिप्रदूषणामुळे निर्माण होणाऱ्या समस्या, त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर होणारा परिणाम आणि पारंपरिक वाद्यांमधून आपल्या सांस्कृतिक परंपरेचे जतन करण्याची गरज याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी, हा या उपक्रमामागील खरा उद्देश आहे.

विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमाला प्रतिसाद द्यावा, असे आवाहन परिवीक्षाधीन पोलिस उपाधिक्षक अक्षय जाधव यांनी केले आहे.

शिरूरअनंतपाळाच्या इतिहासात आजपर्यंत पोलीस प्रशासनाकडून तरुण पिढीचे मन परिवर्तन करण्यासाठी कधी न केलेला प्रयोग करण्यात येत असल्यामुळे, तालुकाभरातून या उपक्रमाचे जनतेमध्ये समर्थन होत असलेले दिसून येत आहे.

# लातूर जिल्हा ग्रंथालय संघाच्या अनागोंदी कारभाराची चौकशी होणार तरी केव्हा ?



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ सप्टेंबर : लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाची धर्मादाय कार्यालयाकडून मंजुरी असलेली मूळ घटना असतानाही नवीन घटना तयार करून सदरील नवीन घटनेस धर्मादाय कार्यालयाकडून मंजुरी न घेता मनमानीपणे संघाचे कामकाज चालविण्यात येत असल्याचा खळबळजनक आरोप केला जात असल्याने जिल्ह्याच्या ग्रंथालय क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीच आता बारकाईने लक्ष घालून लातूर जिल्हा ग्रंथालय संघात प्रत्यक्षात काय चालले आहे, याचा कसून शोध घेण्याची मागणी ग्रंथप्रेमी नागरीकातून केली जात आहे.संपूर्ण महाराष्ट्रात लातूर जिल्ह्याची ग्रंथालय चळवळ निकोप असल्याचे बोलले जाते. प्रत्यक्षात हा प्रकार दिव्याखाली अंधार या म्हणीप्रमाणे असल्याची प्रचिती आता येत असल्याच्या प्रतिक्रिया सामान्य ग्रंथप्रेमी वाचकातूनऐकायला मिळत आहेत. लातूर जिल्हा ग्रंथालय संघाचा बदल अहवाल १९९८ नंतर मंजूर करून घेतलेला नाही. ग्रंथालय संघाच्या मूळ घटनेत दर पाच वर्षांनी कार्यकारी मंडळाची निवडणूक घ्यावी,असा स्पष्ट उल्लेख असताना संघाचे विद्यमान पदाधिकारी दर तीनवर्षांनी बेकायदेशीरपणे निवडणूक घेत असल्याचे अनेकांनी पाहिले आहे. संघाच्या मूळ घटनेतील तरतुदीप्रमाणे सभासद वर्गणी आणि सभासदांचे प्रकार्याप्रमाणे वर्गणी जमा केली जात नसल्याचीही तक्रार आहे. ग्रंथालय संघाच्या वतीने दरवर्षी ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा घेण्यात येते. या परीक्षेसाठी शासनाची फीस केवळ २५० रुपये असताना ग्रंथालय संघाकडून त्यापेक्षा अधिकचे शुल्क वसूल केले जाते. हे तर काहीच नाही, ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांना पास चक्क पुस्तकात बघून उत्तरे लिहिण्याची मुभा देण्यासाठीहीसंघाचे काही प्रमुख पदाधिकारी चक्क त्यांच्याकडून मोठ्या रकमा उकळत असल्याचेहीसांगण्यात येते. विद्यार्थी परीक्षेत पुस्तकात बघून उत्तरे लिहीत असल्याचे पुरावेहीकाही मंडळींकडे उपलब्ध असून ते योग्यवेळी आवश्यक तेथे सादर करण्याचीहीसंबंधितांची तयारी आहे. महाराष्ट्र शासनाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय पुरस्कार, ग्रंथमित्र पुरस्कार, ग्रंथालय सेवक पुरस्कार अशा पुरस्कारांचे पुरस्कारतयार करण्यासाठी काही मंडळी ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्त्यांकडून हजारो रुपये उकळून त्यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे शिफारस केली जाते,शिफारस करण्यात आलेल्यापैकी अनेकजण शिफारस करण्यायोग्य नसतानाहीत्यांची शिफारस केली गेल्याच्या तक्रारी आहेत. ग्रंथालय संघातील काही जबाबदार पदाधिकारी ग्रंथालय संघाच्या कार्यालयात बसून चक्क पुस्तक विक्रीचा धंदा करत असल्याचेही अनेकांच्या दृष्टीपथास आलेले आहे. जिल्हा ग्रंथालय संघाचे काही पदाधिकारी विभाग - राज्य ग्रंथालय संघावरही कार्यरत आहेत. हे पदाधिकारी त्यांना मनमानीपणे काम न करू देणाऱ्या ग्रंथालय विभागाच्या अधिकाऱ्यांनाहीप्रसंगी वरिष्ठांच्या कानावरउलटसुलट घालून धाकात ठेवण्याचाप्रयत्नहीकरत असल्याचे आदिसूनआले आहे. एखाद्या अधिकाऱ्याने या पदाधिकाऱ्यांना नियमात राहून काम करण्याचा सल्ला दिला तरी त्यांना हे रुचत नाही. आपल्यावर कोणीही अधिकार गाजवलानाही पाहिज, आपण कसेही काम केले तरी त्याला कोणी विरोध करता कामा नये,अशी काही पदाधिकाऱ्यांची मानसिकता मागच्या काही वर्षात झाल्याचेही पाहायला मिळते. अशा काही बेजबाबदार मंडळींमुळेचलातूर जिल्ह्याची ग्रंथालय चळवळ राज्यात बदनाम होताना दिसतेय. लातूर जिल्हा ग्रंथालय संघाचे संस्थापक अध्यक्ष स्व. त्र्यंबकदासजीझंवर यांच्या नावाला ते आज आपल्यात नसले तरी आजही तेवढेच वलय , प्रतिष्ठा आहे. त्यांच्या या प्रतिष्ठेचा स्वतःच्या स्वार्थासाठी उपयोग करून घेणारे पदाधिकारी आजही जिल्हा ग्रंथालय संघात बोनबोभाटपणे काम करत असल्याचे पाहायला मिळते. हे पाहून स्व. झंवर काकांच्याआत्म्याला किती वेदना होत असतील याची कल्पनाहीकरवत नाही. लातूर जिल्हा ग्रंथालय संघातील काही पदाधिकारी जिल्हा शासकीय ग्रंथालय अधिकारी कार्यालयातीलएखादा अधिकारी जिल्ह्यातील सर्वसामान्य ग्रंथालय चालकाची अडचण त्याला कार्यालयात बोलावून घेऊन समजावून सांगून दुरुस्त करून देत असतील तर तेही काही मंडळींना रुचत नसल्याचे दिसून येते. संबंधित ग्रंथालय चालकाने आपल्याकडेचयायला हवे होते, असाही काहींचाअट्टाहास असल्याचे बोलले जाते. त्यामुळे ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या विरोधातहीराज्य ग्रंथालय संघाच्या पदाधिकाऱ्यांना मध्ये घालून निवेदन, तक्रारी करण्यापर्यंतही काहींची मजलगेल्याचे मागच्या काळात दिसून आले आहे. ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील नियमाने चालणाऱ्या अधिकाऱ्यांना अडचणीत आणणे, त्यांना कामात सुसूत्रता आणण्याचीसूचना करणाऱ्या अधिकाऱ्याची कोणतीही चूक नसताना बदली करण्यासाठी वरिष्ठावर दबाव आणण्याचे कामहीकाही मंडळींनाहाताशी धरून करणारी मंडळी सध्या जिल्ह्याच्या ग्रंथालय संघात सक्रिय झालेलीदिसून येतात. अशा मंडळींमुळे ग्रंथालय संघाची गरिमा लोप पावत आहे. जिल्ह्याच्या ग्रंथालय अधिकारी कार्यालयावर आपलीच पकड असावी यासाठीहीकाही मंडळी सातत्याने प्रयत्नशील असून आपल्याचमर्जीतील अधिकारी लातूरला यावा यासाठीही अनेकजण प्रयत्नरत असतात. जिल्ह्याच्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रीमती वंदना काटकर मॅडम यांची नुकतीच लातूरहून बदली झाली आहे. त्यांच्या जागेवर लातूर येथेचग्रंथालय निरीक्षक म्हणून सेवारत असलेले राजेंद्र कोरे यांना त्या पदाचा पदभार देण्यात येऊ नये,यासाठीही ही मंडळी धडपड करत असल्याचे दिसून येत आहे. वास्तविक पाहता, राजेंद्र कोरे हे एक जबाबदार अधिकारी असून त्यांच्याकडे सध्या दापोली येथील जिल्हा ग्रंथालय अधिकारीपदाचा अतिरिक्त पदभार आहे. त्यांना २०१० पासून जिल्हा ग्रंथालय अधिकारी पदाचा अनुभवही आहे. असे असतानाही काहीही झाले तरी राजेंद्र कोरे यांना लातूरचा अतिरिक्त पदभार मिळता कामा नये यासाठीही ही मंडळी प्रयत्नशील आहेत. शासनाने असा प्रयत्न करणाऱ्या मंडळींच्या कार्यपध्दतीचीचकसून चौकशी करून याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा,असा मतप्रवाह आता ग्रंथप्रेमी मंडळींतून वाढीस लागला आहे.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरुजी जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप

तभा वृत्तसेवा
परंडा, दि.६ सप्टेंबर -

तुळजापूर : शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर संचलित श्री कुलस्वामिनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तसेच महात्मा ज्योतिबा फुले रात्रशाळेत शिक्षणमहर्षी कै. सि. ना. आलुरे गुरुजी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त रात्रशाळेतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना दहा सायकलींचे वाटप करण्यात आले.



मासूम संस्था, मुंबईच्या सीईओ निकिता केतकर व करसि कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत म्हणून या सायकली उपलब्ध करून देण्यात आल्या. सायकलींचे वाटप अँड. नागनाथ कानडे, मासूम संस्थेचे प्रतिनिधी पीएम गरड व एसएल श्री. सलगर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शालेय समितीचे अध्यक्ष अँड. नागनाथ कानडे, प्राचार्य एन.डी. पिसे, रात्रशाळेचे मुख्याध्यापक सिद्धेश्वर वड्डे, प्रा.डॉ. सुलोचना हराळकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### सिंदफळमध्ये श्रावणमास सांगता सोहळा भक्तिमय वातावरणात

तुळजापूर, दि.६ सप्टेंबर -

तीर्थक्षेत्र तुळजापूरच्या पायथ्याशी असलेल्या सिंदफळ येथील श्री मुद्गलेश्वर शंभू महादेव मंदिरात श्रावणमासाचा सांगता सोहळा भक्तिभावात पार पडला. सांगतेनिमित्त रविवारी (दि. ६) मंदिरात 'महादेवाची वरात' हा आकर्षक देखावा साकारण्यात आला. हा देखावा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली. श्री मुद्गलेश्वर सेवा समिती व युवा प्रतिष्ठानच्या वतीने श्रावणमासात विविध धार्मिक उपक्रम राबविण्यात आले. प्रत्येक सोमवारी महापूजा, आकर्षक आरास व महाआरती करण्यात आली. सांगता सोहळ्यानंतर भाविकांसाठी पंचपक्वान्नांचा अन्नदान म हाप्रसाद आयोजित करण्यात आला. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. महादेवाची वरात, आकर्षक सजावट, महाआरती व महाप्रसादामुळे मंदिर परिसरात 'हर हर महादेव'चा जयघोष घुमला. भक्तीचा संगम घडविणारा हा सोहळा भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरला.

### राजा गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी रुतेश कवडे

तुळजापूर, दि.६ सप्टेंबर -

शहरातील नळदुर्ग रोड परिसरातील पुजारी नगरचा राजा सार्वजनिक गणेश मंडळाच्या आगामी गणेशोत्सवाच्या



पार्श्वभूमीवर नवीन कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली. अध्यक्षपदी रुतेश कवडे, उपाध्यक्षपदी राहुल जाधव, सचिवपदी महेश पुजारी, खजिनदारपदी म ह्लेश विभुते तर कोषाध्यक्षपदी योगेश पाटील यांची निवड झाली. पुजारी नगर फाऊंडेशन तथा पुजारी नगरचा राजा सार्वजनिक गणेश मंडळाचे संस्थापक अध्यक्ष गणेश पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली मागील पाच वर्षांपासून सार्वजनिक गणेशोत्सव उत्साहात साजरा केला जात आहे. धार्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक, सांस्कृतिक व जनजागृतीपर उपक्रम राबविले जातात.



### बलसूरमध्ये महाशिवभोजन व महादेव रथोत्सव उत्साहात

उमरगा, दि.६ सप्टेंबर -

गावातील तरुण युवकांनी एकत्र येत येथील श्री महादेव मंदिरात भव्य महाशिवभोजन सोहळा व श्री महादेव पालखी रथोत्सवाचे आयोजन केले. आकर्षक सजावटीने सजविलेल्या पालखी व रथाच्या दर्शनासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली. 'हर हर महादेव'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक व बालगोपालांनी पालखी सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. रथोत्सवानंतर आयोजित महाशिवभोजनाचा हजारो ग्रामस्थ व भाविकांनी लाभ घेतला. तरुणांनी नियोजन, श्रम दान आणि एकजुटीच्या माध्यमातून धार्मिक परंपरा जपत सामाजिक एकोप्याचा आदर्श निर्माण केला. युवकांच्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी कौतुक केले.



### शिक्षक दिन व दहीहंडी उत्साहात

लोहारा, दि.६ सप्टेंबर -

शहरातील हायस्कूल लोहारा प्रशालेत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रतिमेचे पूजन पायाळ यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनींनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेवी गिराम व जोया शेख यांनी केले. सिमरन शेख हिने प्रास्ताविक केले. यावेळी सात विद्यार्थिनींनी शिक्षक दिनानिमित्त मनोगत व्यक्त केले. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा विद्यार्थिनींच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचा समारोप भोंडवे यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. मुख्याध्यापक सुतार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेत नृत्य सादर केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडून उत्सवाचा आनंद घेतला.

### ४.५८ लाखांचा दंड वसूल

धाराशिव, दि.६ सप्टेंबर -

शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलिस ठाण्यांनी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध दि.५ सप्टेंबर रोजी विशेष कारवाई केली. या मोहिमेत एकूण ५०६ कारवाया करण्यात आल्या. या कारवाईतून पोलिसांनी ४ लाख ५८ हजार १५० रुपयांचे 'तडजोड शुल्क' वसूल केले.

# ३२ दिवसांच्या पावसाच्या खंडाने पिकांचे मोठे नुकसान; वैज्ञानिक पद्धतीने होणार पीक पाहणी

### कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र व आयआयटी तज्ज्ञांची बांधावर पाहणी; नुकसानभरपाईसाठी वस्तुनिष्ठ अहवाल शासनाला देणार : आ. राणाजगजितसिंह पाटील

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.६ सप्टेंबर -

महाराष्ट्राच्या कृषी इतिहासात प्रथमच पीक पाहणी प्रक्रियेत अत्यंत शास्त्रीय आणि आधुनिक पद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे. सलग ३२ दिवस पावसाचा खंड पडल्याने खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, प्राथमिक अंदाजानुसार हे नुकसान ३३ टक्क्यांपेक्षा कितीतरी अधिक असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानीचा सविस्तर व वस्तुनिष्ठ अहवाल शासनाकडे सादर करण्यासाठी विशेष तज्ज्ञांच्या माध्यमातून पीक पाहणी करण्यात येत असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

या पाहणी प्रक्रियेत केवळ कृषी व महसूल विभागाचे अधिकारीच नव्हे, तर वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र तसेच कृषी क्षेत्रातील शास्त्रज्ञ आणि मुंबई आयआयटीमधील तज्ज्ञ सल्लागारांचा समावेश असलेली विशेष पथके कार्यरत आहेत. हे तज्ज्ञ प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी करून नुकसानीचे शास्त्रीय पद्धतीने मूल्यम ापन करीत आहेत.

सलग ३२ दिवस पावसाचा खंड पडल्यामुळे पिकांची फुले सुकून गेली असून, शेंगा व दाणे अत्यल्प प्रमाणात भरले आहेत. त्यामुळे पिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत आहे. या नुकसानीचा वस्तुनिष्ठ अहवाल जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून राज्य शासनाला सादर करण्यात येणार असून, एनडीआरएफ व एसडीआरएफच्या निकषांनुसार शेतकऱ्यांना नुकसानभरपाई लवकर मिळवून देण्यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचे पाटील यांनी सांगितले.

दरम्यान, शेतकऱ्यांनी आपली पिके घाईघाईने किंवा अचानक काढू नयेत, असे आवाहन आमदार पाटील यांनी केले आहे. भविष्यात होणाऱ्या पीक कापणी प्रयोगांसाठी शेतातील पीक उपलब्ध असणे आवश्यक



आहे. पीक कापणी प्रयोगांच्या निष्कर्षांवर विमा व नुकसानभरपाईची प्रक्रिया अवलंबून असल्याने शेतकऱ्यांनी योग्य सूचनांची वाट पाहावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

कागदोपत्री परिस्थिती व्यवस्थित दिसत असली तरी प्रत्यक्ष शेतातील स्थिती अत्यंत गंभीर आहे. ज्या गावांमध्ये पीक कापणी प्रयोग होणार आहेत, त्या गावांतील नुकसानीची वस्तुस्थिती अहवालात अचूकपणे प्रतिबिंबित होण्यासाठी स्थानिक पातळीवर सर्वांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध राहावे, असे आवाहनही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले.

## मराठी शाळा वाचवण्यासाठी गाठीभेटी दौरा



तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.६ सप्टेंबर -

महाराष्ट्रातील मराठी शाळांना शंभर टक्के अनुदान द्यावे, बंद पडलेल्या म राठी शाळा पुन्हा सुरू कराव्यात, यासह विविध मागण्यांसाठी ऑक्टोबरमध्ये मुंबईतील आझाद मैदानावर मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. या मोर्चात सहभागी होण्यासाठी मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय मराठा पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी रुईभर येथील जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयास भेट दिली.

राष्ट्रीय अध्यक्ष अंकुशराव शिवाजीराव पाटील होनाळीकर, राष्ट्रीय उपाध्यक्ष परमेश्वर देशमुख, शीला लोकरे, सुरेंद्र विश्वासराव पाटील व विनिता गंगावणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. मराठी शाळा टिकवणे, मराठी भाषा वाचवणे आणि गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्रभर प्रचार दौरा राबविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

जि.प. सदस्य रामदास कोळगे यांनीही मार्गदर्शन केले. मराठी शाळा व भाषा टिकवण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास शिक्षणमहर्षी सुभाष दादा कोळगे, हभप शिवाजी बारगुळे गुरुजी, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, संतोष कपाळे, नानासाहेब शेलार, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## बामणी शिवारातून बोअरची मोटार व साहित्य चोरीला

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.६ सप्टेंबर -

बामणी शिवारातील शेतातून २७ हजार रुपये किमतीची बोअरची मोटार व साहित्य अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना समोर आली आहे. विलास दगडू ममशेटी (वय ७०, रा. बामणी) यांच्या गट क्रमांक ७८ मधील शेतातून ३ एचपीची बोअर मोटार, नायलॉन रस्सी, बोअर वायर, पॅनल व स्टार्टर असा साहित्य चोरीस गेले.

याप्रकरणी विलास ममशेटी यांनी दि. ५ सप्टेंबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून बेंबळी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) अन्वये अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## खोटे सोन्याचे बिस्कीट देउन वृद्धांचे दागिने लुटणारा आरोपी जेरबंद

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.६ सप्टेंबर -

तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकाला बोलण्यात गुंतवून खोटे सोन्याचे बिस्किट देत दागिने घेऊन फसवणूक करणाऱ्या टोळीतील एका आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले. आरोपीकडून चोरीचे सोन्याचे दागिने व गुन्ह्यात वापरलेले वाहन असा एकूण ४ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दि. १ सप्टेंबर रोजी निनाबाई चौगुले या तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी तुळजापुरात आल्या होत्या. यावेळी काही इसमांनी त्यांना बोलण्यात गुंतवून खोटे सोन्याचे बिस्किट दिले आणि त्याबदल्यात त्यांचे सोन्याचे दागिने घेऊन फसवणूक केली होती. याप्रकरणी तुळजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**४.६५ लाखांचा मुद्देमाल जप्त**

गुन्ह्याचा तपास सुरू असताना स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सुदर्शन कासार व त्यांच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे बीड येथील गांधी नगर, तेलगाव नाका परिसरातील ऋषीकेश बंडू जाधव (वय २५) याच्यावर पाळत ठेवून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची माहिती देतानाच अन्य साथीदारांची नावेही सांगितली. त्यानंतर पोलिसांनी चोरीस गेलेले सोन्याचे दागिने आणि गुन्ह्यात वापरलेले मोटार वाहन जप्त केले.

आरोपीची वैद्यकीय तपासणी करून पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्याला तुळजापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक रितु खोखर व अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनोद इज्जपवार, सपोनि सुदर्शन कासार व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

## उमरग्यात 'मानवासाठी तारक की मारक?' वाद-विवाद स्पर्धा संपन्न

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.६ सप्टेंबर -

प्रा. शामराव रघुनाथराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अँड. शीतल चव्हाण फाउंडेशन व जिल्हा परिषद प्रशाला, उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने 'मानवासाठी तारक की मारक?' या विषयावर वाद-विवाद स्पर्धा शुक्रवारी उत्साहात पार पडली. तालुक्यातील १९ शाळांच्या संघांतील ३८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत आपली वैचारिक व वक्तृत्व क्षमता प्रभावीपणे सादर केली.

स्पर्धेचे उद्घाटन जि.प. उपाध्यक्षा उषा रवींद्र गायकवाड यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी शांताबाई चव्हाण होत्या. विद्यार्थ्यांनी शिक्षण, आरोग्य, विज्ञान, उद्योगातील फायदे तसेच रोजगार, गोपनीयता, सायबर गुन्हे आणि अनियंत्रित वापराम ुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांवर अभ्यासपूर्ण मते मांडली. स्पर्धेचे परीक्षण डॉ. बालाजी मदन इंगळे व रेखा सूर्यवंशी यांनी केले. श्री. महात्मा बसवेश्वर विद्यालय, उमरगा प्रथम, श्री. महात्मा गांधी विद्यालय, केसर जवळगा द्वितीय, तर आदर्श विद्यालय, उमरगा तृतीय ठरले. भारत विद्यालय, उमरगा संघाला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. विजेत्यांना रोख पारितोषिक, चषक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या इसमावर कारवाई

धाराशिव, दि.६ सप्टेंबर - उमरगा पोलिस ठाण्याचे पथक दि. ५ सप्टेंबर रोजी रात्री गस्तीवर असताना पतंगे रोड परिसरात अंधाराचा फायदा घेत दबा धरून बसलेला मोहन हरिभाऊ सुरवसे (वय ३५, रा. कुंभारपट्टी, उमरगा) हा संशयास्पदरीत्या आढळून आला.

पोलिसांनी त्याची चौकशी केली असता रात्रीच्या वेळी फिरण्याबाबत त्याने समाधानकारक माहिती न देता उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे तो गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरत असल्याचा संशय आल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

## दिशा पतसंस्थेतर्फे सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.६ सप्टेंबर -

शिक्षक दिनाचे औचित्य साधून नळदुर्ग येथील दिशा नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने शहरातील सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष बसवराज धरणे होते.

यावेळी तानाजी जाधव, सुभाष म हाबोले, हरी महाबोले, उत्तम रामदासी, बाळकृष्ण महाबोले, नंदकुमार जोशी व जळकोट येथील शिवाजी सुरवसे या सेवानिवृत्त शिक्षकांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच जिल्हा परिषद धाराशिवचे सहाय्यक लेखाधिकारी श्रद्धानंद स्वामी यांचाही सेवानिवृत्तीबद्दल सत्कार करण्यात आला.

शाखाधिकारी उमेश जाधव व म ान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष बसवराज धरणे, तानाजी जाधव, बाळकृष्ण महाबोले व नंदकुमार जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास शाखा कर्मचारी रोहन स्वामी, ओंकार महाबोले यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

## निसर्गाच्या सानिध्यातील नळदुर्ग जवळील श्रीक्षेत्र भीमाशंकर

### पवित्र श्रीक्षेत्र भीमाशंकर विकासाच्या प्रतीक्षेत...!

### रस्ता, वीज सुविधांअभावी तीर्थक्षेत्र दुर्लक्षित...

नळदुर्गपासून जवळच आलियाबाद शिवारातील बालाघाट डोंगररांगेच्या कुशीत उंच डोंगरमाथ्यावर वसलेले श्रीक्षेत्र भीमाशंकर हे प्राचीन आणि पवित्र धार्मिक स्थळ आजही विकासापासून वंचित आहे. श्रावण महिन्यात विशेषतः प्रत्येक सोमवारी श्री भीमाशंकराच्या दर्शनासाठी महिला भाविकांसह मोठ्या संख्येने भाविक येथे येतात. मात्र, या तीर्थक्षेत्राकडे जाण्यासाठी व्यवस्थित रस्ता नसल्याने तसेच वीज सुविधाही उपलब्ध नसल्याने भाविकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

नळदुर्ग शहर व परिसराला प्राचीन धार्मिक वारशाची मोठी परंपरा लाभली आहे. श्रीक्षेत्र रामतीर्थ, भीमाशंकर, नागझरी, मैलारपूर आणि श्री शिवलिंगेश्वर हिरेमठ यांसारख्या धार्मिक स्थळांमुळे या परिसराचे धार्मिक महत्त्व वाढले आहे. मात्र, अनेक वर्षांपासून या तीर्थक्षेत्रांचा अपेक्षित विकास झालेला नसल्याची खंत भाविकांकडून व्यक्त होत आहे.

श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे प्राचीन काळापासून महादेवाची पिंड अस्तित्वात असून, ती दमयंतीने स्थापन केल्याची आख्यायिका सांगितली जाते. पिंडीच्या बाजूलाच प्राचीन काळापासून एक झरा सतत वाहत असल्याचे सांगितले जाते. परिसरात अनेकदा तीव्र दुष्काळ पडून नदी-नाले आणि अन्य जलस्रोत कोरडे पडले, तरी हा झरा कधीच आटला नाही, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

**दमयंतीने स्थापन केलेली महादेवाची पिंड अन् कधीही न आटलेला झरा**

मात्र, सध्या या झऱ्याचे पाणी आटल्याने भाविकांमध्ये नाराजी आहे. मंदिर परिसरात काँक्रिटीकरणाचे काम करताना उरलेले सिमेंट व वाळूचे मिश्रण झऱ्याच्या परिसरात टाकण्यात आल्याने त्याचा नैसर्गिक प्रवाह बाधित झाल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे शतकानुशतके अखंड वाहत आलेला झरा आज कोरडा पडल्याचे चित्र आहे. या तीर्थक्षेत्राशी नळ-दमयंतीच्या कथेशी संबंधित आख्यायिका जोडली गेली आहे. नळ राजाचे राज्य गेल्यानंतर तो पत्नी दमयंतीसह वनात गेला. पुढे नळाने दमयंतीला एकटी सोडल्यावर ती आपल्या वडिलांकडे, राजा भीमाशंकर यांच्याकडे आली. त्यावेळी एका ज्योतिषाच्या सल्ल्यानुसार दमयंतीने जवळच्या डोंगरावर महादेवाची पिंड स्थापन करून कठोर आराधना सुरू केली. आराधनेदरम्यान तिची तहान भागविण्यासाठी पिंडीजवळ झरा निर्माण झाल्याची आख्यायिका आहे. पुढे याच ठिकाणी नळ-दमयंतीचे पुनर्मिलन झाले आणि तेव्हापासून हे स्थान पवित्र तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जात असल्याचे सांगितले जाते.

**विलास येडगे**
नळदुर्ग

श्रीक्षेत्र भीमाशंकर हे आलियाबाद ग्रामपंचायतीच्या हद्दीत येते. मात्र, या प्राचीन धार्मिक स्थळाकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत असल्याची भावना भाविकांमध्ये आहे. तीर्थक्षेत्राकडे जाण्यासाठी चांगला रस्ता, वीज, पिण्याचे पाणी आणि इतर



मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे.

आलियाबाद येथील भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष विलास राठोड व भाजप नळदुर्ग तालुका ग्रामीणच्या अध्यक्षा रंजना राठोड यांनी या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त केली आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या माध्यमातून मोठा निधी उपलब्ध करून देत श्रीक्षेत्र भीमाशंकराचा धार्मिक व पर्यटनस्थळ म्हणून सर्वांगीण विकास करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## भाजपच्या जिल्हा संघटनेत नवीन नियुक्त्या

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ सप्टेंबर -**
भारतीय जनता पार्टी, धाराशिव जिल्हा संघटनेचे कामकाज अधिक गतिमान व बळकट करण्याच्या उद्देशाने विविध पदांवर नवीन नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांनी अधिकृत नियुक्तीपत्रक प्रसिद्ध करून या नियुक्त्या जाहीर केल्या.

सरचिटणीसपदी माधव बळीराम पवार (उमरगा ग्रामीण, कोराळ) व शिवाजी अन्याबा गिड्डे पाटील (कळंब ग्रामीण, डिकसळ) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उपाध्यक्षपदी दिलीपसिंह करणसिंह गौतम, गौतम रामा लटके व दत्तात्रय काशिनाथ मोहिते यांची निवड झाली आहे. सचिवपदी राहुल हरिभाऊ काकडे, ज्ञानेश्वर सोपान गीते, संग्राम गुणवंतराव देशमुख, विठ्ठल रामभाऊ माने व प्रमोद रामदास पोतदार यांची नियुक्ती करण्यात आली. या नियुक्त्यांमुळे पक्ष संघटनेच्या विस्तारासह बूथस्तरावरील कामकाजाला अधिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



### संक्षिप्त वृत्त...



### संत मीरा पब्लिक स्कूलमध्ये शिक्षक दिन व दहीहंडी उत्साहात

**परंडा, दि.६ सप्टेंबर -**
संत मीरा पब्लिक स्कूलमध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन तसेच श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या पार्श्वभूमीवर दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी महात्मा फुले, सावित्रीबाई फुले व डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगणारी भाषणे, कविता व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. त्यानंतर श्रीकृष्ण व गोपाळांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी बाल-दहीहंडी फोडून जल्लोष केला. 'गोविंदा आला रे आला'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. माजी प्राचार्य प्रा. चंद्रकांत घुमरे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत संस्कार, शिस्त, प्रामाणिकपणा व सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश दिला. कार्यक्रमास नानासाहेब काकडे, ड. दिनेश नाटकर, अशोक राठोड, रामराजे चव्हाण, कृष्णा भागडे व मुख्याध्यापक संतोष भांडवलकर उपस्थित होते. सूत्रसंचालन माधुरी नांगरे यांनी केले.



### विजयालक्ष्मी सखी प्रोड्युसर कंपनीची वार्षिक सभा उत्साहात

**अणदूर, दि.६ सप्टेंबर -**
विजयालक्ष्मी सखी प्रोड्युसर कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा कृषी विज्ञान केंद्र, तुळजापूर येथे उत्साहात पार पडली. कंपनीच्या वार्षिक कामकाजाचा आढावा तसेच महिलांसाठी रोजगारनिर्मितीच्या आगामी नियोजनावर यावेळी चर्चा झाली. कंपनीच्या संचालक वैशाली घुगे यांनी वार्षिक अहवाल सादर करून नर्सरी, फळझाडे व भाजीपाला रोपवाटिका, पशुखाद्य युनिट, डाळ मिल आणि सोलर ड्रायर युनिट उभारण्याच्या नियोजनाची माहिती दिली. तालुका कृषी अधिकारी बचुटे यांनी हवामान बदल, दुष्काळस्थिती व कृषी विभागाच्या योजनांची माहिती दिली. वर्षा मरवालीकर यांनी पोषण व सेंद्रिय शेती, तर समीर शेख यांनी व्यवसायाच्या संधी व शेअर कॅपिटलचे महत्त्व सांगितले. बिराजदार यांनी जैविक पद्धतीने कीड नियंत्रणाचे प्रात्यक्षिक सादर केले. दिलशाद तांबोळी यांनी महिलांच्या माध्यमातून खवा व्यवसाय विकसित करण्याचा अनुभव सांगितला. सभेला तुळजापूर तालुक्यातील २३ गावांमधील ३२२ महिला सभासद उपस्थित होत्या.



### मयत शेतकरी चंद्रकांत गाढवे यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत

**परंडा, दि.६ सप्टेंबर -**
देऊळगाव येथील मयत शेतकरी चंद्रकांत गाढवे यांच्या कुटुंबाला मल्हार पाटील यांच्या वतीने आर्थिक मदतीचा धनादेश देण्यात आला. जिल्हा कृषी व पशुसंवर्धन सभापती भाऊसाहेब खरसडे यांच्या हस्ते हा धनादेश कुटुंबीयांकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष अरविंद रगडे, मलिक सय्यद, सुभाष सूर्यवंशी, प्रकाश गाढवे, सरपंच त्रिंबक विठोबा गाढवे, केशव गाढवे, बाळासाहेब बदर, अन्वर सय्यद, ग्रामसेवक वैभव भांडवलकर, आलमभाई सय्यद, सोमनाथ गोफणे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. मयत चंद्रकांत गाढवे यांच्या कुटुंबातील मुलगा सुजल गाढवे, पत्नी रोहिणी गाढवे तसेच भाऊ अभिजीत व ऋषिकेत गाढवे उपस्थित होते.

### ई-पॉसच्या विरोधात आज आंदोलन

**तुळजापूर, दि.६ सप्टेंबर -**
रास्त भाव धान्य दुकानांवरील ई-पॉस यंत्रणेत वारंवार तांत्रिक अडचणी येत असल्याच्या निषेधार्थ धाराशिव जिल्ह्यातील रास्त भाव दुकानदारांनी आंदोलनाची भूमिका घेतली आहे. राज्य फेडरेशनच्या आवाहनानुसार ७ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व रास्त भाव धान्य दुकानांवरील ई-पॉस यंत्रणा दिवसभर बंद ठेवण्यात येणार आहे. सर्व्हर डाऊन होणे, यंत्रणा संथ चालणे आणि व्यवहार पूर्ण न होणे यामुळे दुकानदारांसह शिधापत्रिकाधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत रास्त भाव धान्य दुकानदार व केरोसीन असोसिएशनने जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

# गरजू रुग्णांना उपचारापासून वंचित ठेवणार नाही : आरोग्य राज्यमंत्री बोर्डीकर

## उमरगा येथे १०० खाटांच्या महिला रुग्णालयासाठी प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ सप्टेंबर -**
पैशांअभावी कोणताही गरजू रुग्ण उपचारापासून वंचित राहू नये, ही राज्य शासनाची भूमिका असून आरोग्य शिबिरात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला आवश्यक उपचार मिळवून देण्यासाठी शासनाची आरोग्य यंत्रणा सर्वतोपरी प्रयत्न करेल, अशी ग्वाही आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली.

उमरगा तालुक्यातील मुरूम येथील श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्याच्या प्रांगणात मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हा आरोग्य विभाग आणि शरण पाटील फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने 'मुख्यमंत्री समुदाय आरोग्य शिबिर-२०२६' आयोजित करण्यात आले. त्याच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार डॉ. अजित गोपछडे होते.

साकोरे-बोर्डीकर यांनी महात्मा फुले जनआरोग्य योजनेत पाच लाख रुपयांपर्यंत उपचाराची सुविधा असून, मुख्यमंत्री सहायता निधीतूनही गरजू रुग्णांना मदत केली जाते, अशी माहिती दिली. अवयव प्रत्यारोपणासाठी २४ लाख रुपयांपर्यंत मदत उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

उमरगा येथे १०० खाटांचे महिला रुग्णालय, मुरूम व लोहारा येथे प्रत्येकी ५० खाटांची उपजिल्हा रुग्णालये तसेच उमरगा येथे ट्रॉमा केअर सेंटर उभारण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. आरोग्य व्यवस्थेत



आशा सेविकांचे योगदान महत्त्वाचे असून त्यांना स्मार्टफोन देण्याची मागणीही पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

आमदार बसवराज पाटील यांनी शरण पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून आरोग्य शिबिराचे आयोजन करून नागरिकांना दिलासा मिळत असल्याचे सांगितले. आमदार प्रवीण स्वामी यांनी उमरगा येथे महिला रुग्णालय उभारण्याबरोबरच आरोग्य विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी केली.

यावेळी क्षयरुग्णांना पोषण आहार किट तसेच आयुष्मान भारत कार्डचे लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले. कार्यक्रमास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, भाजप जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, बापूराव पाटील, शरण पाटील यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सोयाबीनचे मोठे नुकसान; तलाव-पाणवठे कोरडे...

# ऑगस्टभर पावसाची दडी; अणदूर परिसरातील खरीप पिके करपली!

### शेतकऱ्यांकडून दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

**श्रीकांत अणदूरकर**
**अणदूर, दि.६ सप्टेंबर -**
अणदूर परिसरात संपूर्ण ऑगस्ट महिन्यात पावसाने दडी मारल्याने हातातोंडाशी आलेल्या खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सुरुवातीला चांगले पीक आले असतानाच पावसाने ओढ दिल्याने पिकांनी माना टाकल्या असून, तीव्र उन्हामुळे सोयाबीन अक्षरशः करपून गेले आहे. त्यामुळे जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी हवालदिल झाला असून, सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.



पावसाळा संपत आला तरी परिसरात म्हणावा तसा पाऊस झालेला नाही. एप्रिल-मे महिन्यातील उन्हासारखे कडक ऊन सध्या पावसाळ्यात पडत असल्याने पिकांवर त्याचा विपरीत परिणाम झाला आहे. जमिनीतील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खोलवर जात असून, परिसरातील तलाव, पाणवठे आणि जलस्रोत कोरडे पडल्याचे चित्र आहे. खाजगी बोअरवेलचे पाणीही कमी झाल्याने आगामी काळात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अणदूर परिसरात सोयाबीनचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर आहे. पावसाच्या प्रतीक्षेत असलेले सोयाबीन पीक आता उन्हाच्या तीव्रतेने करपले असून, उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. त्याचबरोबर जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे.

दरम्यान, प्रशासनाकडून नागरिकांनी पिण्याचे पाणी जपून वापरावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सध्या पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई नसली तरी आगामी काळात पाऊस झाला नाही तर परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांचा अंत न पाहता तातडीने दुष्काळ जाहीर करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी काही शेतकरी संघटनांनी केली आहे.

चारही बाजूंनी संकटांचा सामना करणारा बळीराजा आता मायबाप सरकारच्या निर्णयाकडे डोळे लावून बसला असून, सरकार आणखी वाट न पाहता तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### हातभट्टी दारू कारवाईत पोलिसांना धक्काबुक्की; १५ जणांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ सप्टेंबर -**
काटगाव (ता. तुळजापूर) येथे अवैधरित्या सुरू असलेल्या हातभट्टी दारूवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या नळदुर्ग पोलिसांच्या पथकाला आरोपींनी विरोध करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी सकाळी घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस कर्मचारी सुदर्शन व्यंकट घुले हे स्टाफसह हातभट्टी दारूविरोधात कारवाईचे शासकीय कर्तव्य बजावत असताना कचरू मल्हारी सगट, शशिकांत देडे, नगीना सोमनाथ कांबळे, मंगलाबाई रामकृष्ण कांबळे यांच्यासह इतर १० जणांनी पोलिसांशी धक्काबुक्की केली. तसेच धमकी देत शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

या प्रकरणी सुदर्शन घुले यांनी ५ सप्टेंबर रोजी नळदुर्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास नळदुर्ग पोलीस करीत आहेत.

## नळदुर्गेत जनता दरबारात २६ तक्रारी दाखल



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ सप्टेंबर -**
नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या सूचनेनुसार व नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील प्रत्येक प्रभागात दर शनिवारी जनता दरबार घेण्यात येत आहे. त्यानुसार ५ सप्टेंबर रोजी प्रभाग क्रमांक ८ मधील हुतात्मा स्मारक येथे नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या अध्यक्षतेखाली जनता दरबार पार पडला. याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या जनता दरबारात नागरिकांनी एकूण २६ तक्रारी अर्ज दाखल केले. यामध्ये नवीन गटार व रस्ता तयार करण्याबाबत पाच, गटारी स्वच्छतेबाबत दहा, लाडकी बहीण योजनेसंदर्भातील दहा आणि इतर एका तक्रारीचा समावेश आहे.

यावेळी नगराध्यक्ष धरणे यांनी प्रभागातील स्वच्छता, नवीन गटारे व रस्त्यांची कामे लवकरच सुरू करण्यात येतील, असे सांगितले. नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिका कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

लाडकी बहीण योजनेच्या तक्रारी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या माध्यमातून सोडविण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी उपनगराध्यक्ष नय्यर जहागीरदार, तानाजी जाधव, निरंजन राठोड, बलदेव ठाकूर, किशोर नळदुर्गकर यांच्यासह नागरिक व पदाधिकारी उपस्थित होते.

## डॉ. राधाकृष्णन यांचे विचार समाजाला सदैव प्रेरणादायी : जमादार

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ सप्टेंबर -**
डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे विचार आणि आचार समाजाला प्रेरणा देणारे होते. ते आदर्श शिक्षक, विद्वान शिक्षणतज्ज्ञ तसेच निष्णात राजकारणी होते. भारताचे दुसरे राष्ट्रपती म्हणून त्यांनी देशाची सेवा केली. त्यांच्या जन्मदिनानिमित्त ५ सप्टेंबर हा दिवस देशभर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो, असे प्रतिपादन सहशिक्षक गोविंद जमादार यांनी केले.



स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर येथे शनिवार, ५ सप्टेंबर रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहशिक्षक शशिकांत शिरोळे होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका सविता लोहार यांच्या हस्ते शाळेतील सर्व शिक्षकांचा पेन व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करत मनोगताद्वारे शिक्षकांच्या योगदानाचे कौतुक केले.

कार्यक्रमास दत्तात्रय कोकणे, व्यंकट वचने यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'जयप्रकाश'मध्ये शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ सप्टेंबर -**
जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म दिन शिक्षक दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ. आंबेडकर बालविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे होते. त्यांच्या हस्ते डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.



प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांनी प्रास्ताविकात डॉ. राधाकृष्णन यांचे शैक्षणिक विचार, तत्त्वज्ञान व देशासाठीचे योगदान स्पष्ट केले. शिक्षकांनी विद्यार्थिप्रिय बनावे, तर विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा आदर करून नम्रता अंगीकारावी, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात सुभाषदादा कोळगे यांनी शिक्षकांची विद्यार्थी व समाजाच्या परिवर्तनातील भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. शिक्षकांनी निष्ठेने काम करून नवनवीन उपक्रमांतून विद्यार्थ्यांना क्रियाशील बनवावे, असे आवाहन त्यांनी केले. माजी जि. प. सदस्य रामदास अण्णा कोळगे यांनी शिक्षक पुढील पिढी घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात, असे सांगितले. माजी केंद्रप्रमुख पोपट नलावडे यांनीही मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास राजनारायण कोळगे, शिवकन्या साळुंके, संतोष कपाळे, नानासाहेब शेलार, काकासाहेब डोंगरे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिन कांबळे व गणेश शेटे यांनी केले.

## मराठवाड्याच्या प्रश्नांवर शिवसेना आक्रमक; ८ सप्टेंबरला धाराशिवात धरणे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ सप्टेंबर -**
मराठवाड्यातील प्रलंबित प्रश्न आणि रखडलेल्या योजनांवरून शिवसेना आक्रमक झाली असून, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली १७ सप्टेंबर रोजी संभाजीनगर येथे आंदोलन करण्यात येणार आहे. 'तुमसे ना हो पायेगा' असे या आंदोलनाचे नाव असून, त्यापूर्वी ८ सप्टेंबरला धाराशिव येथे एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती आ. कैलास पाटील यांनी दिली.



### 'तुमसे ना हो पायेगा' दिले आंदोलनाला नाव

मराठवाड्यात दुष्काळी परिस्थिती असतानाही सरकारने दुष्काळ जाहीर केला नसून पंचनाम्यांचे आदेशही दिले नसल्याचा आरोप पाटील यांनी केला. दुष्काळ जाहीर करून तातडीने उपाययोजना कराव्यात, तसेच लोडशेडिंग, कमी व्होल्टेज व अनियमित वीजपुरवठ्याचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी करण्यात आली. कृष्णा-मराठवाडा प्रकल्प तातडीने पूर्ण करावा, पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी मराठवाड्यात आणताना प्रत्येक जिल्ह्याचा हिस्सा निश्चित करावा, तसेच मांजरा व तेरणा नदीत पाणी आणण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. पीक विम्यातील 'ट्रिगर' पद्धतीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचा आरोप करून प्रत्यक्ष तांत्रिक निकषांचा विचार करण्याची मागणी करण्यात आली. धाराशिवसाठी स्वतंत्र विद्यापीठ, उमरगा येथे उद्योग व लॉजिस्टिक पार्क, एमआयडीसीच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती आणि भूकंपग्रस्त ३७ गावांसाठी विशेष पॅकेज देण्याची मागणी करण्यात आली. जिल्ह्यातील ३११ धोकादायक वर्गखोल्यांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी आ. प्रवीण स्वामी यांनी केली.

शहरातील रस्ते, कचरा डेपो, जलजीवन मिशन, प्रलंबित शेततळे अर्ज तसेच अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले बंधारे, रस्ते व पूल दुरुस्त करण्याची मागणीही करण्यात आली. १७ सप्टेंबरला छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय आयुक्तांशी चर्चा करण्यात येणार आहे.

## नळदुर्ग किल्ला आत्महत्याप्रकरणी 'वीरा'चीही मृत्युशी झुंज थांबली

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ सप्टेंबर -**
नळदुर्ग येथील ऐतिहासिक किल्ल्यातील उपली बुरुजावरून उडी मारून आत्महत्या केल्याच्या घटनेतील जखमी अडीच वर्षांच्या वीरा पौळ हिचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यामुळे या दुर्दैवी घटनेतील चौघांचाही मृत्यू झाला आहे.

याबाबत माहिती अशी की, ३ सप्टेंबर रोजी अंबुलगा (ता. निलंगा) येथील अश्विनी पौळ यांनी तीन मुलांसह नळदुर्ग किल्ल्यातील उपली बुरुजावरून उडी घेतली होती.

यात अश्विनी पौळ व त्यांचा पाच वर्षांचा मुलगा अजिंक्य यांचा जागीच मृत्यू झाला होता. तर जुळ्या मुली क्रांती व वीरा गंभीर जखमी झाल्या होत्या.

उपचारादरम्यान क्रांतीचा मृत्यू झाला. त्यानंतर धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार घेत असलेल्या वीरानेही ५ सप्टेंबर रोजी अखेरचा श्वास घेतला.

या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.